# पद भाग क्र.६

१४ :– नांव समर्थताई को अंग
१५ :– सतगुरा को प्रतिवता को अंग
१६ :– केवल को अंग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समझन्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

| अ.नं. | पद | पेज नं. |
|---|---|---|
| | पद भाग क्र.६ | |
| | १४ :– नांव समर्थताई को अंग | |
| | १५ :– सतगुरा को प्रतिवता को अंग | |
| | १६ :– केवल को अंग | |
| | १४ :– नांव समर्थताई को अंग | |
| १ | असा समरथ साहेब मेरा १७ | १ |
| २ | असे अवगत आप साँई १८ | २ |
| ३ | असे ही बोहो बेद कुराण १९ | २ |
| ४ | असे स्याम राम भगत २१ | ३ |
| ५ | अवगत न्यारो हे २७ | ५ |
| ६ | केवल ध्यान धरे कोई जन १९८ | ८ |
| ७ | केवल ध्यान धरे जे जन १९९ | ८ |
| ८ | मे मल्ल सूं करतार का २१४ | ९ |
| ९ | नर क्हाँ तेरी गत तूंहिज जाणे २४७ | १० |
| १० | निरंजन तेरी गत तुहिज जाणे २५२ | १२ |
| ११ | राम कहेत सम तिरीया हो २९४ | १४ |
| १२ | संतो भाई असा नाम कहावे ३४० | २० |
| | १५ :– सतगुरा को प्रतिवता को अंग | |
| १ | आनंद लोक तोरे बंदा वे हंस जासी २४ | २१ |
| २ | या जग मे तो रे बंदा वे बड भागी ४२३ | २२ |
| | १६ :– केवल को अंग | |
| १ | बांदा आनंद ब्रम्ह या सुई आगे ३३ | २३ |
| २ | बांदा अणंद लोक से जावे ३४ | ३१ |
| ३ | बांदा इऊं जग मोहे न जाणे ३८ | ३२ |

| | | |
|---|---|---|
| ४ | बांदा केवळ भेद न्यारोजी ४२ | ३३ |
| ५ | बांदा मत भुले भरमा माही ४४ | ३४ |
| ६ | बांदा मोख जिके जन जासी ४६ | ३७ |
| ७ | बांदा ओ अरथ या होई ५१ | ४० |
| ८ | बांदा ओ जग मोहे ना जाणेला ५३ | ४३ |
| ९ | बांदा ओ कोई भेद बतावे ५४ | ४९ |
| १० | बांदा सत सबद हे न्यारा ६५ | ५२ |
| ११ | बांदा से जन पूरा जोगी ६८ | ५३ |
| १२ | बांदा से नर मोख न जावे ६९ | ५४ |
| १३ | बांदा ने: अंछर सुण न्यारा ७० | ५७ |
| १४ | बांदा तत्त राज ओ होई ७१ | ५८ |
| १५ | बांदा तिन भक्त कहुँ तोई ७२ | ६० |
| १६ | ग्यानी ग्यान बिचार रुं देखो १३७ | ६५ |
| १७ | जन चाय हुवे सो खोज ज्यो हो १६४ | ६६ |
| १८ | जोगीयोने ढूंढत जुग भया १८१ | ६७ |
| १९ | जुग मे जोगी को नही १८५ | ७० |
| २० | कुण हे रे बाबा २०९ | ७२ |
| २१ | माया हेरे आतो माया नीर बख २३२ | ७५ |
| २२ | राजा हे असा जन कोई २९३ | ७६ |
| २३ | साधो भाई आनंद पद गुरु होई ३१० | ७७ |
| २४ | संतो सुणज्यो हो सब सबद बिचार ३३० | ८० |
| २५ | संतो ग्यान अरथ गम भारी ३३३ | ८१ |
| २६ | संतो अगम गेल गत न्यारी ३३४ | ८२ |
| २७ | संतो गुरु भक्ता नही कोई ३५७ | ८३ |
| २८ | उण सम्रथ की मे बलिहारी ४०८ | ८८ |

१७

।। पदराग जोग धनाश्री ।।

**ऐसा समरथ साहेब मेरा**

**ऐसा समरथ साहेब मेरा ।। ताँका गिगन मंडळ माँही डेरा रे लो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,माझा साहेब असा समर्थ आहे.त्याचा डेरा गगन मंडळात आहे.।।टेर।।

**राव को रंक करे पल माही ।। रंक कुं राज दिरावे रे ।।**

**ऊजड नगरी कूं तुरत बसावे ।। खाडा ज्हाँ पहाड़ बणावें रे लो ।।१।।**

तो समर्थ साहेब राव म्हणजे राजाला रंक म्हणजे निर्धन एकही पळात करुन देतो आणि रंकास एकही पळात राजा करुन देतो.तो उजाड नगरीस तुर्त वसवितो आणि जेथे फार मोठा खड्डा आहे तेथे पर्वत करुन देतो. ।।१।।

**दूरा दिसे सो नेडा कर दे ।। नेडा कुं दुर पठावे रे ।।**

**जीवत दिसे सो तुरंत बिणासे ।। मुवां कूं आण जिवाडे. रे लो ।।२।।**

आणि जे दूर दिसते त्याला जवळ करुन देतो आणि जवळ आहे त्याला दूर पाठवून देतो आणि जे जिवंत दिसतात त्यांचा तुर्त विनाश करुन देतो आणि मेलेल्यास जिवंत करुन देतो.।।२।।

**सुख बिलास छुडावे पल मे ।। दुःख कूं सुख माही लावे रे ।।**

**रोग छत्तीसुँ ही पल माही खोवे ।। साजे के रोग लगावे रे लो ।।३।।**

सर्व सुख आणि विलास एका पळात सोडवून देतो आणि दुःखी मनुष्यास सुखात आणून देतो.तो समर्थ साहेब छत्तीसही रोग एका पळात गमावून देतो आणि निरोग्यास रोग लावून रोगी करुन देतो. ।।३।।

**डील डिगाँम्बर भेष बणायो ।। कोप्याँ रसातळ मेले रे ।।**

**गिरस्त रूप बण्या संसारी ।। ताँ घट नित हर खेले रे लो ।।४।।**

आणि शरीराने नग्न वेष धारण करुन जे साधु फिरतात त्यांच्यावर त्यांनी जर कोप केला तर त्या नग्न वेषधारी साधुस रसातळास पाठवून देतो आणि गृहस्थी रुपी जे संसारी बनलेले आहेत,त्यांच्या घटात हर रात्रंदिवस खेळतो. ।।४।।

**के सुखराम भऱ्या सब सोखे ।। रीता फेर भराई रे ।।**

**राम करेगा सोई हुवेगा ।। तुम सार हे काँई रे लो ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,जे भरलेले आहे त्यांचे तो शोषण करुन घेतो आणि जे खाली आहे त्याला भरुन देतो.म्हणून राम म्हणजे समर्थ साहेब जे करतील तेच होईल.तुमच्या स्वाधीन म्हणजे हातात काय आहे? ।।५।।

१८

।। पदराग चरचरी ।।

**अेसे अवगत आप साँई**

**अेसे अवगत आप साँई ।। मेहेमा काहा दीजिये ।।**

**सेस मुखा सूं सेस गावे ।। तोहि पार न लीजिये ।।टेर।।**

स्वामी,आपण असे अविगत आहात की,आपली गती कोणाकडून जाणली जात नाही. अविगत आपली महिमा तीन लोक,चौदा भवनात कोणी करु शकत नाही.शेषनाग हजार मुखाने दोन हजार जीभांनी आपली महिमा करतो.तरी ही त्याला आपल्या गतीचा पार आला नाही. ।।टेर।।

**फूल्यो हिरणक बोहोत भारी ।। शिव बिस्न ब्रम्हा हारियो ।।**

**आप अवगत मांय निकसे ।। पटक राखस मारियो ।।१।।**

राक्षस हिरण्याक्ष मनात खुप भारी फुलत होता.त्याच्याशी ब्रम्हा,विष्णू,महादेव हे सर्व देव हारुन गेले होते.आपण अविगत त्याच्या आतूनच निघून त्याच्या सोबत हजार वर्षापर्यंत युध्द करुन शेवटी त्याला जमीनीवर पटकून मारुन पाडले. ।।१।।

**हरे बेद च्यारूं देत ।। धस्यो समंद मांही ।।**

**जब दुज ऊठ के ।। प्रणाम कियो साँई ।।२।।**

शंखासुराने ब्रम्हाचे चारी वेद चोरुन तो समुद्रात जाऊन लपून बसला.तेव्हा ब्रम्हाने उठून आपणास नमस्कार करुन आपली आराधना केली. ।।२।।

**समद सब मथ सोज ।। संख मरोड लीया ।।**

**ब्रम्हा कूं बेद हरि ।। आप आण दीया ।।३।।**

तेंव्हा आपण सर्व समुद्राचे मंथन करुन शंखासूराला शोधून मुरडून टाकले व स्वत: हरी आपण ब्रम्हाला वेद आणून दिले. ।।३।।

**शिव में भीड गाढी पडी ।। मोहनी रूप धारियो ।।**

**के सुखदेव मार दुष्ट ।। शिव को कारज सारियो ।।४।।**

महादेवा जवळून भस्मासूराने कपटाने भस्मी कडा घेवून घेतला व शंकराला भस्म करु लागला.अशा भारी संकटात फसलेल्या महादेवाने आपली आराधना केली.तर आपण मोहीनीचे रुप धारण करुन भस्मासूर दृष्टाला मारुन महादेवाचे कार्य पूर्ण केले.असे अविगत आपण दयाळू आहात.असेच माझ्यावर आवागमनाचे काळाचे संकट पडले आहे तर,आपण अविगत माझ्यावर दया करुन माझे हे संकट निवारण करुन द्या.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।४।।

१९

।। पदराग चरचरी ।।

**अेसे ही बोहो बेद कुराण**

ऐसे ही बोहो बेद कुराण ।। भरे सायद तेरी ।।
अबे दयाल दया देख ।। राख लाज मेरी ।।टेर।।

हे भक्तवत्सल,आपण भक्तांचे संकट निवारण करतात.हे हिंदुचे वेद व मुसलमानांचे कुराण साक्ष भरतात.आता दयाळू दया करुन माझ्यावर काळाचे जन्म मरणाचे भारी संकट पडले आहे.तर आपण माझ्यावर दया करुन त्या संकटातून वाचवून माझी लाज ठेवा.।।टेर।।

सरणे आय न डूबो कोई ।। भगत बिछल तोकूं कयो ।।
जात पात कुळ हीन ।। कपटी तार लियो ।।१।।

आजपर्यंत आपल्या शरणात आलेला कोणीही बुडाला नाही.याकारणाने आपल्याला भक्त वत्सल म्हणतात.आपण जाती पाती न पाहता कुलहीन,कपटी इत्यादी सर्वांना तारले. म्हणून आपण माझ्यावर दया करुन मला ही काळापासून तारुन द्या.।।१।।

पतत पावन अधम उधारण ।। सुन्यो बिड़द तेरो ।।
साख बूज सरण आयो ।। पतित नाव मेरो ।।२।।

साई पतीत पावन अधम उधारक हे आपले ब्रदि आहे हे मी ऐकले.मी आपण पतीत पावन अधम,उधारक म्हणजे पापींहून पापीचा उध्दार करणारे आहात ही आपली किर्ती ऐकून मी पापी आहे व पापींना आपण तारतात हा विचार ठेवून आपल्या शरणात आलो. ।।२।।

गीद भील गिनका तारी ।। लोद्यो सेना नाइं ।।
घाटम मेणो अज्या मेल ।। सजनो कसाई ।।३।।

स्वामी,आपण आधीही,मेलेले जनावर खाणारा गिध्द,जरायु संपाती,भिल्ल,ग्रहक,गणिका इत्यादी पापींना तारले.आपण पापी लोधा,सेना न्हावी इत्यादींना तारले.आपण चोर मेणा घाटमला,पापी अजामेळाला,कसाई सजनला तारले. ।।३।।

कामी क्रोधी कुटलीता रे ।। काहा बिड़द दीजिये ।।
के सुखराम सरण मै तेरी ।। मेरो कारज कीजिये ।।४।।

आपण अनंत कामी,क्रोधी लोकांनाही तारले.आपले ब्रीद काय वर्णन करावे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे साई मी तुझ्या शरणात आलो आहे.म्हणून दया करुन माझे ही जन्म मरण मिटविण्याचे कारज सारुन द्या. ।।४।।

२१
।। पदराग चरचरी ।।

ऐसे स्याम राम भगत
ऐसे स्याम राम भगत बिछल कवायो ।।
ज्याँ ज्याँ भीड पडी भगतन में ।। ताहाँ तां दोड आयो ।।टेर।।

स्वामी,जेथे जेथे भक्त जनांवर संकट पडले तेथे तेथे आपण धावत पोहचले.आपण असे भक्त वत्सल आहात.।।टेर।।

**गहीं जब दुशासन द्रौपत ।। ध्यान तेरो धऱ्यो ।।**
**बंध्यो चिर गज सेंहंस ।। पत राख लियो ।।१।।**

द्रोपदीला दु:शासनाने निच मतीने पकडले.बिकट स्थितीत द्रोपदीने स्वामी आपले ध्यान केले.तेंव्हा स्वामी आपण दहा हजार हत्तींच्या भाराचे द्रोपदीचे वस्त्र वाढवून दिले. अशाप्रकारे स्वामी आपण द्रोपदीची लाज ठेवली.।।१।।

**धृ छाड़ घर कूं गयो बन में ।। अंतर ध्यान तेरो धऱ्यो ।।**
**आप अवगत इसे सांई ।। अटल राज ध्रुनो कऱ्यो ।।२।।**

स्वामी,ध्रृव पाच वर्षाच्या वयात आपले राज घर त्यागून वनात गेला व अंतरमध्ये (हृदयात)स्वामी आपले ध्यान केले.तेंव्हा स्वामी आपण ध्रृवाला ध्रृवाकडून कोणी हिसकावू शकणार नाही,असे अटल पदाचे राज्य दिले.।।२।।

**हिरणाक मार पृथी राख लिवी ।। प्रहलाद जन ऊबारियो ।।**
**गज ग्राह फंद काट ।। कीचक दाणो मारियो ।।३।।**

हे स्वामी,हिरण्याक्ष राक्षस पृथ्वीला रसातळात घेऊन जात होता,त्या हिरण्याक्षला मारुन पृथ्वी रसातळात जाण्या पासून वाचविली व सर्व जीव मरण्यापासून वाचले. हत्तीला मगरा पासून वाचवून हत्तीचे यमाचे फंद कापून दिले.वैराट राजाचा जीजा राक्षस किचक व त्यांच्या शंभर भावांना मारुन जगातील स्त्री–पुरुषांना या राक्षसां पासून वाचवले.।।३।।

**लाख मेहल रखे पांडव ।। दळ बिच भवरी ब्यात हे ।।**
**सुखराम राम मीरां लियो ।। असे अवगत नाथ हे ।।४।।**

लाख महालातून पांड्वांना राख होण्यापासून वाचविले.तसेच महाभारतात युध्दाच्या वेळी टिटवी फौजेच्या मध्ये प्रसूती होत होती,त्यावेळी टिटवीने असा आवाज केला (टीटीवी, टीटीवी,टीटीवी)असा टिटवीने आवाज केला आणि ही हाक ऐकताच एक हत्तीचा घंटा तोडून त्या टिटवीच्या अंड्यावर झाकून दिला.मोठ्या टोपली सारखा घंटा तिच्यावर झाकून दिल्याने इतके भयंकर युध्द झाले.तरी ही तिला धक्काही लागला नाही.युध्द समाप्त झाल्यावर कृष्णाने तो घंटा हटवला.अशाचप्रकारे मीराने ही रामनाम घेतले.त्या मीराचा विषापासून सापापर्यंत आणि सापापासून विषारी किड्यापासून रक्षा केली.तो असा अविगत नाथ आहे,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।४।।

२७

।। पदराग जोग धनाश्री ।।

**अवगत न्यारो हे अवगत न्यारो हे**

**अवगत न्यारो हे अवगत न्यारो हे ।। वां गत बिरळा जाणे रे ।।**

**माया रूप शब्द या घट मे ।। तां कूं बोहोत बखाणे रे लो ।।टेर।।**

अविगत म्हणजे सतनाद म्हणजे सतशब्द हा घटात दहाव्याद्वारात ब्रम्हांडात जो नाद घोरतो त्यापेक्षा न्यारा आहे.असा निराळा सतशब्द कोणी एखाद विरळा संतच जाणतो.हा विरळा संत सोडून सर्व जगाचे संत या घटाच्या आत घोरणाऱ्या सोहम नादलाच अविगत समजतात व असे घटात घोरणाऱ्या मायावी सोहम शब्दाला साहेब कर्ता,रमता राम असे नाना विधीने त्याची खूप महिमा करतात व त्याला प्राप्त करण्याच्या अनेक विध्या करतात व समजतात की त्याला प्राप्त केल्याने आवागमनातून सदाकरीता मुक्त होऊन जातील. ।।टेर।।

**नाभ कंवळ मे साहिब बैठा ।। करता निस दिन बोले रे ।।**

**रमता राम रमे घट भीतर ।। जडे. उघाडे खोले रे लो ।।१।।**

हे ज्ञानी समजतात की,हा सोहम शब्द प्रत्येक देहात नाभीमध्ये बसला आहे.हा सोहम शब्द नाभीत बसला नसता तर जीव ज्या देहात बसला आहे त्या देहात नखापासून शिखापर्यंत चेतनताच राहीली नसती.तो नाभीत बसला आहे म्हणून देहात चेतनता आहे.ही देहाला चेतनता देण्याची गती जीवाच्या स्वत:च्या चेतन विधी पेक्षा वेगळी आहे.म्हणून तो सोहम जीवाचा अविगत साहेब आहे.तो नाभीमध्ये बसून पूर्ण देहात नखापासून शिखापर्यंत चेतनता आणतो म्हणून जीव रात्रंदिवस बोलतो.जीव स्वत:च्या आधाराने काही करु शकत नाही.म्हणून जीव का कर्ता नाही,जीवाचा सोहम शब्द हाच कर्ता आहे.याची गती जीवाच्या चेतन गतीपेक्षा वेगळी आहे.याकरीता तो जीवाचा अविगत कर्ता आहे.हा सोहम शब्द देहात नखा शिखा पर्यंत रमतो व तोच जीवाच्या देहाला घडवितो व चालवितो म्हणून तो अविगत रमता राम आहे. ।।१।।

**कानाँ सुणे नेण सूं देखे ।। घ्राण बासना लेवे रे ।।**

**रसणा सीस बिराजे सांई ।। परख साव सब देवेरे लो ।।२।।**

देहाला हा सोहम शब्द नखापासून शिखापर्यंत चेतनता देतो म्हणून जीव कानाने ऐकतो, डोळ्यांनी पाहतो,नाकाने सुगंध घेतो.हा सोहम शब्द नखापासून शिखापर्यंत देहाला चेतनता देत नसता तर जीव कानाने ऐकू शकला नव्हता,डोळ्यांनी पाहू शकला नसता, नाकाने सुगंध घेऊ शकला नसता.जीव तर एका जागी कंठ कमळात बसला आहे,मग जीव कानाने ऐकणे,डोळ्यांनी पाहणे,नाकाने सुंघणे हे पूर्ण देहाचे कार्य कसे करु शकला असता?हा सोहम साई रसनेच्या शिरावर म्हणजे जिभेवर विराजमान आहे व तोच सर्व

स्वाद जीवाला पारख करवून देतो.त्याचे पारख करवून दिल्यानेच सर्व स्वादाची पारख होते.अशाप्रकारे हा सोहम साई देहात नखापासून शिखापर्यंत आहे.म्हणून जीव कानाने ऐकतो,नाकाने सुंघतो,डोळ्यांनी पाहतो.असा हा सोहम शब्द आहे.हा जीवाला कानाने कसे ऐकवतो,डोळ्यांनी कसे दाखवतो,नाकाने कसे सुंघवतो.हे जीवाला देहाने चेतनता देण्याची गती जीवाच्या स्वतःच्या चेतन विधी पेक्षा वेगळी आहे.म्हणून हा सोहम शब्द जीवा करीता मायेच्या पलिकडील अविगत आहे.।।२।।

**ब्रहमंड माय नाद सो गाजे ।। दसवे द्वार घर माँहीरे ।।**

**के सुखराम आद हर केवळ ।। तठा परे सुण क्राही रे लो ।।३।।**

यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानींना सांगतात की,हा सोहम शब्द अविगत नाही.हा पारब्रम्ह व त्रिगुणी मायेपासून जन्मलेला मायावी शब्द आहे.

आता पाहू हा सोहम शब्द जो घटातच आहे तो मायारुप शब्द कसा आहे.दोघांच्या भोगाने पारब्रम्हच्या आणि इच्छा मायेपासून जन्मतात.जसे–पिता आणि मातेपासून पुत्र आणि पुत्री जन्मते.पुत्र हा पित्याच्या गुणाचा असतो आणि पुत्री मातेच्या गुणाची असते.अशाप्रकारे सोहम हा पारब्रम्ह पिता गुणाचा असतो.हा पारब्रम्ह आणि इच्छा या दोघांच्या भोगाने

पारब्रम्ह + ब्रम्हशुन्य (इच्छा)

शिवब्रम्ह + महाशुन्य

चिदानंदब्रम्ह + शक्ती

महतत्व + इच्छा

यांच्यापासून शक्ती

आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी,ब्रम्हा,विष्णू,महेश = घट बनला

अशाप्रकारे पारब्रम्हपासून मायावी घट बनला आणि जेंव्हा घटच पारब्रम्हपासून बनला तर त्याच्यात मायावी पिता चरित्राचा सोहम शब्द आपोआपच आहे.पिंड पारब्रम्ह होणकाळा पासून जन्मला म्हणजे सोहमपासून जन्मला.पारब्रम्ह ब्रम्ह आहे.परंतु त्रिगुणी मायेच्या सोबत भोग करुन सृष्टी निर्मिती करतो.म्हणून माया आहे.जर पारब्रम्हच माया आहे.तर त्यापासून उपजलेली प्रत्येक वस्तु ही मायावी चरीत्राची झाली.

म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात या घटात जो सोहम शब्द आहे तो मायावी पिता चरित्राचा आहे.हा मायावी शब्द नाभीत उठतो बसतो.नखापासून शिखापर्यंत चेतनता आणतो.ही चेतनता जीवाला त्याचे मन आणि पाच आत्म्याने समजते.ज्याची गती मन आणि पाच आत्मा या मायेपासून समजते.मग तो मायेच्या पलिकडील अविगत कसा राहील?तो माया आहे.तो अविगत म्हणजे मायेच्या पलिकडील नाही या सोहम

नादची पोहच ब्रम्हांडापर्यंत म्हणजे देहाच्या दहाव्याद्वारा पर्यंत आहे.देहाच्या पलिकडे म्हणजे ब्रम्हाडांच्या पलिकडील पोहच नाही.हा देह तर माया आहे,मरणारा आहे.म्हणून मरणाऱ्या देहाच्या पोहच पर्यंतचा सोहम शब्द हा माया आहे.मायेच्या पलिकडील अविगत नाद नाही.हा मायेच्या पलिकडील अविगत म्हणजे आदि घर म्हणजे शुध्द केवल दहाव्याद्वारात ब्रम्हांडात गुंजणाऱ्या सोहम नादच्या पलिकडे आहे.हा अविगत म्हणजे साहेब म्हणजे सतशब्द म्हणजे अखंडित ध्वनि माया ब्रम्हच्या पलिकडील वैरागी आहे. या सतशब्द अखंडीत ध्वनिमध्ये होणकाळ पारब्रम्ह,इच्छा आणि सर्व जीव आहेत. या कारणाने सतशब्द म्हणजे अविगत सर्वात भरपूर आहे.हा सतशब्द अविगत साई आपले सतविज्ञान देतो.तेंव्हा या सृष्टीचे प्रत्येक काम पूर्ण होते.असा हा अविगत नाद नाभी कमळात बसला आहे. म्हणून सोहम शब्द म्हणजे श्वास नाभीमध्ये उठतो बसतो.

असा हा अविगत शब्द पूर्ण देहात आहे.म्हणून देहाच्या आतील सोहम शब्द अविगत शब्दाच्या सत्तेने देहात रात्रंदिवस चेतनता देतो.हा अविगत राम घटात रात्रंदिवस रमतो म्हणून सोहम शब्द घटात रमत्या जीवाला मन आणि ५ आत्म्यांने दिसतो.हा अविगत रमता राम घटात रमतच नसता तर सोहम शब्द नखापासून शिखापर्यंत चेतनता देऊच शकला नसता.जीवाला जो देह मिळतो त्या देहाला हा अविगत साई गर्भापासूनच जडतो म्हणजे बनवितो.याच्याच सोबत सर्व विध्या खोलतो आणि इतकेच नाही तर या देहाला पळात आपले सतविज्ञान देऊन चालवितो.

हा अविगत शब्द जो जीवाला मन आणि ५ आत्म्यांने समजत नाही,असा राम नखशिखा पर्यंत रमून राहीला आहे.म्हणून जीवाला सोहम शब्द कानाने ऐकण्याची,डोळ्यांनी पाहण्याची,नाकाने सुंघण्याची,जीभेने सर्व स्वाद घेण्याची चेतनकला पुरवितो.

जर हा अविगत साई जीवाच्या देहात नखापासून शिखा पर्यंत विराजमानच राहीला नसता तर हा सोहम नाद ज्याची ज्ञानी,ध्यानी त्याला अविगत समजून खुप प्रकाराने प्राप्त करण्याची विधी करतात.त्याची तऱ्हेतऱ्हेने महिमा गातात.तो कोठेही दिसलाच नसता. म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हा सोहम नाद जो ब्रम्हंडात दहाव्या द्वारापर्यंत पोहचतो तो अविगत नाही.अविगत तर तोच आहे ज्याची पोहच देहात ब्रम्हंड म्हणजे दहाव्या–द्वारापर्यंत आहे आणि देहाच्या पलिकडे ही भरपूर आहे.ज्याची गती जीव मन आणि ५ आत्म्याने ओळखू शकत नाही.तोच अविगत आहे.तो मायावी सोहम शब्दापेक्षा निराळा आहे.त्याच्या गतीला कोणी एखादा विरळा संत जाणतो.परंतु हे सोहम ज्ञानी होणकाळ पारब्रम्हलाच साहेब कर्तार समजतात.तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज समजवितात की,ज्यांनी पारब्रम्ह तत्तला समजले.त्यांना त्या अविगतची गती थोडीही महित नाही.तर हे मायावी ज्ञानी,ध्यानींची गोष्ट कोठे?म्हणून आदि सतगुरु

सुखरामजी महाराज म्हणतात,अविगत न्यारा आहे,अविगत न्यारा आहे. ।।३।।

१९८

।। पदराग गोडी ।।

**केवल ध्यान धरे कोई जन ।।**

**केवळ ध्यान धरे रे ।। जीवत पाँच मरे रे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जे सतस्वरुपाच्या केवळचे ध्यान करतात त्यांचे शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध पाची जिवंत पुरुष सहजमध्ये मरुन जातात. ।।टेर।।

**जनम जूण सब जाय चोरासी ।। सब सिध काज सरे रे ।।१।।**

अशा हंसाचा ८४ लक्ष युगाचा जन्म करण्याचा फेरा मिटून जातो आणि अनंत सुख मिळाल्याचे सिध्द कार्य पूर्ण होते. ।।१।।

**अष्ट सिध नव निध मुगती कहिये ।। निस दिन लार फिरे रे ।।२।।**

केवलचे ध्यान करतो त्याच्या मागे आठ सिध्दी नऊ निध्या आणि होनकाळाच्या सर्व वैकुंठासारख्या मुक्त्या रात्र-दिवस मागे त्याच्या चरणात धावत फिरतात. ।।२।।

**गंगा जमणा सवे सुरसती ।। चरणा की आस करे रे ।।३।।**

असे केवलचे ध्यान करणाऱ्याची गंगा,यमुना,सरस्वती ही चरणांची आशा करतात.।।३।।

**सुरपुर नरपुर नाग निसाणा ।। मेहेमा सकळ करे रे ।।४।।**

सुरपुर म्हणजे देवताचा लोक,नागपुर म्हणजे शेषनागाचा लोक,नरपुर म्हणजे धरतीचे लोक सर्व महिमा करतात. ।।४।।

**केहे सुखराम धरम नहिं होवे ।। करम न दोष चडे रे ।।५।।**

असे केवलचे ध्यान करणाऱ्याला त्रिगुणी मायेचा कोणताही धर्म न केल्या कारणाने होणकाळाचा कोणताही तसेच थोडाही दोष लागत नाही. ।।५।।

१९९

।। पदराग बिहगडो ।।

**केवल ध्यान धर रे जे जन**

**केवळ ध्यान धर रे जे जन ।। केवळ ध्यान धर रे ।।टेर।।**

जे जन(संत)या कैवल्याचे ध्यान धरतात ते. ।।टेर।।

**अेक मुगत की काहा चली हे ।। सब सिध काज सरे रे ।।१।।**

जो संत कैवल्याचे ध्यान धारण करतो त्याला त्रिगुणी मायेच्या भक्तीने लागणारे महाप्रलया -पर्यंतचे एका मुक्तीच्या पलीकडील नेहमी काळापासून मुक्तीचे फळ लागते त्याचा काळा पासून सुटण्याचे सर्व कार्य सिध्द म्हणजे पूर्ण होते. ।।१।।

**सुरग पताळ भू लोक ज जीतो ।। जन मे ने फेर मरे रे ।।२।।**

कैवल्य ध्यान धरणारा संत स्वर्ग,पाताळ व भुलोकाला जिंकून अमरलोकाला जातो.तो

पुन्हा जन्मत नाही व मरतही नाही. ।।२।।

**जीवत मुगत मे जाय बिराजे । निरभे होय बिचर रे । जे जन केवळ ध्यान धर रे।।३।।**

जो संत कैवल्य ध्यान धरतो तो जिवंतपणी काळाच्या परे मुक्तीपदात जातो व त्याला मुक्तीपद प्राप्त झाल्या कारणाने संसारात निर्भय होऊन रमतात. ।।३।।

**ब्रम्हादिक सनकादिक शिवजी ।। मैहेमा इधक कर रे ।।४।।**

जे जन कैवल्याचे ध्यान धारण करतात त्यांची वेदण्यास नारद तसेच ब्रम्हा इ.देव आणि सनद,सनंदन,सनातन,सनदकुमार असे सनकादिक तसेच विष्णू आणि शिवजी हे फार जास्त महीमा करतात. ।।४।।

**के सुखराम नाव गुण असो ।। आप सरिसो कर रे ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज की कैवल्य नावाचा गुण असा आहे हे कैवल्याचे नाव संतांना आपल्या सारखे काळापासून मुक्त असा कैवल्य बनवून देतो.।।५।।

२१४

।। पदराग बिलावल ।।

**मे मल्ल सूं करतार का**

**मे मल्ल सूं करतार का ।। बाथक जन आवे ।।**

**पाडुंगा बाहो भाँत ले ।। पिछे पिस्तावे ।।टेर।।**

मी सृष्टीच्या कर्तारचा पहेलवान आहे.माझ्याशी कोणताही मायेचा ज्ञानी कुस्ती लढेल तर मी त्याला अनेक प्रकाराने जमीनीवर पाडून चित्त करेल.मग तो माझ्याशी लढून हारण्याचा पश्चाताप करेल.।।टेर।।

**दिस्ट हमारो देख के ।। पीछे कर जोड़ो ।।**

**आन भरोसो जाण के ।। हमसूं तुम तोड़ो ।।१।।**

सतज्ञानाच्या डोळ्यांनी माझ्या पराक्रम पाहून मग माझ्याशी कुस्ती करण्याकरीता हात मिळवा.अन्य मायेचे ज्ञानी सारखे जाणून आमच्याशी तुम्ही लढु नका. ।।१।।

**पाँचूं जोधा पाड़के ।। मन सांवतं ढाया ।।**

**तुम केती अेक बात हो ।। ज्ञानी सुण भाया ।।२।।**

मी पाची विषय इंद्रिया योध्द्यांना व मना सारख्या सामंतला जमीनीवर पाडून मारले असा जबर पराक्रमी करता मल्ल आहे.वीर सामंतचे शिर कापल्यावर सामंतच्या स्तनाच्या जागी दिव्य डोळे उघडतात.या दिव्य डोळ्यांनी त्याला पूर्ण शत्रुंचे रण मैदाण दिसत असते. त्या डोळ्यांनी शत्रु कोठून काय चाल चालेल हे दिसत असते.या शत्रुंची सर्व चाल पाहून तो एकटाच सामंत शुरवीरतेने सर्व शत्रुच्या फौजेशी लढत असतो.तो कोणा कडूनही पडून मरत नाही.शत्रुच्या सर्व फौजेला मारुन आपली तलवार आपल्या हातांनी म्यानेत टाकतो मग खाली बसतो.अशा शुरवीराला सामंत शुरवीर म्हणतात.अशा

माझ्या मन सामंतला मी पाडून मारुन टाकेल.मग ज्ञानी बंधु,तुम्ही माझ्या पराक्रमाच्या पुढे कोणती मोठी गोष्ट आहात हे तुम्ही समजून घ्या.।।२।।

**मोमें पोरस राम का ।। सुण लिज्यो लोई ।।**
**जीण सब कूं पेदा कऱ्यां ।। तां का बळ होई ।।३।।**

माझ्यात रामजीचे बळ आले आहे हे तुम्हीही सर्व मायेचे ज्ञानी ऐकून घ्या ज्यात ब्रम्हा, विष्णु,महादेव इत्यादी सर्व मायेला पैदा केले आहे.त्यांचे बळ माझ्यात प्रगटले आहे. ।।३।।

**सुण ज्यों सब सुखराम के ।। ओ मल्ल मस्ताया ।।**
**त्रुगटी स्हेर मंझार में ।। घुमत हे भाया ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व ऐका,मी मस्तावलेल्या करतारचा पहेलवान आहे.मी त्रिगुटी शहरात ब्रम्हा,विष्णु,महादेवाच्या घरांच्या समोर ब्रम्हा,विष्णू, महादेवाला ललकारुन छाती फुलवून फिरत असतो.हे ध्यानात ठेवा.।।४।।

२४७

।। पदराग बिहगडो ।।

**नर क्हाँ तेरी गत तूं हि ज जाणे**
**गुरू गम जीव अक्कल नर माही ।। बुद्ध प्रवाण बखाणे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,समर्थ साई तुझी गती जीव काय जाणेल?तुझी गती फक्त तूच जाणतो.जगातील जीवांना हद्दीच्या गुरुंने ज्ञान सांगितले असेल तशी समज जीवाला तुझी येईल किंवा जीवाला जशी बुध्दी असेल त्या बुध्दीच्या प्रमाणे जीव तुझे वर्णन करेल.।।टेर।।

**ब्यास पुराण अठारे कीया ।। तिंही पार न पायो ।।**
**ब्रम्हा बेद उचाऱ्या च्यारी ।। वांही अगम बतायो ।।१।।**

व्यासाने अठरा पुराण बनविले १.ब्रम्ह पुराण २.पदम पुराण ३.शिव पुराण ४.भागवत पुराण ५.मार्कण्ड्येय पुराण ६.अग्नी पुराण ७.नारद पुराण ८.भविष्योत्तर पुराण ९.ब्रम्हवैवर्त पुराण १०.लिंग पुराण ११.वराह पुराण १२.स्कंध पुराण १३.वामन पुराण १४.कर्म पुराण १५. मत्स पुराण १६.विष्णु पुराण १७.गरुड पुराण १८.ब्रम्हाण्ड पुराण तरी ही त्या वेदव्यासाला तुझ्या गतीचा पार मिळाला नाही.ब्रम्हाने तुझ्या गतीवर चार वेद(ऋग्वेद,यजुर्वेद,सामवेद,अथर्ववेद)बनविले.परंतु ब्रम्हाला ही तुझ्या गतीचा पार नाही आला.त्यानेही तुझ्या गतीचा अगम म्हणजे ज्याची कोणाला समज नाही असे नेती-नेती म्हटले.।।१।।

**पीर पैकंबर और अवलिया ।। रिष मुनेश्वर कुहावे ।।**
**तीन लोक माया बस कीनी ।। तोई तेरो पार न पावे ।।२।।**

अशाच प्रकारे संसारात २४ पीर झालेत.अनेक पैंगबर झालेत.अनगिणत अवलिया झाले. ८८,००० ऋषी मुनी झाले.या पीर,पैगंबर,अवलिया ऋषी मुनींनी ३ लोकांची माया वश केली म्हणजे आपल्या चाहणे प्रमाणे मायेला चालवले परंतु तुझ्या गतीचा पार या कोणालाही मिळाला नाही. ।।२।।

**सब औतार तिथंकर कहिये ।। फेर देव अे तीनी ।।**
**तीन लोक भांजे फीर थापे ।। तेरी कळा नही चीनी ।।३।।**

सर्व अवतार,सर्व तीर्थंकर(नाव नाही सांगणे)तसेच ब्रम्हा,विष्णू,महादेव हे तिन्ही देव मायेमध्ये पराक्रमी राहीले. या अवतार, तीर्थंकर तसेच ब्रम्हा, विष्णू, महादेव यांच्या कित्येकांमध्ये तर येथ पर्यंत पराक्रम आहे की पळात त्रिलोकाला मिटवू शकतात आणि पुन्हा जसेच्या तसे पळात बनवू शकतात.इतका मायावी भारी पराक्रम राहील्या नंतरही तुझी कला यांच्यातील कोणीही जराही जाणली नाही. ।।३।।

**खसिया ब्होत पार के तांई ।। तुज छेहे किणिहन पायो ।।**
**समज समज नर ने: चे रहे ।। राम किणी न बतायो ।।४।।**

तुझा पार घेण्याकरीता अनेक लोकांनी रात्रंदिवस वेळी-अवेळी कसून मेहनत केली. परंतु तुझा पार म्हणजे तुझी गती कोणालाही मिळाली नाही.जीवब्रम्ह तसेच होणकाळी पारब्रम्ह ज्ञान समजून समजून अनेक जीव निश्चल राहीले.क्रुर काळाच्या समोर झामगले नाही.परंतु राम म्हणजे सतस्वरुप परमात्मा कोणीही दाखवला नाही. ।।४।।

**तेरो वार पार घण नामी ।। अेक नांव मे आवे ।।**
**के सुखराम संत जन सारा ।। राम राम क्हे गावे ।।५।।**

तुझा ही वारपार नाही आणि तुझ्या नामांचा वारपार नाही असा तु घननामी म्हणजे अनेक नामी आहे.जसे सतनाम,आनंदपद,सतस्वरुप,साई सतसाई, निजनाम,ने:अक्षर, मुरारी गोविंद,माधोजी,नारायण,परमेश्वर,परमात्मा,प्रभु,ईश्वर,परम मोक्षाचा दाता,दयाळू, कृपाळू,ब्रम्ह,परब्रम्ह,सतस्वरुप ब्रम्ह,वहाँ गुरु साहेब,सतसाहेब,राम इत्यादी असे अनेक तुझे नाम आहेत.तु रामनाम सोडून अन्य कोणत्याही नामाने प्रगट होत नाही.तु एक राम नामानेच प्रगट होतो.जसे कोणी रात्रंदिवस सतनाम,सतनाम भजले कोणी वहाँ गुरु वहाँ गुरु भजले,कोणी समर्थ समर्थ भजले,कोणी सतशब्द सतशब्द भजले इत्यादीने तु जराही प्रगट होत नाही.परंतु रामनाम येत्या जात्या श्वासात भजताच तु अखंडित मुखाने बोलता न येणाऱ्या पूर्ण घटात आणि घटाच्या बाहेर ध्वनित प्रगट होतो.या ज्ञान समजने आणि सतस्वरुपी संतांनी तुला येत्या जात्या श्वासात म्हणजे श्वास-उश्वासात राम राम भजून घटात प्रगट केले.अशी तुझी प्रगट करण्याची विधि आहे म्हणजे तुझी गती प्राप्त करण्याची रीत आहे.ती विधि आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सर्व ज्ञानी,

ध्यानी तसेच जगातील स्त्री–पुरुषांना उघड उघड सांगितली. ।।५।।

२५२

।। पदराग बिहगडो ।।

**निरंजण तेरी गत तुहिज जाणे**

**ग्यानी सबे अडे जुग माही ।। पखे पखे नर ताणे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे सतस्वरुप निरंजन तुझी गती तुच जाणतो.तुझ्या शिवाय अन्य कोणी जाणूच शकत नाही.हे जगाचे ब्रम्हा,विष्णू,महादेव, शक्ती इत्यादी देवतांचे ज्ञानी तसेच जगातील स्त्री–पुरुष तुझी गती मायेच्या ज्ञानाने समजण्याचा प्रयत्न करतात.परंतु तुझी गती मायेच्या ज्ञानाने कोणालाही समजत नाही आणि समजणारही नाही.तुझी गती तर सतज्ञानानेच समजते म्हणून हे जगत ज्ञानी व स्त्री–पुरुष जितके समजले,त्या समजला पूर्ण समजले,असे मानून धारतात व आपसात अडतात व आपला आपला पक्ष म्हणजे आपल्या आपल्या समजला ताणतात. ।।टेर।।

**मुसलमान दूध कूं टाळे ।। हिंदू सुण पख साती ।।**

**कूंडा पंथी सर्ब संग जीमे ।। च्यार ब्रण संग जाती ।।१।।**

मुसलमान केवळ दूधाला टाळतात.मुसलमान फक्त एक आईचे भाऊ बहिण आपसात विवाह करु शकत नाही.परंतु एका पित्याचे भाऊ बहिण आपसात विवाह करु शकतात. तेच हिंदू मध्ये स्वत:ची जात,आईची जात,असे सात पक्षात विवाह करु शकत नाही. परंतु कुंडापंथी मध्ये चारी वर्णांमध्ये ब्राम्हणापासून तर चाण्डाळापर्यंत कोणी कोणाच्याही सोबत विवाह सारखे कर्म करतात व सोबत भोजन करतात. ।।१।।

**पिरां सूंस सूर का लीया ।। सुरे औतार बखाणी ।।**

**जख सुण खाय जीव सब ऊपर ।। दया तिथंकरा ठाणी ।।२।।**

मुसलमान डुकराची शपथ खातात तर हिंदु गाईची शपथ खातात.मुसलमान गाईला हलाहल करुन मारतात व खातात.तर हिंदु डुकराला मारतात व खातात.हिंदु व मुसलमान सोडून जगातील अन्य राक्षसी स्वभावाचे लोक गाय व डुक्कर दोघांना खातात व तीर्थंकर डोळ्यांनाही न दिसणाऱ्या जीवांपासून तसेच दिसणाऱ्या मुंगी पासून हत्ती पर्यंत सर्वांवर दया करतात.कोणाची ही हिंसा करणे भारी पाप समजतात. ।।२।।

**बळ कूं क्हो पठायो ।। अजामेळ कूं ताऱ्यो ।।**

**गोतम रिख सिसट फीर आयो ।। इंद्र एेरापत हाऱ्यो ।।३।।**

बळीराजा मोठा दाता होता,न्यायीक होता.स्वर्ग प्राप्त करण्याच्या पुण्यांचा होता.अशा बळीराजाला स्वर्गात न पाठवता पाताळात पाठवून दिले व अजामेळ क्रुर होता अन्यायिक होता.नरकात पडण्याचा निच कर्मी होता.त्याला नरकात न पाठवता स्वर्गात पाठवले म्हणून तुझी गती मायेने कोणाला समजत नाही.अहल राजाच्या इर्थ स्वयंवरात गौतम

राजा जाऊन पृथ्वीची प्रदक्षिणा करुन पोहचून गेला व इंद्र हत्तीवर स्वार होवूनही स्वयंवराच्या जागी गौतमाच्या आधी न पोहचता नंतर पोहचला अशी तुझी गती आहे. ।।३।।

**पत्थर किया पात सुंई हळका ।। पात पहाड़ सूंई भारी ।।**
**तीन लोक मुख मे दीखलायां ।। ज्यां अंत असी खुवारी ।।४।।**

रामचंद्राने लंकेला जाते वेळी सहज न उचलले जाणारे असे मोठ मोठे दगड समुद्रात टाकले होते.ते दगड झाडाच्या पानांपेक्षाही हलके होऊन गेले होते व नामदेवाने तुळशीचे पाने तराजूत टाकले होते ते पान पहाडा सारखे भारी होऊन गेले होते.अशी तुझी गती आहे.ती कोणी समजू शकत नाही.कृष्णाच्या लहानपणी यशोदा मातेने माती खाल्ली का हे पाहण्याकरीता तोंड उघडून दाखवायला सांगितले तेंव्हा कृष्णाने आपल्या आईस आपल्या तोंडात तीन लोक चौदा भवन दाखविले.अशा कृष्णाचा अंत भिल्लाचा बाणाने झाला व त्याच्या दाह संस्कारा करीताही कोणी नातेवाईक नव्हते.अशी खराबी झाली म्हणून तुझी गती कोणी समजू शकत नाही. ।।४।।

**नेमनाथ को केवळ उपज्यो ।। तीन लोक कूं जीता ।।**
**अंत काळ सारी सूध भूला ।। असे जुग बदीता ।।५।।**

नेमीनाथाला केवल उपजले होते.त्याने तीन लोकाची माया जिंकली होती परंतु अंतकाळी त्याला कोणत्या गोष्टीची शुध्दी नव्हती युगभर बेशुध्द होता म्हणून तुझी गती कोणी समजु शकत नाही. ।।५।।

**वांहि माय बेन सो वाही ।। वाज घरोघर धरणी ।।**
**याही संग क्रम सो बंधे ।। आईज लेर उधरणी ।।६।।**

स्त्री हीच आई आहे,हिच बहिण आहे,हिच पत्नी आहे,हिच व्याभिचारीण आहे.हिच जगाला नरकात पाठवते व हिच संत आहे.ही जेंव्हा संत बनले तर स्वत:च्या व पतीच्या मिळून अनेक पिढ्यांचे अगतीमध्ये पडलेल्या जीवांना तारुन देते.आपल्या पोटी जन्मलेल्या पुत्र-पुत्रीपासून अनेक जीव तारणारे संत बनविते.।।६।।

**क्हा कंहू मुज कहि न जावे ।। उथळ पुथल तेरी माया ।।**
**के सुखराम अरथ कर देख्या ।। तुज हर पार न पाया ।।७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी तुझे वर्णन कसे करु?तुझी माया उलट सुलट आहे.त्या मायेने तुझे वर्णन सांगता येत नाही.तुझे वर्णन मायेने कितीही खोलवर विचार केला तरी ही,हे हर,तुझा पार कोणाला येत नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।७।।

२९४

।। पदराग हिन्डोल ।।

**राम केहत सम तिरीया हो**

**राम केहत सम तिरीया हो ।। वे अंत कांहाँ नही फिरीया हो ।।टेर।।**

मुखाने राम म्हणतात बरोबर तिरुन गेले,अंत समयी कोठेही फिरले नाही,अटकले नाही. ।।टेर।।

**अजामेळ सो कब कुळ राख्या ।। कद तन साझी किरीया हो ।।१।।**

अजामेळ हा ब्राम्हण कुळात जन्मला होता.त्याने कधी ही वेदांमध्ये सांगितलेल्या उच्च करण्या केल्या नव्हत्या.विषय विकारांचे सर्व निच निच कर्म केले होते.कर्मांना पाहता त्याला नरकच मिळणे होते.अंतिम समयी त्याला घेऊन जाण्याकरीता जातीने यमराज आपली फौज घेवून आला होता.ही यमाची फौज पकडून मारपीट करु लागली होती.या यमदूतां सोबत दोन हात करण्याकरीता याने आपल्या मुलाला ज्याचे पूर्ण नाव रामनारायण होते त्याला राम्या राम्या म्हणून बोलवण्या करीता हाक मारली.जसे अजामेळाच्या मुखातून राम हा शब्द निघाला तसेच.यमराज यमदूतां सोबत शहाणा होऊन गेला व अजामेळला सोडून दिले.पुढे अजामेळला देवदूत घेऊन गेले.या अजामेळाने वेदाच्या करण्या कधी केल्या नव्हत्या.फक्त अंतसमयी राम्या राम्या उच्चारण केले होते. ज्याच्याने अजामेळाचे नरकात न जाता स्वर्गादिक गेला.असा राम हा शब्द आहे.त्याचे उच्चारण करताच नरकाचे दुःख सुटून गेले. ।।१।।

**बेस्या शिळ कीसी दिन पाळया ।। बिवाण ताकीदी ऊतरीया हो ।।२।।**

वेश्या नेहमी विषय विकारांमध्ये रमते.तिला परपुरुषा सोबत भोग करणे हा दोष आहे हे समजत नाही.म्हणून तिने कधी ही शिल ठेवले नव्हते.तिचा राम शब्दाने उध्दार होऊन गेला दाखला-एक वेश्या होती.ती एका संताजवळ मंत्र घेण्याकरीता तेंव्हा त्या संताने तिला अनाधिकारणी जाणून त्या वेश्येला म्हटले की,पोपटाला शिकवतांना नामाचे उच्चारण करतात.त्या नामाचे तु रटन कर.म्हणून त्या वेश्याने एक पोपट पाळून बोल मिठ्ठू राम-राम असे प्रत्येक दिवशी एकदम सकाळी-सकाळी अंधारातच खाटीवर पडून-पडून पोपटाला शिकवत होती.एके दिवशी त्या पोपटाच्या पिंजऱ्यात साप घुसून त्या पोपटाला मारुन खाऊन गेला आणि त्या सापाकडून पिंजऱ्यांच्या बाहेर निघता येत नव्हते.वेश्या पहाटेच उठून बोलु लागली,बोल मिठ्ठू राम-राम असे मिठ्ठूला शिकवू लागली.परंतु पोपटाला तर साप खाऊन गेला होता,मग तो कोठून बोलेल.मिठ्ठू बोलला नाही.असे पाहून,पोपट पिंजऱ्यातून उडून गेला का हे पाहण्याकरीता,त्या पिंजऱ्यात त्या वेश्येने हात टाकला,तर त्याच्यात बसलेला साप,बोल मिठ्ठू राम-राम असे म्हणता वेळीच दंश केले.त्याचवेळी(मुखाने रामनाम निघते वेळीच,त्या वेश्येचा जीव निघून

गेला.तिच्या करीता ताकीदीने विमान उतरुन त्या वेश्येला घेऊन गेले.)या वेश्येने शील (ब्रम्हचर्य),कोणत्या दिवशी पाळले होते की,तिच्याकरीता लवकर(लगेच/तत्काळ) विमान उतरुन आले. ।।२।।

**चंचळ चोर गऊ ऋषि मार्‍या ।। द्रब पराया हरीया हो ।।३।।**

चंचल चोराने गाय व ऋषीला मारले होते.त्याने अनेकांचे धन लुटले होते. ।।३।।

**चोरां को शिर काटत बेळया ।। हर हर नांव ऊचारीया हो ।।४।।**

चोराचे शिर कापते वेळी चोरांनी हर हर नामाचा उच्चार केला. ।।४।।

**घाटम कूं तब बार पहूंती ।। घोडे को रंग फिरीया हो ।।५।।**

आणि घाटम(घाटमदास हा जातीचा मेणा होता–घाटमदास हे चार भाऊ होते.त्यांच्या वडिलांचा मरते वेळी जीव निघत नव्हता.त्यांचा जीव जेंव्हा अटकलेला होता,तेंव्हा हे चारी भाऊ,आपल्या वडिलांना बोलले की,तुमचा जीव कशात अटकलेला आहे.आम्हाला सांगा,म्हणजे आम्ही तेच करु.तेव्हा त्यांच्या वडिलांनी सांगितले की,माझे तुम्हाला इतकेच सांगणे आहे की,तुम्ही कोठे ही साधूच्या संगतीमध्ये जाऊन साधूचे ज्ञान कानांनी ऐकू नका.तुम्ही जर साधुच्या संगतीत जाऊन साधूचे ज्ञान ऐकाल.तर आपला जो चोरी करण्यांचा धंधा आहे,तो तुम्ही सोडून द्याल तेंव्हा तुम्ही उपाशी मराल म्हणून तुम्हाला हे शेवटच्या वेळचे सांगणे आहे की,साधूच्या संगतमध्ये जाऊन साधूचे ज्ञान कधी ही ऐकू नका.एवढे सांगून त्यांच्या वडिलांनी प्राण सोडला.नंतर हि मुल,चोरी तर नेहमी हातात येत नव्हती.म्हणून लाकडांचा गठ्ठा गावात विकून उदर निर्वाह करीत होते.हे चारी भाऊ,नेहमी लाकडं घेऊन येत होते त्यांच्या रस्त्यात,एका जागी संतांची संगत होत होती.सत्संगात पुढून जातांना,संताचे शब्द कानात पडू नये म्हणून कानात बोट टाकून तेथुन पुढे निघत असत.एक दिवस सत्संगाच्या समोर येताच घाटमदासच्या पायात काटा टोचला.काटा काढल्या शिवाय पुढे चालता येत नव्हते.म्हणून घाटमने काटा काढण्याकरीता कानातील बोट काढले त्यावेळी संताच्या मुखातून हे वाक्य निघाले की,देवतांना सावली नसते.देवतांची सावली पडत नाही.फक्त ऐवढेच वाक्य ऐकले आणि मनात म्हणला की या एवढ्याश्या गोष्टीने काय होणार आहे.या गोष्टीने, आम्ही चोरी करणे थोडी सोडणार आहोत.असे मनात म्हणत चालता झाला.काही दिवसांनी,या चारी भावांनी,एके दिवशी राजाच्या महालात खुप मोठी चोरी केली आणि चोरीचे धन प्रगट होऊन जाईल म्हणून आपल्या घरात गाडून दिले.राजाच्या घरी चोरी झाल्याने राजाला खुप भारी दुःख झाले की वाईट वाटले की चोर पकडले गेले नाही.मी माझी स्वतःची रक्षा करु शकला नाही,तेंव्हा प्रजेची रक्षा का करेल?चोर पकडले गेले नाही म्हणून राजाला वाईट वाटल्याने,चोर पकडण्या करीता राजाने मोठे बक्षिस ही

ठेवले की जर कोणी चोराला पकडून देईल तर त्याने,हा वीडा उचलून खावा.चोर पकडून दिल्यावर त्याला बक्षिस मिळेल.तेथे गावात काही दूतिया जमा झाल्या त्यातील एक दूती उठून वीडा उचलून खावून घेतला आणि बोलली की,मी चोर पकडून देईल परंतु मला राजाकडून मला जे पाहिजे त्या सामानाची मदत मिळायला पाहिजे.ती(दूतीन) गावात तपास करण्याकरीता गेली तर तिला मेणा लोकांवर संशय आला आणि हे मेणा लोक देवीचे उपासक आहेत,असे तिला माहित पडले.हे मेणा लोक अष्टमीच्या दिवशी देवीची पूजा करुन देवीला मानतात.एका दिवशी(अष्टमीच्या दिवशी)या दूती ने देवीचे रुप मोठ्या चतुराईने धारण केले.आपले दोन हात तर होतेच सहा हात नकली लावून अष्टभूजा देवी बनली.कोणत्या हातात त्रिशुल,कोणत्या हातात तलवार,कोणत्या हातात ढाल,कोणत्या हाता नर मुण्ड अशाप्रकारे रुप बनवून एका रेड्याला शृंगार करुन, आपल्या शरीरावर ही भरपूर दागिणे घालून घेतले आणि रेड्यावर स्वारी करुन,मेणा लोकांच्या पूजेमध्ये,अष्टमीच्या दिवशी आरोळी लावली.त्या आरोळीने मेणा लोक, आपल्या घराच्या बाहेर येऊन पाहतात तर बाहेर देवी उभी आहे.तिला पाहून सर्व मेणा हात जोडून उभे राहीलेत.त्या लोकांशी ती(दूती)बोलली,अरे मी तुम्हाला इतके द्रव्य दिले आणि तुम्हाला मला विसरुन गेलेत.आता ही तुम्ही मला प्रसाद किंवा माझी कढाई वगैरे काहीही केले नाही.तेंव्हा मेणा बोलले,आता आम्ही तुला विसरलेलो नाही आहोत.तुम्ही दिलेले सर्व धन जमीनीत गाडून ठेवले आहे,परंतु राजाच्या भीतीने आम्ही त्याला काढत नाही.ज्या दिवशी काढू,त्या दिवशी तुमची कढाई करु.अशा गोष्टी होत होत्या.तेंव्हा अष्टमीचा चंद्र उगवून वरती आला.ज्याच्याने त्या दूतीची छाया जमीनीवर पडली ती छाया पाहून घाटम सर्वांशी बोलला की,अरे दगा आहे,या रांडेला खाली खेचून पाडा आणि घरात घेऊन जाऊन हिला मारुन टाका.नाही तर ही आम्हा सर्वांना मारुन टाकेल.मग सर्व मेणे मिळून तिला रेड्या वरुन पाडून मारु टाकले.तिच्यावरचे लाखो दागिणे उतरवून,रात्रीच्या रात्री तिला घरातच जमीनीत गाडून दिले.याकारणाने सर्व लोकांचा जीव वाचला.तेंव्हा घाटमदास बोलला की,पहा मी संतांचा एक शब्द ऐकला होता की,देवतांची सावली पडत नाही. संतांच्या एका शब्दाच्या ज्ञानाचा किती गुण झाला की,राजाच्या येथली लाखो रुपयांची चोरी आम्ही पचवून घेतली.नाही तर राजा आज आम्हा सर्वांचे शिर उडवणार होता.परंतु आम्ही सर्व वाचलो.याच्या व्यतिरिक्त या रांडेचे लाखो रुपयांचे दागिने,आम्हाला घरी बसून मिळून गेले.पहा एक पाव पळाची संतांची संगतीचा इतका गुण आहे.मग नेहमी संगत करण्यात किती गुण होईल.मी तर आज जाऊन त्या संताचा शिष्य बनेल.असे म्हणून तो आपल्या जातीच्या लोकांना आणि आपल्या भावांना सोडून संताजवळ येऊन बोलला की,मला शिष्य बनवून घ्या.

संताने विचारले,तु कोण आहेस?घाटम बोलला मी मेणा आहे.संत म्हणाले की,तु मेणा आहेस परंतु आमचा शिष्य बनल्यावर तुला चोरी सोडावी लागेल.तेंव्हा घाटम बोलला, महाराज मी चोरी करणे सोडून खाईल काय?आमचा तर धंधाच चोरीचा आहे,तो सोडवू नका.संतानी सांगितले तरी ही तुला काही नियम पाळावेच लागतील.जसे काहीही होऊन जावो तरीही खोटे बोलायचे नाही.खोटे बोलणे तर तुला एकदम सोडावे लागेल. आणि संध्याकाळी नियमपूर्वक संध्या केली पाहिजे.गरीबाच्या घरी चोरी करु नकोस. तेंव्हा घाटम बोलला की,मी कधीही,कोठेही झाले तरीही खोटे बोलणार नाही आणि संध्याकाळी संध्या केल्या शिवाय,पुढे जाणार नाही आणि गरीबाच्या घरी चोरी ही करणार नाही.इतके कबुल केल्यावर महाराजने त्याला मंत्र दिला मग एके दिवशी घाटम चोरी करण्याकरीता राजदरबारात गेला.तेंव्हा द्वारपालने विचारले,तुम्ही कोण आहात? घाटम बोलला मी चोर आहे.(कारण की घाटमला खोटे बोलायचे नव्हते)म्हणून त्याने चोर आहे असे सांगितले तेंव्हा द्वारपाल,त्याला चांगला माणूस समजून बोलला.ठाकूर साहेब,असे अडवे का बोलतात,तुम्हाला जाण्याकरीता कोण थांबवत आहे.विना शंकेने आत का जात नाहीत.तेथून घाटम घोड्याच्या तबेल्यात आला,तेथे त्याने तबेल्यातील एक चांगला काळा घोडा,जो राजाच्या सवारीचा होता,त्याला खोलु लागला.तेंव्हा चरबेदार (सैंस)येऊन घाटमला बोलला,तुम्ही कोण आहात?घाटमने,सांगितले मी चोर आहे, घोडा चोरुन घेऊन जात आहे.सैंस मनात विचार केला की कोणी चोर असे थोडी म्हणेल,की मी चोर आहे आणि घोडा चोरुन घेऊन जातो आहे,असे चोर म्हणणार नाही आणि चोराला दिवसा राजाचा घोडा चोरण्याची कोणाची हिंमत होईल का?असे समजून सैंस बोलला,ठाकून साहेब आडवे का बोलता,मी तुम्हाला घोडा घेऊन जाण्यास मनाही थोडीच करत आहे.माझे विचारणे काम आहे म्हणून सहज मी विचारले की, आपण कोण आहात.आता आपण घोडा कशाकरीता खोलत आहात.मीच आपल्याला जीन,लगाम इत्यादी लाऊन देतो.मग घोडा घेऊन जा.आपण का कष्ट करतात,मग त्या सैंस/सेवकाने चांगली जीन आणि लगाम लावून दिले आणि घाटमदास,घोड्यावर स्वार होवून निघून गेला.नंतर दोन तासा नंतर राजाचा शिकारीला जाण्याचे काम पडले, तेंव्हा राजाने घोडा मागवला तेंव्हा सैंस बोलला,घोडा तर दोन तास आधीच घेऊन गेला.कोण घेऊन गेला?असे सेवकाला विचारल्यावर सेवक बोलला की,मी चोर आहे, असे म्हणून घेऊन गेला.तो(घाटमदास)द्वारपालाच्या समोर तबेल्यातून आला आणि द्वारपालाच्या समोरच घोडा गेला.दिवसा ढवळ्या(दिनदहाडे)घेऊन गेला.त्याला मी चोर कसे समजू मग.राजाने त्याला पकडण्याकरीता दुसरे घोडेस्वार सोडले.ते घोडेस्वार घाटमने घेऊन गेलेल्या घोड्यांच्या पायांचे निशाण पाहत पाहत निघाले.पुढे घाटमदास

सूर्यास्त होत आहे हे पाहून संध्याची वेळ चालली आहे.म्हणून जंगलातच संध्या करण्या करीता बसून गेला.घाटमदासचे संध्या करतांना बसला राहील्याने बोहरु(पकडण्या करीता आलेले घोडेस्वार)येऊन पोहचून गेले.तेथे घाटमदास संध्या करत बसलेला दिसला आणि घोडा जवळच्या झाडाला बांधलेला दिसला.परतु राजाचा घोडा काळा होता.त्या घोड्याचा रंग बदलून तो या घोडेस्वारांना पांढरा दिसू लागला.म्हणून ते चुपचाप तेथे उभे राहीले.घाटमची संध्या झाल्यावर घाटमने त्यांना विचारले काय इकडे कोठे आले?ते बोलले,आमच्या राजाचा घोडा तर काळा होता आणि हा घोडा पांढरा आहे.घाटम म्हणाला की हा घोडा तुमचाच आहे,हा तुमच्या तबेल्यात घेऊन जाऊन बांधा,मग काळा होऊन जाईल.।।५।।

**लोधे ध्रम दया कद पाळी ।। पकड प्रभू बस करिया हो ।।६।।**

आणि लोधा(शिकार करणारा,हत्या करणारा)होता.त्याने दया आणि धर्म कधी पाळले नव्हते.की प्रभुला पकडून आपल्या वश करुन गुदेच्या वरतून तीरने मारत,तपस्वीच्या समोर आणले.एका वनात एक तपस्वी मौन धारण करुन बसलेला होता.तेथे हा लोधा ही शिकार खेळत-खेळत तिकडे गेला.तेथे त्याने(लोधाने)त्या तपस्वीला ध्यानात बसलेला पाहून.हा ही माझ्या सारखा कोणी शिकारीच आहे असा विचार केला.त्या तपस्वीवर या लोध्याला दया आल्याने,हा का बसला आहे.असे विचारण्या करीता त्याच्या जवळ गेला आणि तपस्वीचा भुजा(बाजू)पकडून हलवू लागला आणि त्या तपस्वीचे ध्यान सोड्वून जागवले.त्या तपस्वीला लोधा विचारु लागला की,तुम्ही येथे जंगलात कशासाठी येऊन बसले आहात.तुमच्याजवळ कपडे काहीही नाही,तर तुम्हाला कोणी चोराने लुटून घेतले का?का तुम्ही घराच्या माणसांशी रुसून येऊन बसले आहे का? का तुमच्या पत्नीने,तुम्हाला काही म्हटले का?ज्यामुळे तुम्ही येथे येऊन बसले आहात? तुमची पत्नी आणि धन्या-सुन्या कोठे आहेत?हे बोलून सांगा. तुमच्याजवळ धन्या-सुन्या नसेल तर माझी धन्या-सुन्या तुम्हाला देऊन देतो.तुम्ही शिकारी करीता बसले असाल तर मी तुम्हाला जिवंत दोन प्राणी पकडून आणून देतो.तुम्ही म्हणाल तर प्राणी मारुन तुमच्याकरीता आणून देतो.अशाप्रकारे लोधा त्या तपस्वीला खुप आपले पणाने विनंती करु लागला.तेंव्हा तपस्वीने मनात विचार केला की,मी ध्यान करतांना हे काय विघ्न येऊन पड्ले.हा मला म्हणतो की पत्नी देतो,कपडे देतो,जिवंत प्राणी आणून देतो, मारुन आणून देतो.असे म्हणत आहे.त्याला तर काही ही सांगून याच्यापासून सुटकारा करुन घ्यायला हवा.नाही तर हा त्रास दूर होणार नाही.असा विचार करुन मौनव्रत सोडून तो तपस्वी त्या लोध्याशी बोलला,तुम्ही माझे भाऊ आहात.तुम्ही माझ्या मनासारखी गोष्ट सांगितली.तुम्ही मला एक प्राणी पकडून आणून द्या,ज्याला चार हात

आहेत आणि चार हातांमध्ये शंख,चक्र,गदा आणि पदम ज्याच्याजवळ असावे आणि पितांबर परिधान केलेले,ज्याच्या गळ्यात वैजंतीमाळा तसेच शिरावर मुकुट असावा असा फक्त एक प्राणी तु पकडून आणून दे.लोधा म्हणाला,असा प्राणी मी तुम्हाला सूर्यास्त होण्याच्या आधी आणून देईन. असा प्राणी मी तुम्हाला नाही आणला तर मी माझा जीव ही नाही ठेवणार,मी माझा प्राण देऊन देईल.असे बोलून तेथून तो निघाला आणि वनात,पहाडात शोधू लागला.प्राण्यांना पकडून-पकडून पाहू लागला.पकडलेल्या प्राण्यां जवळ चार हात,शंख,चक्र,गदा,पद्म नसल्या कारणाने दुसऱ्या प्राण्यांना पकडू लागला.इकडे संध्याकाळ होत आली.मग तपस्वीने सांगितलेला प्राणी, लोधाला मिळाला नाही.तेंव्हा तो लोधा आपला जीव मारण्याचा विचार केला की तीर आपल्या छातीत मारुन घेवू इतक्यात प्रभु,तिकडून धावत आले आणि बोलले,अरे,मरु नकोस,हे बघ मी येऊन गेलो आहे.तेंव्हा लोधाने त्यांच्याजवळ शंख,चक्र,गदा,पदम तपस्वीने सांगितल्या नुसार सर्व वस्तु पाहून त्याच्याच पितांबराला त्याच्या गळ्यात बांधून,आपल्या स्वाधीन केले आणि एका हातात त्याच्या गळ्यात बांधलेला,पितांबर पकडला आणि दुसऱ्या हातात तीर घेवून त्या तीरने त्याच्या गुदेवर मारुन मारुन म्हणू लागला. चल-चल, लवकर चल,दिवस बुडून जाईल.मी दिवस बुडण्याच्या आधी तुम्हाला प्राणी आणून देईल, असा वादा करुन मी आलो आहे,दिवस बुडून गेला तर माझा वादा तुटून जाईल.असे म्हणत जातो आणि तीर ने मारत जात होता अशा तऱ्हेने मारत मारत त्याला तपस्वीच्या आसनावर आणून बोलला की,हा घ्या तुमचा प्राणी,मग तपस्वी बोलला अरे,हा प्राणी नाही भगवान आहे,यांच्या पायांवर पडून दर्शन घे.अशाप्रकारे तो लोधा ही भक्त होऊन गेला.।।६।।

**झुटा फळ शिबरी का खाया ।। कब चोका चित धरिया हो ।।७।।**

शबरीने(भिल्लणीचे)उष्टे बोर खाल्ले(त्या शबरीने)केंव्हा चौका लावला होता आणि कधी चित्ततातही आणले होते का की(चौका लावल्या शिवाय प्रभु फळ खाणार नाही)।।७।।

**जळती अगन में मिनिया राख्या ।। राम पुकारी श्रीया हो ।।८।।**

आणि जळत्या आगीत मांजरीचे पिल्ले कसे वाचविलेत.(त्या मांजरीच्या पिल्लांनी तर आपल्या मुखाने राम नाम म्हटले नव्हते)हे राम नाम दुसऱ्यांने श्रीयादे कुंभारीणने म्हटले होते,तीच श्रीयादे नंतर प्रल्हादाची गुरु झाली.या श्रीयादेच्या राम म्हटल्याने आँवा(भट्टीच्या आगीत मांजरीचे पिल्ले सुरक्षित राहून गेले) ।।८।।

**कीता सेना सजन कसाई ।। पतत अनेकाँ तिरीया हो ।।९।।**

हे तर काय परंतु यांच्यापेक्षाही पतीत,कीता,सेना(न्हावी)आणि सजन कसाई असे अनेक पापी तरुन गेले.।।९।।

 || राम नाम लो, भाग जगाओ ||

**क्हे सुखराम नाम हे अेसा ।। करणी बीना ऊधरीया हो ।।१०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे नाम असे आहे.या नामाने अनेक पतीत,वाईट करणी करणारे चांगली करणी केल्याशिवाय ही त्यांचा उध्दार होऊन गेला.।।१०।।

३४०

।। पदराग बिहगडो ।।

**संतो भाई अेसा नाम कहावे**

**जे कोई समज सुळज ऊर धारे ।। सब सुख हाजर आवे ।।टेर।।**

संतो भाई सृष्टी कर्ता हा सर्व सुखांचा कर्तार आहे.हे समजून म्हणजे सुलझून कोणी संत कर्त्याचे नाव हृदयात धारण करेल तर ते नाव धारण करणाऱ्या संताला सर्व सुख आणून आणून हजर करेल. ।।टेर।।

**ओर सकळ बिध करणी साध्या ।। अेक अेक फळ लागे ।।**

**निज तत्त नाव अरध ऊर धाऱ्या ।। अनंत असंख फळ जागे ।।१।।**

कर्त्याचे नाव सोडून आणि सर्व मायेच्या करण्यांच्या विध्या साधल्याने ज्याची ज्याची साधना कराल त्या त्या करणीचे जे जे फळ आहे ते लागेल परंतु कर्त्याच्या नावासारखे सर्व सुख हजर होणार नाही.कर्त्याचे नाव म्हणजे निजतत्ताचे नाव हृदयात धारण केल्याने मायेच्या करण्यांनी प्रगट होणारे ३ लोक १४ भवनाचे सर्व अनंत असंख्य सुखाचे फळ जागृत होतात. ।।१।।

**जो जन ब्रम्ह भेद उर लेवे ।। सहज राम मुख बोले ।।**

**तां जन लार नवो निध मुगती ।। सिध्द सकळ संग डोले ।।२।।**

जो संत सतस्वरुप ब्रम्ह प्राप्त करण्याचा भेद हृदयात धारण करेल म्हणजे सहजात रामनाम मुखाने बोलेल त्या संताच्या मागे अष्ट सिध्दी नऊ निधी तसेच काळाच्या दु:खातून सदाकरीता सुटका करणारी मुक्ती इ.सर्व आजूबाजूला हिंडेल/डोलेल. ।।२।।

**जे इतबार नहिं कोई  मानो ।। भागवत सुण जाई ।।**

**बाष्ट मुनि रिष विश्वामित्र ।। अड जीत्यो कुण भाई ।।३।।**

जर तुम्हाला या गोष्टीचा भरवसा नाही तर भागवत जावून ऐकून घ्या कर्त्यांच्या नावाचा भक्त वशिष्ठमुनी व मायेचा भक्त विश्वामित्रमध्ये आढी पडल्यावर जिंकला कोण? विश्वा मित्राच्या साठ हजार वर्षाच्या कडक तपश्चर्येने पृथ्वीचे ओझे थोडेसेही कमी झाले नाही तेच ओझे विशवामित्राला वशिष्ठ मुनीने दिलेल्या पावपळाच्या सतस्वरुपाच्या संगतीच्या बळाने थोडेसेही राहिले नाही.।।३।।

**सुर नर सेंस सकळ जस बोले ।। करम भस्म सब होई ।।**

**केहे सुखराम भक्त करतां की ।। जो जन धारे कोई ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की स्वर्गाचे सर्व देवता,मृत्युलोकाचे सर्व मनुष्य तसेच नागलोकाचे सर्व लोक कर्त्यांची भक्ती धारण करणाऱ्याचे यश गातात व बोलतात की कर्त्याची भक्ती करणाऱ्याचे सर्व काळरुपी कर्म भस्म होऊन जातात व तो संत काळापासून मुक्त होवून अनंत असंख्य सुखांचे फळ प्राप्त करतो. ।।४।।

२४

।। पदराग जोग धनाश्री ।।

**अणंद लोक तोरे बंदा वे हंस जासी**

**अणंद लोक तोरे बंदा वे हंस जासी ।। सतगुरां जीरा जस गावे बे ।।**
**मिलीया हरख बिछड़ीयां ऊदासी ।। हियो छिल छिल आवे बे ।।टेर।।**

अरे मनुष्य,आनंद लोकात तर ते हंस जातात जे सतगुरुचा प्रताप समजून त्यांची महिमा गातात.त्यांचे यश गातात.अशा सतगुरुंशी भेटल्यावर ज्या हंसाला हर्ष होतो व वियोग झाल्यावर दु:ख होते ते आनंदलोकात जातात.ज्यांचे हृदय सतगुरुच्या भेटीकरीता तडपते ते आणंदलोकात जातात.जे मायेच्या सुखांकरीता तडपतात ते आणंदलोकास कधी पोहचत नाही.।।टेर।।

**सतस्वरूप मिलणे कूं सत हे ।। वे प्रेम नेम बिना भारी बे ।।**
**लागी रे चोट सब्द की तनमें ।। बिसर गई सुध सारी बे ।।१।।**

सतगुरु भेटल्यावर हर्ष आणि वियोग झाल्यावर उदासी तसेच सतगुरु भेटल्यावर पळा पळात हृदयात सुख सतगुरुचा वियोग झाल्यावर पळापळात हृदयात दु:ख भरुन येते. फक्त हिच विधी सतस्वरुप घटात सतस्वरुप प्रगट करण्याकरीता सत्य आहे.ही विधी सतगुरुशी प्रेम येणे.सतगुंरुचे जगात बनविलेले नियम पाळणे यापेक्षा भारी आहे.अशी वेगवेगळी आहे.अशा शिष्याला जेंव्हा सतगुरुच्या शब्दांची चोट(मार)लागते.तेंव्हा त्या शिष्याच्या सर्व शुध्दी आणि बुध्दीचा विसर पड्तो. ।।१।।

**लाख बात की अेक बात हे ।। प्रगट कहूं बजाई बे ।।**
**सतगुराजी सूं मन धुजण लागो ।। जब बणसी घट मांई बे ।।२।।**

लाख गोष्टची एक गोष्ट आहे.ती गोष्ट मी प्रगट बजावून सांगतो.जेंव्हा हे मन सतगुरुशी आनंद लोक प्राप्त करण्याकरीता व्याकुळ होईल व सतगुरु माझ्यावर कोणत्या कारणाने रुसून गेले तर मला आनंदपद कधी मिळू शकणार नाही.याकारणाने ज्या शिष्याचे मन धुजु लागेल तेंव्हा घटात आनंदपद प्राप्त करण्याची गोष्ट बनेल. ।।२।।

**जाँ गुरां संग नाँव घट जागे ।। वे सतगुरू सिर धारो बे ।।**
**ज्ञान ध्यान दूजा गुरू झुटा ।। से सब दूर बिडारो बे ।।३।।**

जगात गुरु अनंत आहेत.त्याच्यात ने:अक्षर नाव घटात जागृत करुन देणारे विरळेच आहेत. म्हणून कोणी ही कानफूंका गुरु न करता ज्या सतगुरु पासून ने:अक्षर नाम घटात

जागृत होते व हंसाला आनंदलोकात जाता येते ते सतगुरु शिरावर धारण करा.मायेचे सर्व ज्ञान,ध्यान सांगणारे गुरु त्यागा.ते घटात नाम प्रगट करुन देण्यात असमर्थ आहे, खोटे आहे,ते बोलण्याचे गुरु आहे म्हणून अशा सर्व गुरुं त्यागा,दूर ठेवा.।।३।।

**के सुखराम सोई जन साचा ।। साचा सतगुरू जावे बे ।।**
**करणी बीना नाँव घट जागे ।। अखंड ऊजाळा होवे बे ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जगात तेच संत खरे आहेत जे घटात नाम प्रगट करवून देणाऱ्या खऱ्या सतगुरुच्या शरणात जातात.अशा सतगुरुच्या दयेने मायेची कोणती क्रिया करणी न करता आनंदलोक पोहचविणारे नाम घटात प्रगट होते व प्रगट झालेल्या नामाने पूर्ण घटात अखंडित ऊजेड होतो. ।।४।।

४२३
।। पदराग जोग धनाश्री ।।

**या जग मे तो रे बंदा वे बड़ भागी**
**या जग मे तो रे बंदा वे बड़ भागी ।। सतगुरू जकाँही पीछाण्या बे ।।**
**केस बराबर अंतर नाही ।। ज्यां निजमन कर जाण्या बे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले अरे बंदा,अरे मनुष्य,या जगामध्ये ज्यांनी सतगुरु ओळखले आहे व सतगुरुशी एक केसही अंतर ठेवले नाही आहे व ज्यांनी निजमनाने सतगुरुला ओळखले तेच बडभागी(मोठे भाग्यवान)आहे अन्य सर्व मोठे अभागी आहे. ।।टेर।।

**म्हेरी स्हेत तन मन धन कुं ।। ले गुरू च्रणा आण्या बे ।।**
**बचन कहे सो सब सत माने ।। ज्यां गूरू ध्रम पीछाण्या बे ।।१।।**

पत्नीसहित तन,मन,धन सर्व गुरु चरणात लावले आहे व गुरु जे ही वचन बोलतात त्याला विश्वास ठेवून सत्य पकडून मानतो त्याने गुरु धर्म ओळखला आहे. ।।१।।

**गंगा जमना उलटी ब्हे चाले ।। भाण पिछम कूं ऊगे बे ।।**
**तो पण मन चिले नही मासो ।। तब घट प्रचो पूंगे बे ।।२।।**

गंगा,यमुना,धरती,पहाडावर चढून उलटी वाहू लागली.सूर्य पश्चिमेकडून उगवला तरीही सतगुरु भवसागरातून तारतील याच्या विश्वासात मासाभर ही मन कमी होत नाही तेव्हा सतगुरुचा पर्चा–चमत्कार घटात प्रगटतो. ।।२।।

**अक बक पेम नेम सब छूटा ।। जग मरजाद न काई बे ।।**
**गुरू बेच्यो तो बिकणे लागो ।। तब सिष साचो भाई बे ।।३।।**

सतगुरुशी अकबक प्रेम प्रगटते त्या प्रेमात जगाची सर्व शुध्द विसरुन जातो.जगाचे कोणते नियम किंवा मर्यादा ठेवू शकत नाही व गुरुने विकून टाकले तर विकला जातो व विकल्यावर मनात आनंदाने फुलून जातो अशा शिष्याला खरा शिष्य म्हणतात. ।।३।।

सतस्वरूप आणंद पद कहीये ।। सो नहि माने कोई बे ।।
अेसो नेह गूरां सू घूळियो ।। निमष न न्यारो होई बे ।।४।।

ज्या शिष्याच्या मनाला सतगुरुहुन मोठे सतस्वरुप,आनंदपद आहे हे मंजुर होत नाही व सतगुरुच्या प्रेमात इतका मिसळून जातो की तो क्षणभर ही गुरुपासुन वेगळे(वियोग) होऊन राहू शकत नाही असा शिष्यच अस्सल शिष्य आहे. ।।४।।

आयां ऊठ खड़ो हुवे आगे ।। ऊंठया के संग ऊठे बे ।।
छाडर नेम पेम उर उपजे ।। जब सब गांठया फूटे बे ।।५।।

सतगुरु आले तर उठून सतगुरुच्या समोर उभा राहतो.ते बसल्यानंतर बसतो व ते जेव्हा उठतात तेव्हा त्यांच्या सोबत उठतो हे सर्व नियम सतगुरुच्या प्रेमाच्या धुंदीत विसरुन जातो तेव्हा मनाच्या भ्रमाच्या सर्व गाठी फुटतात. ।।५।।

जब गुरूदेव सूज्या हे साहेब ।। तब अेसा अंग आवे बे ।।
सुण सुण ग्यान नेम अे पकड़े ।। से सब ढ्रडी क्वावे बे ।।६।।

जेव्हा गुरुदेवच साहेब आहे,सतस्वरुप आहे,आनंदपद आहे हे शिष्याला सतज्ञानाने दिसते तेव्हा शिष्याचा जाऊन असा स्वभाव होतो.जो जगाच्या सारखा सतगुरुचे ज्ञान ऐकून ऐकून राजा बादशहा सोबत जगाचे नियम पाळतो व तसे सतगुरु सोबत उठ बैस करण्याचे नियम पाळतात ते मेंढी स्वभावाचे आहे.जसे एक मेंढी दुसऱ्या मेंढीच्या मागे विचार न करता चालते व जशी पहिली मेंढी चालता चालता विहिरीत पड्ते तशीच दुसरी ही मेंढी तिच्या मागे विहिरीत पडून जाते आता ती पाण्यात फुलून मरेल हा विचार करत नाही की पहिली मेंढी विहिरीत पडली म्हणून मी तिच्या मागे जाऊन पडू नये हा विचार करत नाही. ।।६।।

के सुखराम नेम तो सारा ।। जग मज्रादा होई बे ।।
याँ सूं तो सत्त साहेब नही रीजे ।। ब्होत जनम लग कोई बे ।।७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,राजा बादशहासारखे सतगुरु आले तर उठून सतगुरुच्या समोर जाणे,त्यांनी बसल्यानंतर बसणे ते ते उठतात तेव्हा त्यांच्या सोबत उठणे हे राजा बादशहाचे नियम मर्यादा आहे.असे सतगुरुंचे काही नियम राहत नाही.हे नियम पाळल्याने सतगुरु जन्म जन्मापर्यत ही कधी प्रसन्न होत नाही.सतगुरु तर शिष्यामध्ये प्रगट झालेल्या अकबक प्रेमाने प्रसन्न होत नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।७।।

३३
।। पदराग आसा ।।

बांदा अणंद ब्रम्ह याँसूंइ आगे
वाँ सूं अजे अेक नही आयो ।। ना अब आयर जागे ।।टेर।।

बांदा आनंद ब्रम्ह हा होणकाळ ब्रम्हच्या पुढे आहे.तेथून आजपर्यंत होणकाळात ज्या प्रकारे हंस जगात आले तसे एक ही हंस आनंदब्रम्हतून आला नाही आणि पुढेही कोणीही निश्चितच येणार नाही. ।।टेर।।

**हुणकाळ सो ईश्वर कहीये ।। वाँ की अंछया सत्ती ।।**
**ब्रम्ह ब्रम्ह कर सबने गायो ।। आ हुणकाळ की भक्ती ।।१।।**

परापरीपासून आनंदब्रम्ह आणि होणकाळ ब्रम्ह असे दोन ब्रम्ह आहे.होणकाळ ब्रम्ह सोबत इच्छा शक्ती ही माया आहे.जगात जसे गुहस्थी जीवनात पुरुषा सोबत स्त्री असते. या कारणाने होणकाळब्रम्ह ही गृहस्थी आहे व आनंदब्रम्ह सोबत इच्छा माया ही स्त्री कधी राहत नाही.या कारणाने आनंदब्रम्ह हा वैरागी आहे,गृहस्थी नाही.सर्व ज्ञानी, ध्यानी होणकाळ ब्रम्हला सृष्टी रचणारा ईश्वर मानतात आणि वैरागी ब्रम्ह ब्रम्ह करुन त्याची भक्ती करतात. ।।१।।

**हुणकाळ सूं सब कुछ हूवा ।। फेर हुणो सोई होवे ।।**
**प्रगट अरथ जक्त के माही ।। ग्यानी कोय न जोवे ।।२।।**

होणकाळापासून ३ लोक १४ भवन,ब्रम्हा, विष्णू,महादेव,शक्ती,अवतार आणि मनुष्य इत्यादी सर्व माया झाली आणि पुढे ही अशाचप्रकारे सर्व माया होत(निपजत)राहील.हे जगातील सर्व ज्ञानी,ध्यानी प्रगट रुपाने जाणतात.तरीही त्याला वैरागी ब्रम्ह समजून ब्रम्ह ब्रम्ह करुन गातात म्हणजे त्याला प्राप्त करण्याची विधी करतात हा वैरागी नाही,मायेत रचमचलेला आहे,असे कोणीही ज्ञानी सतज्ञानाने परखण्याची प्रयत्न करीत नाही.।।२।।

**हुणकाळ को मन ओ चेतन ।। अंछया सत्ती होई ।।**
**यां दोन्याँ मिल कियो पसारो ।। तीन लोक नव सोई ।।३।।**

होणकाळाचे मन चेतन आहे व त्याची इच्छा शक्ती ही अचेतन माया आहे.हे कसे?(देहात जीव चेतन आहे आणि जीव वजा देह हा अचेतन आहे.)अशाचप्रकारे होणकाळ हा चेतन इच्छा माया ही अचेतन आहे.होणकाळ चेतन आणि अचेतन इच्छा माया या दोघांनी मिळून ३ लोक १४ भवन आणि ३ ब्रम्हच्या १३ लोकाचा पसारा केला.।।३।।

**सब अवतार सुणो सब कोई ।। हुणकाळ सूं आवे ।।**
**अणंद लोक मे उप्तत नाही ।। गांठ पोटो ले क्वावे ।।४।।**

रामचंद्र,कृष्ण पकडून सर्व मायेत झालेले पराक्रमी अवतार होणकाळातून आले आनंदब्रम्ह मधून ते कधी नाही आले.जसे उसाच्या झाडाला गाठ तसेच रसाचा भाग असतो तेथून नविन उसाच्या झाडाची उत्पत्ती होते.रसाच्या भागापासून नविन उसाची कधी उत्पत्ती होत नाही.म्हणजे गाठीत उत्पत्ती आहे.रसात उत्पत्ती नाही.म्हणजेच होणकाळब्रम्ह हा गाठी सारखा आहे आणि आनदंब्रम्ह हा रसासारखा आहे.अशाप्रकारे सर्व अवतार

जेथून सर्वांची उत्पत्ती झाली त्याच होणकाळ पदातून आले.आनंदब्रम्ह मधून आजपर्यंत कोणाची उत्पत्ती झाली नाही.म्हणजेच अवतारांची ही उत्पत्ती आनंदब्रम्हमधून झाली नाही होणकाळ ब्रम्ह मधूनच झाली. ।।४।।

**होणकाळ ने सबही कीया ।। फेर करे सो होई ।।**
**अणंद ब्रम्ह करे ना कीया ।। निर्भे पद वो जोई ।।५।।**

सर्व मायेची रचना होणकाळाने केली आणि पुढेही करीत राहील.आनंदब्रम्ह विज्ञान स्वरुप आहे.विज्ञानात माया राहत नाही.म्हणून आनंदब्रम्हने आजपर्यंत माया बनविली नाही आणि पुढेही बनविणार नाही.जसे माया काळाच्या मुखात आहे.परंतु त्याच्याच विपरीत आनंदब्रम्ह काळाच्या पलिकडे आहे म्हणून आनंदब्रम्ह मायेसारखा काळाच्या भयात नाही.काळापासून भयरहीत आहे,निर्भय आहे. ।।५।।

**सब ही ग्यानी कहे सुण असी ।। अणंद लोक जे जावे ।।**
**से हंसा सब बोहोर जक्त मे ।। सपने ग्रभ न आवे ।।६।।**

सर्व जगातील ज्ञानी हे सांगतात,आनंदलोकास जे हंस जातात ते हंस स्वप्नातही गर्भात येत नाही.म्हणजे मायेच्या जगात कधीही देह धारण करीत नाही. ।।६।।

**जे पेलीसूं कोई हंसो आयो ।। तो अब क्यूं नही आसी ।।**
**देख्या ग्यान सकळ ही सोध्या ।। उलटी सब कूं भ्यासी ।।७।।**

जसे होणकाळ ब्रम्हतूनच आदि पासून सर्व हंस आले मग परत त्यालाच आनंदब्रम्ह समजून त्याची भक्ती करुन त्याच्यात सामावल्याने परत मायेत कसे नाही येणार?सर्व ज्ञान मी शोधले.सर्व ज्ञानी हेच म्हणतात की,आदिपासून जेथून आले त्या ब्रम्हची साधना करुन तेथे किती वेळाही पोहचले तरी तो हंस गर्भात येईल आणि जगात काळाचे दु:ख भोगेल.परंतु ज्ञानी जेथून आदिपासून आले तेथे मायेमधून आता पोहचल्या नंतर परत येत नाहीत.अशी उलटी समज करुन होणकाळ ब्रम्हची भक्ती करतात आणि जेथून आदि पासून आले त्याच पदात परत जाऊन पोहचतात आणि निर्भय बनून राहतात की,आम्ही परत मायेत काळाचे दु:ख भोगण्यास येणार नाही. ।।७।।

**अणंद ब्रम्ह नांव ईण कारण ।। वाँ सूं कोयी न आया ।।**
**हुणकाळ सो जब कहाणा ।। सब हुणे गुण भाया ।।८।।**

एक ब्रम्हचे नाव आनंदब्रम्ह याकरीता पडले की तेथे गेल्यानंतर गर्भाच्या दु:खात यावे लागत नाही आणि मायेचे शरीर धारण करावे लागत नाही.तसेच काळाचे जुलूम सहन करावे लागत नाही आणि आनंदच आनंद भोगतो.आजपर्यंत आनंदब्रम्हमधून कोणी आला नाही.जसे आज पर्यंत तेथून कोणी आले नाही तर आज ही तेथे पोहचल्या नंतर तेथून येथे कसे येणार?तेथून कधी येणार नाही.दुसऱ्या ब्रम्हचे नाव होणकाळ ब्रम्ह याकरीता

पडले की होनकाळानेच सर्व सृष्टीची रचना केली म्हणजे त्याच्यात सृष्टी उत्पत्तीचा गुण आहे.समयानुसार ते वेळेनुसार सृष्टी बनवितो आणि वेळेनुसार मिटवितो.तो उत्पत्ती करतो.तेंव्हा कर्तार ईश्वर बनतो आणि मिटवितो.तेंव्हा काळ बनतो असा ईश्वर होऊन वेळेनुसार काळ बनतो म्हणून त्याला होणकाळ ईश्वर म्हणतात.।।८।।

**ब्रम्ह कहे सो जक्त बरोबर ।। होणकाळ गुरू कुवावे ।।**
**अणंद ब्रम्ह सतगुरू सम होई ।। ज्यां गयो बोहोर नही आवे ।।९।।**

सर्व तीन ब्रम्ह आहेत.जे जगात माया धारण करुन जीव ब्रम्ह आले आहेत ते जीवब्रम्ह आहेत.तसेच जो सृष्टी रचना करतो तो होणकाळ ब्रम्ह गुरु आहे.तसेच जो मायेची सृष्टी बनवित नाही.तो आनंदब्रम्ह सतगुरु सारखा आहे.असे सर्व जीव ब्रम्ह आहेत.होणकाळ ब्रम्ह गुरु आहे आणि आनंदब्रम्ह सतगुरु सारखा आहे. ।।९।।

**होणकाळ सो चेतन कहिये ।। नख चख व्यापक होई ।।**
**ब्रम्ह कहो सो म्हेल त्रुगटी ।। काम नाद कऊँ तोइ ।।१०।।**

होणकाळ ब्रम्ह चेतन स्वरुप आहे.तो सर्वांच्या शरीरात नखापासून चखापर्यंत व्यापलेला आहे.जीवब्रम्ह हा शरीरात नखापासून चखापर्यंत व्यापलेला राहत नाही.तो त्रिगुटी म्हणजे भृगुटी महालात राहतो आणि गर्भात आल्यानंतर मिळालेल्या शरीराच्या कंठात राहतो त्या ब्रम्हमध्ये कामवासना असते म्हणून त्याला कामनाद म्हणजे कामब्रम्ह म्हणतात.।।१०।।

**दसवेद्वार आगे सब सुण ज्यो ।। अनहद ब्रम्ह सो होई ।।**
**होणकाळ सो बजरपोळ सिर ।। ब्रम्ह त्रुगटी जोई ।।११।।**

अशाप्रकारे शरीराच्या दहाव्याद्वाराच्या बाहेर आनंदब्रम्ह आहे,शरीरात दहाव्याद्वाराच्या खाली वज्रपोळ आहे.म्हणजे सिध्दशिळा आहे अशा वज्रपोळ म्हणजे ब्रम्ह आणि शरीराच्या त्रिगुटीत जीवब्रम्ह राहतो.।।११।।

**दसवेद्वार आगे सुण जायर ।। पूँत जणावे भाई ।।**
**तो आ मांड सुणो सब ग्यानी ।। अणंद लोक सूं आई ।।१२।।**

स्त्रीच्या दहाव्याद्वाराच्या पुढे म्हणजे शरीराच्या बाहेरुन आजपर्यंत कोणताही पुत्र जन्मला नाही आणि आनंदब्रम्ह हा दहाव्याद्वाराच्या बाहेर आहे.याचा अर्थ आनंदब्रम्ह पासून कोणी पुत्र म्हणजे जीव जन्मत नाही.जर कोणी पुत्र दहाव्याद्वाराच्या बाहेरुन जन्मत असता तर ही सर्व सृष्टी ही आनंदब्रम्हपासून जन्मली हे सर्व ज्ञानी ज्ञानाने समजा.।।१२।।

**दसवेद्वार सूं ज्युं सब पेदा ।। होणकाळ सूं जोई ।।**
**अणंद ब्रम्ह द्वार दस आगे ।। वहाँ उत्पत नही कोई ।।१३।।**

याकारणाने दहाव्याद्वारापासून सर्व पैदा झाले आहेत आणि दहाव्याद्वारात होणकाळ ब्रम्ह राहतो म्हणजे होणकाळापासून सर्व पैदा झाले आहेत.आनंदब्रम्हपासून नाही कारण आनंद

ब्रम्ह दहाव्याद्वाराच्या पलिकडे आहे. ।।१३।।

जक्त माय सूं जे जन होवे ।। तो पाछो जक्त न होई ।।
ना जन माँय सूं जक्त निकसी ।। यूं आणंद ब्रम्ह कहुं तोई ।।१४।।

जसे कोणी मनुष्य जगात गृहस्थी न बनता वैरागी साधू बनतो आणि ज्ञान आनंदात मग्न राहतो.तो साधून परत कधी संसारी बनत नाही.तो कधी संसारी बनत नाही.म्हणून त्याच्यापासून पुत्र–पुत्री जन्मत नाही.अशाप्रकारे आनंदब्रम्ह हा आदिपासून वैरागी आहे. याकारणाने त्याच्यापासून सृष्टी उपजत नाही. ।।१४।।

सब अवतार जक्त के माही ।। हुणकाळ से आया ।।
वाँ सूं जक्त हुई सब पेदा ।। आदू वाँ से भाया ।।१५।।

म्हणून जगातील सर्व अवतार होणकाळा पासून पैदा झाले आनंदब्रम्ह पासून नाही म्हणजे आदिमध्ये जेथून सर्व जगत पैदा झाले तेथून सर्व अवतार पैदा झाले. ।।१५।।

राम किसन सो राजा हूवा ।। तीन लोक का भाई ।।
करता अेक जक्त अर याँरो ।। होणकाळ सब माई ।।१६।।

अवतार रामचंद्र,कृष्ण हे तीन लोकाचे राजे झाले परंतु जसे जगाच्या मनुष्याचा कर्तार होणकाळ आहे तसेच रामचंद्र आणि कृष्णाचा कर्तार ही होणकाळ आहे.त्यांचा कर्तार जगातील मनुष्यांचा कर्तारापेक्षा वेगळा नाही.म्हणजेच जगासारखे रामचंद्र आणि कृष्ण ही होणकाळच आहे.म्हणजे रामचंद्र आणि कृष्ण जगातील लोकांच्या बरोबरच गर्भ आणि काळाचे दु:ख भोगण्यात अटकले आहे. ।।१६।।

जग क्रतार कहे इण गुण सूं ।। दाणूं पटक्या सोई ।।
ब्रम्हा बिस्न महेसर खसिया ।। याँ सू मुवा न कोई ।।१७।।

रामचंद्र,कृष्ण इत्यादींना संसाराचा कर्तार याकरीता म्हणतात की,३ लोकाचे मालक ब्रम्हा,विष्णु,महादेवाने अति प्रयत्न केल्यानंतरही जे राक्षस मारले गेले नाही ते राक्षस रामचंद्र आणि कृष्ण इत्यादी अवतारांनी सहजात मारले म्हणून त्यांना ३ लोकांचा कर्तार म्हणतात. ।।१७।।

ज्यूं राजा सूं कहे सब दुनिया ।। तुम ईश्वर औतारा ।।
इण पड्छे रघुनाथ किसन कूं ।। जग कहे करतारा ।।१८।।

जसे राजाला त्याच्या राज्याची प्रजा ईश्वर अवतार म्हणते म्हणजे राज्याचा कर्तार म्हणतात.अशाचप्रकारे रघुनाथ,किसन ने ही मोठ–मोठे राक्षस मारुन ३ लोकांची रक्षा केली म्हणून त्यांना ईश्वर अवतार म्हणजे करतार म्हणतात. ।।१८।।

कर्ता को बिड्द छाजे इन कूं ।। क्रता ढिण सूं आया ।।
पिण सतगुरू किण कीया व्हे जग मे ।। तो मुज कूं कहो भाया ।।१९।।

रघुनाथ किसनला कर्तारिचे पद शोभते ही कारण ते सर्व सृष्टीचे होणकाळ कर्तारपदातून जगात आले आहेत.ते आनंदब्रम्ह सतगुरु,पदातून आले नाही.म्हणून त्यांना सतगुरुचे पद शोभत नाही.जे आनंदब्रम्ह सतगुरु पदातून सतगुरु पद घेऊन येतात त्यांनाच सतगुरुचे पद लागते.म्हणून सर्व अवतार होणकाळात जसे अन्य सर्व लोक आहेत तसेच अवतार ही होणकाळी लोकांमध्येचे येतात.अन्य मनुष्यांमध्ये आणि अवतारी मनुष्यामध्ये मायेच्या पराक्रमाचा फरक आहे.होणकाळ आणि आनंदब्रम्ह असा फरक नाही. ।।१९।।

**अणंद ब्रम्ह सतगुरू सम होई ।। होणकाळ जग लोई ।।**

**यूं राम कीसन सूं हरजन इधका ।। मुढ न जाणे कोई ।।२०।।**

याकरीता हरीजन जे आनंदब्रम्हची सत्ता घेऊन येतात.ते रामचंद्र आणि कृष्ण जी होणकाळाची सत्ता घेऊन आले आहेत.त्यांच्यापेक्षा अधिक पराक्रमी आहेत.म्हणजे रामचंद्र आणि कृष्णाची भक्ती केल्याने होणकाळापर्यंतची पदवी मिळते.परंतु काळ सुटत नाही.आणि हरीजनाचा शरणा घेतल्याने काळ सुटतो.असा हरीजन रामचंद्र आणि कृष्णापेक्षा काळापासून मुक्त करण्याकरीता पराक्रमी आहे.परंतु मुर्ख लोक हरीजनात रामचंद्र आणि कृष्णापेक्षा काळापासून मुक्त करण्याचा अधिक पराक्रम आहे हे जाणत नाही उलट सर्वसाधारण मनुष्यासारखे समजतात. ।।२०।।

**राम किस्न की भक्ती जग मे ।। होणकाळ लग जावे ।।**

**जो कोई पचे ब्होत बिध भाई ।। तो उपज्यो ज्हाँ समावे ।।२१।।**

रामचंद्र आणि किसनला सगुण समजून भक्ती करणारे जगातील सर्व स्त्री-पुरुष होणकाळाच्या मायेच्या पदात पोहचतात.ते महासुखाच्या आनंदब्रम्हमध्ये कधी पोहचत नाही.तसेच रामचंद्र आणि कृष्णाला ब्रम्ह समजून खुप पचून-पचून ब्रम्ह-ब्रम्ह करुन गातात.ते जास्तीत जास्त होणकाळाच्या ब्रम्ह पदात पोहचतात.म्हणजे ज्या होणकाळ ब्रम्हच्या पदातून येऊन मायेत उपजले त्या होणकाळ ब्रम्हपदात जाऊन सामावतात. आनंदब्रम्ह पदात जात नाही. ।।२१।।

**नौद्या भक्त जक्त मे सारी ।। सो आत्म की होई ।।**

**जप तप भेद जोग सब साजन ।। होणकाळ लग जोई ।।२२।।**

विष्णूच्या नवविद्या भक्ती सारख्या,महेशचा भेद,ब्रम्हाचा सांख्ययोग,ब्रम्हाने वेदात सांगितलेल्या जप,तप,सर्व भक्त्या आत्म्याच्या भक्त्या आहेत पाच विषयांचे सुख प्राप्त करण्याच्या भक्त्या आहेत.म्हणून ह्या सर्व भक्त्या होणकाळाने पैदा केलेल्या सगुण मायेच्या पदातच पोहचवितात मायेच्या पलिकडे वैरागी आनंदब्रम्हमध्ये पोहचत नाही. ।।२२।।

**नाभ कंवळ मे नाद बीछडे ।। पिछम देस से जावे ।।**

फाड़र पीठ चडे. ने: अंछर ।। अणंद लोक वे जावे ।।२३।।

ज्यांचा नाद म्हणजे ब्रम्ह,५ आत्म्यापासून नाभीमध्ये वेगळे होतात(वियोग होतो)तेच हंस बंकनाळेच्या पश्चिमच्या रस्त्याने पाठीला फाडून त्रिगुटीहून आनंदलोकात पोहचतात. ज्यांनी–ज्यांनी आनंदब्रम्हच्या ने:अक्षराचा शरणा घेतला त्यांचाच नाद नाभीत ५ आत्मा या मायेपासून वियोग होतो.ज्याने–ज्याने ने: अक्षर सोडून होणकाळ ब्रम्ह किंवा त्रिगुणी मायेचा शरणा घेतला त्यांचा नाद पाच आत्मापासून कधी वेगळा होत नाही.म्हणून त्यांना आनंदलोकात पोहचविणाऱ्या पश्चिमचा रस्ता पकडता आला नाही.आनंदब्रम्हचा रस्ता न पकडता आल्या कारणाने आनंदलोकास कधी पोहचले नाही होणकाळातच राहिले. ।।२३।।

**पूरब घाटं चडे जिण जन के ।। बिंद न बिछडे कोई ।।**
**सक्त ब्रम्ह दोनु तहाँ भेळा ।। ज्हाँ लग पहूंचे सोई ।।२४।।**

जे संत पूर्व दिशेने भृगुटीत पोहचतात त्यांचा नाद म्हणजे ब्रम्ह बिंद म्हणजे ५ आत्मा मायेपासून वियोग होत नाही आणि तो संत जास्तीत जास्त माया आणि ब्रम्ह जेथे सोबत राहतात अशा होणकाळाच्या माया पदापर्यंत पोहचतात.पूर्व दिशेने जाणारा साधक ओअमची साधना करतो.ओअमची उपज इच्छामायेपासून झाली आहे. या कारणाने हा भृगुटीपर्यंत किंवा जास्त जोर लावला तर १००० पाकळीच्या कमळापर्यंत पोहचतो.सर्वा मध्ये ब्रम्ह पाहणारा साधक आधीपासून जेथून आले अशा पारब्रम्हच्या जीवब्रम्हच्या पदात पोहचतो.सोहम, जाप, अजप्पा जपणारा साधक होणकाळ पारब्रम्हमध्ये सिध्दशिळेच्या खाली जाऊन पोहचतात आणि ने:अक्षराचा साधक ने:अक्षरात म्हणजे सतस्वरुपात जाऊन पोहचतो म्हणजे ज्याची जेथून उपज आहे तो तेथपर्यंतच पोहचतो.।।२४।।

**आगे जाय सके नही कोई ।। दसवो व्दार नही फूटे ।।**
**फिर नर आण औतरे जुग मे ।। जम जुग जुग मे लूटे ।।२५।।**

यांच्याने दहावेद्वार फुटत नाही म्हणून पुढे आनंदब्रम्हमध्ये जाऊ शकत नाही.असे दहाव्या –द्वारात पोहचलेले हंस जगात शरीर धारण करतात असे दहाव्याद्वारापासून पलटून जगात शरीर धारण करणाऱ्या जीवाला यम युगानुयुग लुटतो.म्हणजे जुलूम करतो. ।।२५।।

**नही काम माया को संतो ।। ना आ जायन सक्के ।।**
**अणंद लोक मे ब्रम्ह पहूँचे ।। सक्ती धकी न धक्के ।।२६।।**

जीवब्रम्हच्या सोबतच्या ५ आत्मा या मायेचे आनंदलोक मध्ये काम नाही आणि ती माया आनंदलोकात जाऊ ही शकत नाही.आनंद लोकात फक्त ब्रम्हस्वरुप हंस पोहचतो. शक्ती म्हणजे हंस ब्रम्हची माया धक्का दिल्यावरही आनंदब्रम्हमध्ये जाऊ शकत नाही. ।।२६।।

जेसे अेक जक्त के माही ।। तोय द्रिष्टांग बताऊँ ।।
देवत अेक धार नर देही ।। नर के संग कर लाऊँ ।।२७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदाला सांगतात की,जगातील सर्वांना समजेल असा दृष्टांत सांगतो.एक मनुष्य आहे आणि एक देवता मनुष्याचे रुप धारण करुन मनुष्यासारखा मनुष्य बनतो.।।२७।।

देवत अेक मिनष देहे धर के ।। नर के संग होय आवे ।।
आगे भींत खड़ी गज गीरी ।। पार कहो कुण पावे ।।२८।।

मनुष्य आणि मनुष्याचे रुप धारण केलेली देवता सोबत चालतात.रस्त्यात हत्ती सारखी जाडी आणि उंच भिंत रस्ता पार करण्याच्या मध्ये आड्वी आलेली असते.अशी जाड आणि उंच भिंत मनुष्याच्या रुपात आलेला देवता पार करुन घेतो.परंतु मेहनत केल्यावरही मूळ मनुष्याच्या रुपात आलेला मनुष्य कधी पार करु शकत नाही. ।।२८।।

ग्यानी भेष सुणो सब भेदी ।। पुरब चड़या वो काचा ।।
ज्याँ सूं जीव आवियो जग मे ।। व्हाँ जाय आवे पाछा ।।२९।।

सर्व ज्ञानी,वेषधारी(जोगी,जंगम,सेवडा,संन्यासी,फकीर,ब्राम्हण)तसेच पूर्व योगाचे सर्व भेदी सर्व ज्ञानाने समजा.की पूर्वेचे चढलेले सर्व कच्चे आहेत.जेथून जीव मायेत आला आहे हे तेथेच पोहचतात आणि परत जसे जगात आधी आले होत तसे येतात.काळाचे दु:ख भोगतात.असे कच्चे आहेत. ।।२९।।

पूरब घाट चडे सो अंछर ।। जको नाद को होई ।।
पिछम दिसा चडे. ने: अंछर ।। सतस्वरूप को जोई ।।३०।।

पूर्व घाटात जीव ज्या शब्दासोबत चढतो तो शब्द होणकाळ नादपासून उपजला आहे आणि पश्चिम दिशेने हंस ज्या ने:अक्षरा सोबत चढतो ते ने:अक्षर सतस्वरुपासून प्रगटले आहे. ।।३०।।

पिछम दिसा चड़े सो अंछर ।। अटकण काह न पावे ।।
दसवाँ व्दार फोड सो निकसे ।। पाछो काहू न आवे ।।३१।।

सतस्वरुप दहाव्याद्वाराच्या पलिकड्डून घटात प्रगटला आहे.याकारणाने तो घटात म्हणजे ३ लोक १४ भवन तसेच ३ ब्रम्हचे १३ लोकांमधून कोणाच्या करामतीने अटकत नाही. ते ने: अक्षर घटात कंठ कमळात प्रगट होवून हंसाच्या घटाला ३ लोक १४ भवन तसेच ३ ब्रम्हचे १३ लोक बनले व दहावेद्वार फोड्डून आनंदब्रम्हमध्ये हंसाला घेऊन जातात.तो हंस एक वेळा सर्व कर्म कापून आनंदब्रम्हमध्ये पोहचल्यानंतर होणकाळात नंतर कधी जन्मत नाही आणि होणकाळ मधून उपजलेल्या शब्दापासून पोहचलेला हंस होणकाळ ब्रम्हपर्यंत म्हणजे दहाव्याद्वारापर्यतच पोहचतो.त्याच्या पुढे कधी पोहचत नाही

आणि दहाव्याद्वारा पासून परत जगात जन्म घेतो. ।।३१।।

के सुखराम सुणो सब ग्यानी ।। पिछम भेद नही पावे ।।
ने: अंछर बिन ध्यान तत्त लग ।। दूणा डाफा खावे ।।३२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानींना सांगतात की,पश्चिमचा भेद प्राप्त करीत नाही,तोपर्यंत आनंदलोकात कोणी पोहचत नाही.ने:अक्षराच्या ध्याना शिवाय होणकाळ तत्तपर्यंत पोहचणारे कोणते ही ध्यान हंसाला आनंदलोकास पोहचवत नाही. उलट होणकाळा–पर्यंतचे पूर्वेचे ध्यान साधूनही पुन्हा होणकाळात येऊन जन्मतो आणि काळाचे दुप्पट कष्ट युगानुयुग भोगतो. ।।३२।।

३४

।। पदराग आसा ।।

बांदा अणंद लोक से जावे
तत स्वरूप ब्रम्ह ओ कही ये ।। इण आगे गम पावे ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीला सांगतात की,तत्तस्वरुप ब्रम्ह म्हणजे होणकाळ ब्रम्हच्या पलिकडील आनंद लोकाची ज्या संताची समज आहे.तोच आनंदलोकात जाईल.।।टेर।।

ज्हाँ लग अेक ब्रम्ह कर गावे ।। तहाँ लग भेद न पायो ।।
ओ तो हुणकाळ ब्रम्ह कहीये ।। बिन भेद पद ठेरायो ।।१।।

ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुष जोपर्यंत होणकाळ ब्रम्ह आणि आनंदब्रम्हला एकच समजतात. तो पर्यंत त्यांना आनंदब्रम्हचा भेद माहित नाही असे समजा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,बिना भेदी म्हणजे होणकाळ ब्रम्ह आणि आनंदब्रम्हचा फरक न समजणारे ज्ञानी,ध्यानी होणकाळ ब्रम्हलाच आनंदब्रम्ह समजतात आणि त्याला प्राप्त करण्यास पचतात.।।१।।

इतरी गम नही ग्यान्यां कूं ।। वो ओ अेक जे होई ।।
तो मेहेनत कर कहो क्या करीये ।। और न दूजो कोई ।।२।।

ज्ञानी,ध्यानी होणकाळ ब्रम्ह आणि आनंदब्रम्हला एकच समजतात म्हणजे आनंदब्रम्ह व होणकाळब्रम्ह हे वेगवेगळे आहेत असे समजत नाही व जीव ही यांच्या सारखेच आहे असे समजतात.जीवब्रम्ह ज्ञानींच्या भाषेत ज्या होणकाळब्रम्हला आनंदब्रम्ह समजतात तसाच ब्रम्हरुपात जीवब्रम्ह आहे असे समजतात.तर होणकाळब्रम्हला पचून पचून मेहनत करुन प्राप्त करण्याची काय गरज आहे?असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी, ध्यांनीना विचारतात. ।।२।।

जे जे चीज सकळ घर माही ।। वाई जे हाट मे होवे ।।
तो क्यूं पचे रात दिन मुरख ।। मिलणे कूं क्या रोवे ।।३।।

जी जी वस्तु घरात आहे तीच वस्तु बाजारातील दुकानात आहे.घरात भरलेल्या वस्तुलाच प्राप्त करण्याकरीता जीव रात्रं-दिवस बाजारात पचून राहीला आहे.ती वस्तु घरात भरलेल्या वस्तुपेक्षा निराळी नाही आणि ती वस्तु घरात गरजेपेक्षा जास्त आहे तरी ही मिळविण्याकरीता रडून राहीला आहे.असा जीव मुर्ख आहे म्हणजे होणकाळ ब्रम्ह जीवातच आहे हे ज्ञानी,ध्यानी आणि जीव मानत आहे तरी ही जीव तीच वस्तु होणकाळ ब्रम्हच्या ज्ञानी,ध्यानींपासून प्राप्त करण्याकरीता पचून राहीला आहे.असा जीव मुर्ख आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री-पुरुष,ज्ञानी,ध्यानींना सांगत आहे. ।।३।।

**भूल्या कहे ब्रम्ह वो ओई ।। सुध्ध बिहुणा सारा ।।**
**त्रीया कदे नार कूं चावे ।। ओ नही करे बिचारा ।।४।।**

जे भुललेले विना अकलेचे ज्ञानी,ध्यानी,स्त्री-पुरुष आहेत तेच होणकाळ ब्रम्हलाच आनंदब्रम्ह म्हणतात.जगात स्त्री असते ती स्त्री विवाह सुख प्राप्त करण्याकरीता अन्य स्त्री शोधत नाही पुरुषच शोधते.होणकाळ ब्रम्हच जर आनंदब्रम्ह आहे तो आनंदब्रम्ह जीवात प्रगट आहे तर परत तसाच आनंदब्रम्ह प्राप्त करण्याची काय गरज आहे.।।४।।

**ज्यां सूं जीव हूवो सुण पेदा ।। वो ओ अेकज होई ।।**
**के सुखराम अणंद पद न्यारो ।। वो परसो कहूँ तोई ।।५।।**

ज्याच्यापासून हंस पैदा झाला आहे.तो ब्रम्ह देहात आहे आणि तो देहातील ब्रम्ह व होणकाळ ब्रम्ह एकच आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी,ध्यानी तसेच स्त्री -पुरुषांना सांगतात की,आनंदपद त्या ब्रम्हपेक्षा म्हणजे होणकाळ ब्रम्हपेक्षा वेगळा आहे त्याला प्राप्त करा.।।५।।

३८
।। पदराग शब्द ।।

**बांदा इऊं जग मोहे न जाणे ।।**
**अगम देस का मे ऊपदेसी ।। अे माया रस माणे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीला सांगतात की,हे सर्व जगातील ज्ञानी, ध्यानी तसेच स्त्री-पुरुष होणकाळ पारब्रम्ह तसेच त्रिगुणी मायेचे पर्चे चमत्काराचे सुख जाणतात.मी होणकाळ पारब्रम्ह व इच्छा माया हे ही ज्या देशाच्या सुखांना जाणत नाही. अशा अगम सुखांच्या देशाचा उपदेश देतो म्हणून हे जगातील ज्ञानी,ध्यानी, स्त्री-पुरुष माझ्या उपदेशाला पकडत नाही. ।।टेर।।

**भाग बिना ज्यूं चीज न पावे ।। गुण बिन बुंन जाणे ।।**
**इंऊं जडी जंगळ मे हे ब्हो तेरी ।। कोई नाहे पिछाणे ।।१।।**

जंगलात अनेक जडी बुट्या असतात त्याच्यात मुर्दाला जीवंत करु शकते अशी गुणावाली

संजीवनी बुटी ही असते.परंतु घरात मुर्दा असल्यावरही संजीवनी बुटीची परीक्षा करण्याचे ज्ञानी नाही याकारणाने मुर्दयाला जिवंत करता येत नाही.म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील स्त्री–पुरुषांना सांगतात की,मुर्दा जिवंत होवू शकत होता.अशी जंगलात बुटी होती.परंतु मुर्दयाचे भाग्य नसल्याकारणाने त्याचे घरावाले जडी बुटीला ओळखू शकले नाही आणि मुर्दयाला जिवंत होण्याकरीता देवू शकले नाही.असे प्रत्येक जीवाला आनंदपदाच्या सुखांची भारी गरज आहे.परंतु आनंदपद भाग्यात नसल्याकारणाने आनंदपद देणारे भेदी गुरु आणि सतगुरु सुखरामजी महाराजांना ओळखू शकले नाही आणि न प्राप्त करु शकत.।।१।।

**अे सब मेरी काया देखे ।। आतम़ की चल भाई ।।**
**अेसी खबर किसी कूं नाही ।। बिछड़ रहत नाही रे ।।२।।**

जगातील ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुष हे सर्व माझ्या मायेच्या देहाचा स्वभाव चरित्र बघतात. माझ्या पाची आत्मा या मायेची चाल बघतात.या ज्ञानी,ध्यानींना माझी ही ओळखच नाही की मला हंस एकदाही भेटतो.तरी ही तो सदाकरीता महासुखाच्या अगम देशाला पोहचून जातो.मग तो कधी आवागमनात येत नाही. ।।२।।

**के सुखराम पिछाणे मोने ।। तामे निझपद जागे ।।**
**उलटर हंस चढे गढ ऊपर ।। ध्यान समाधी लागे ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जो मला निजपदाचा भेदी म्हणून ओळखतो. त्याच्यात मी एक प्रहर नाही पळातच निजपद जागृत करवून देतो.मला जाणणारा हंस माझ्यात उदय झालेल्या सत्तेच्या पराक्रमाने पळभरातच घटातच बंकनाळेने उलटून गडावर चढून जातो आणि दहाव्याद्वारात सतस्वरुपाची ध्यान समाधि लावून आनंद घेतो. ।।३।।

४२

।। पदराग शब्द ।।

**बांदा केवळ भेद न्यारोजी ।।**
**सतस्वरूप आनंद पद कहीये ।। सो ऊपदेस हमारोजी ।।टेक।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,बांदा या केवलचा भेद सगुण व निर्गुणच्या भेदापेक्षा वेगळा आहे.सतस्वरुप आनंदपद ज्याला ज्ञानी,ध्यानी म्हणतात.त्या सतस्वरुप आनंदपदाच्या भेदाचा उपदेश मी देत आहे. ।।टेर।।

**ब्रम्हा बिसन महेस ना पायो ।। ना अवतारा सोई ।।**
**सुर तेतीस सक्त इंद्रादिक ।। नेक न जाण्यो कोई ।।१।।**

सतस्वरुप आनंदपदाचा भेद ब्रम्हा,विष्णू,महादेवाला ही मिळाला नाही.हा भेद अवतारांनाही मिळाला नाही.शक्ती ३३,००,००,००० स्वर्गाचे देवता,स्वर्गाचा राजा इंद्र,७ भवन भुर,

भुवर,स्वर,महर,जन,तप,सतचे देवता,चार पुऱ्याचे देवता यांच्यातील कोणालाही केवल भेद थोडासा ही मिळाला नाही. ।।१।।

**ग्यानी ध्यानी संत साध रे ।। ना जोगेसर पावे ।।**
**दुनिया सकळ कोण गिणती मे ।। सेंस ब्रम्ह लग धावे ।।२।।**

सतस्वरुप आनंदपदाचा भेद माया ब्रम्हचे ज्ञानी,ध्यानी,संत तसेच साधू यांनी एकाने ही प्राप्त केला नाही.योगेश्वर(कवि,हरी, अंत्रिक्ष,प्रबुध्द,पिप्पलायन,अर्विहोत्र, दुर्मिळ, चमस, करभाजन)यांनीही केवलचा भेद प्राप्त केला नाही.शेष जो रात्रं–दिवस २००० जीभांनी राम राम करतो त्याला ही सतस्वरुप आनंदपदाचा भेद मिळाला नाही.तो ही होणकाळ पारब्रम्हलाच जाणतो.मग या दुनियेतील स्त्री–पुरुष केवलचा भेद जाणण्यास कोणत्या गणतीत येतात. ।।२।।

**बंध मुक्त दोनू के आगे ।। मुक्त रूप सुण होई ।।**
**इंहा लग सकळ खबर ले आया ।। आगे न जाण्यो कोई ।।३।।**

बंध म्हणजे स्वर्गादिक तसेच मुक्ती म्हणजे वैकुंठादिकाच्या पुढे होणकाळ पारब्रम्हचे मोक्ष पद येथ पर्यंत खबर म्हणजे पोहच सर्वांची आहे.याच्या पुढील सतस्वरुप आनंदपदाची खबर या कोणाला जराही नाही. ।।३।।

**के सुखराम अर्थ जब लाधे ।। जब एेसी मत आवे ।।**
**जब बेरागी हुवे नर जग मे ।। पिता किसब कूण चावे ।।४।।**

जसे जगात वेदाचे वैराग्य ज्ञान समजल्यावर माता–पित्याचे कुळ त्यागून देण्याची मती येते आणि तो जीव कुळ त्यागून देतो आणि वेद वैरागी बनून जातो.असेच स्वर्गादिक, वैकुंठादिक तसेच होणकाळ पारब्रम्हच्या पुढील सतस्वरुप आनंदपदाचे ज्ञान ऐकल्यावर त्रिगुणी मायापदाच्या पलिकडील होणकाळ पारब्रम्हला ही त्यागून देतो आणि सतस्वरुप आनंदपदाचा विज्ञान वैरागी बनून जातो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी स्त्री–पुरुषांना सांगतात. ।।४।।

४४

।। पदराग शब्द ।।

**बांदा मत भुले भ्रमा माही ।।**
**जग मर्जाद मन की बांधी ।। जे हर माने नाही ।।टेक।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजने बांदा म्हणजे हरजी भाटी या राजपूताला समजावले की संत बैरागी असेल तरच पूर्ण संत आहे,संता ने गृहस्थी जीवन स्विकारले तर तो मनुष्य संत नाही आहे जगाचा बरोबरचा मनुष्य आहे असे समजावे.हा तुझा भ्रम आहे. या भ्रमात बांदा तु भूलु नको.हा जगत म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महेश यांनी बांधलेली मर्यादा आहे.ब्रम्हा,विष्णू,महेश हे जगाचे अन्य जीवां सारखे जीव म्हणजे मन आहे.हे हर नाही

आहे.हर म्हणजे रामजी केवल आहे आणि जीव माया आहे या करीता जीवाने बांधलेली मर्यादा हर म्हणजे रामजी मानत नाही.।।टेर।।

**च्यार बेद पुराण अठारे ।। जे मर्जादा गाई ।।**
**जे सें सब हद की जग कूं बांध्यो ।। नही साहेब की भाई ।।१।।**

चारी वेद आणि अठारा पुराणात जी मर्यादा सांगितली आहे ती मर्यादा हदची म्हणजे होणकाल पारब्रम्हचा देशात नर नारीला बांधून ठेवण्याकरीता गायली आहे.ही मर्यादा साहेबाचा देशात जाण्याची नाही आहे.या करीता साहेबाची बांधलेली नाही आहे. ।।१।।

**दरगा की येहे म्रजाद क्हावे ।। लिंग भग जोड़े होई ।।**
**माता ब्हेन कहे जग बेटी ।। फिर नारी कहुं तोई ।।२।।**

जीवाने पाच आत्माचे भाडे चुकवण्या करीता दरग्याने जोडीने लिंग भग म्हणजे नर नारी बनवली आहे.दरग्या ने आई,बहीण,पुत्री,बायको ही मर्यादा नाही बनवली.दरग्या ने प्रथम स्त्री पुरुष घड्वले.मग ब्रम्हा,विष्णू,महेशने दरग्याहून बनून आलेल्या स्त्रीला आई,बहीण, पुत्री,बायको ही मर्यादा दिली.ज्या स्त्रीने पुरुषाला जन्म दिला ती स्त्री पुरुषाची माता बनली,एकाच स्त्रीने पुरुषा बरोबर स्त्री जन्मली ती त्या पुरुषाची बहीण बनली,ज्या पुरुषा पासून स्त्री जन्मली ती पुत्री बनली आणि ज्या स्त्री बरोबर गृहस्थी योग केला ती त्या पुरुषाची बायको बनली.असे तर मुळात सर्व स्त्रीया एकाच स्त्रीचे रुप आहे. परन्तु कोणी आई बनली,कोणी बहीण बनली,कोणी पुत्री बनली,तर कोणी बायको बनली. आई,बहीण,पुत्री ह्या स्त्रीया आहे,ह्या सर्व पुरुषाची बायको नाही बनू शकत,ही मर्यादा ब्रम्हा,विष्णु,महेशने दिली आहे.आई,बहीण,पुत्री याच्यातून कोणाची बायको बनवणे म्हणजे ब्रम्हा, विष्णू,महेश किंवा जगाची मर्यादा तोड्ने आहे.।।२।।

**जग मर्जाद भांजियां जग मे ।। जग ही दोष लगावे ।।**
**दर्गे की मर्जाद ऊथाप्या ।। वहां सो दाद न पावे ।।३।।**

हे ब्रम्हा,विष्णू,महेश यांची मर्यादा तोड्ल्यावर जगत आणि ब्रम्हा,विष्णू,महेश मर्यादा तोड्णाऱ्याला दोष लावतो.असेच दर्गा ने स्त्री पुरुष मिळून नम्रतेने संसार करण्याची मर्यादा लावली.पुरुषाने स्त्री बरोबर संसार नाही करने हे दरग्याची मर्यादा तोड्ने आहे. दरग्याची मर्यादा तोड्ल्यावर दरग्यातून सुःख मिळण्याचा न्याय नाही मिळणार.जो दरग्याची मर्यादा तोडेल त्याला जगात काळाचे दुःख भोगावे लागतील.या दुःखाने दर्गापासून सुटका नाही मिळणार. ।।३।।

**जे मर्जाद जग की राखो ।। तो कारण ओ चहिये ।।**
**जे साहेब को भै दिल जाणो ।। तो दुख नेक न सहीये ।।४।।**

जगात स्त्री घड्वल्या नंतर ब्रम्हा,विष्णु,महेश यांनी आई,बहीण,पुत्री स्त्रीची मर्यादा बांधली.

असे आई,बहीण,पुत्री स्त्रीची जगाची मर्यादा ठेवत असाल तर साहेबाने बनवलेल्या स्त्री पुरुषाची जोडी म्हणजे बरोबर राहून पाची आत्मा ने सुख घेण्याची मर्यादा नाही पाळत आणि वैरागी बनून राहने याचे काही कारण पाहिजे.विना कारण साहेबाची स्त्री पुरुष जोड्याने न राहण्यात साहेबाची मर्यादा भंग होते.याचे भय हृदयात ठेवले पाहिजे. ।।४।।

**पांचू भोग आत्मा भाड़ो ।। जिऊं कोई पूरण वारा ।।**
**इन कूं दोष कहे सो भ्रम्या ।। वे सुध्ध राहा न धारा ।।५।।**

पाची भोग हे आत्म्याचे भाडे आहे.ह्या आत्म्याला भोग न देने आत्म्याला तापवने आणि दु:ख भोगने हे साहेबाची मर्यादा नाही आहे.साहेबाचा आत्म्याला दु:ख नाही देने,सुख देने ही मर्यादा आहे.या करीता सर्व नर नारींनी पाच आत्म्याला थोडेसे ही दु:ख नाही सहन करु द्यायला पाहिजे.असा कोणी संत गृहस्थी बनून पाची भोग हे आत्म्याचे भाडे आहे हे समजून पाची आत्म्याला भोग पुरवतो.त्याला कोणी ज्ञानी दोषी सांगत असेल तर तो भ्रमलेला आहे, भुललेला आहे,त्याने सतविज्ञानाचा रस्ता नाही पकडला.।।५।।

**ने: अंछर बिन अछंर आखर ।। सो सब भ्रम कहावे ।।**
**केवळ मत्त बिन सब मत्त ऊला ।। आनंद पद नही पावे ।।६।।**

ने:अंछराचा रस्त्याशिवाय अक्षराने म्हणजे ओअम पासून उपजलेले सर्व रस्ते भ्रम आहे. केवल मताचा व्यतीरीक्त सर्व मत होणकाळाचे मत आहे,आनंदपदाचे मत नाही आहे, आनंद पदाचा इकडचे होणकाळचे मत आहे.या होणकाळाचा मताने आनंदपद नाही मिळत. ।।६।।

**राज जोग बिन जोग सकळ ही ।। से भ्रम कहीजे भाई ।।**
**जो बिग्यान बिना सब ग्यानी ।। सो भ्रमना जग माई ।।७।।**

राजयोगाचा विना सर्व जोग भ्रम आहे.राजयोग सोडून सर्व जोग राजयोग मिळवण्यासाठी खोटे आहे.ब्रम्हा,विष्णू,महेश ज्या ज्ञानाला समजू नाही शकत,अशा ज्ञानाला विज्ञान सांगतात.असे विज्ञान विना ब्रम्हा, विष्णु, महेशचे सर्व ज्ञान हे भ्रम आहे, दर्ग्यात न पोहचण्याचा रस्ता आहे. ।।७।।

**सो बिग्यान कीयां बिन घट मे ।। उलट समाधी लागे ।।**
**ग्यान तिको क्रणी सो मुद्रा ।। कळा घटमाही जागे ।।८।।**

या विज्ञानाने ब्रम्हा,विष्णू,महेश यांनी बनवलेली कोणतीही करणी,क्रिया न साधता घटात उलटून दसवेद्वारात समाधी लागते.ब्रम्हा,विष्णू,महेश यांचा करण्या मुद्रा साधण्याने घटात रिध्दी सिध्दीचे पर्चे चमत्काराची कळा जागृत होते.याचाने घटात बकंनाळने उलटून दसवेद्वाराची समाधी नाही लागत. ।।८।।

**सो अग्यान ग्यान सब छाडर ।। मून पकड़ जड़ होई ।।**

ज्यूं काले को मन खुसियाली ।। मो सम अवर न कोई ।।९।।

सतस्वरुपाचे विज्ञान आणि ब्रम्हा,विष्णू,महेशचे ज्ञान सोडून मौन धारण करुन,कोणासी ही नाही बोलने हे अज्ञान आहे.मौन धरने हे अमर देशाला जाण्याकरीता दगडासारखे जड बनने आहे.जसे दगड जड राहील्या कारणाने समुद्रात नाही तरु शकत.तसेच मौन पाळणारा भवसागरातून नाही तरत.जसे वेड्याचा मनात विना काही विचार समजची खुषीयाली राहते आणि समजतो की माझा समान जगात कोणी नाही आहे.असे मौनी स्व:ताला तो समजतो की माझा समान जगात कोणी ज्ञानी ध्यानी नाही आहे. ।।९।।

के सुखराम समज या न्यारी ।। कोई हन जाने ग्यानी ।।

दोय बात को न्याव सकळ के ।। तीजी किणिहन जाणी ।।१०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,जगात सतस्वरुप विज्ञानाची समज कोणी ही ज्ञानी आणि अज्ञानी नाही जाणत.जगाचे ज्ञानी ध्यानींचे ज्ञान आणि अज्ञान या दोन गोष्टीचा निर्णयाची ही समज आहे.ही तिसरी सतविज्ञानाची समज कोणी जगाचा ज्ञानी नाही जाणत.या सतविज्ञानाची समज जगात कोणी बिरला ही जाणतो. ।।१०।।

४६

।। पदराग आसा ।।

बांदा मोख जिके जन जासी

बांदा मोख जिके जन जासी ।।

ज्यांरे नांव उदे हुवो घट मे ।। बोहोर न भवजळ आसी ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदाला सांगत आहेत की,ज्यांच्या घटात ने:अक्षर नाम प्रगट होईल तेच मोक्षाला जातील.ते पुन्हा कधीही भवसागरात येणार नाही. ।।टेर।।

कुद्रत कळा नाव की जागे ।। ने: अंछर तन माई ।।

केवळ बीज असल ओ संतो ।। ओर उपाव न काई ।।१।।

मोक्षाला जाण्याकरीता नामाची कुद्रतकला म्हणजेच ने:अक्षर तनात जागृत व्हायला पाहिजे. केवळपद जाण्याचे ने:अक्षर हेच अस्सल बीज आहे.संत हो,या ने:अक्षर बीजा शिवाय आणखी कोणत्या उपायाने हंस मोक्षाला जाऊ शकत नाही. ।।१।।

जाग्यो नाव तन थर हरी यो ।। जद तद केवळ पासी ।।

लाखाँ गुन्हा खून पड़ जावे ।। तोई मिनषा देहे आसी ।।२।।

हे ने:अक्षर जागृत होवून गेल्यावर शरीर थर थरु लागते.अशा संताला कधी ना कधी केवलपद मिळते.अशा मनुष्याच्या हातून लाखो गुन्हे होवून गेले तरी ही त्याला मोक्ष पद प्राप्त होई पर्यंत मनुष्य देहच मिळेल. ।।२।।

जप तप नेम भक्त नौद्या सुं ।। ओऊं सोहं माही ।।

माया लियाँ बीज सो जागे ।। केवळ को ओ नाही ।।३।।

कोणी जप करतो,कोणी तप करतो,कोणी नवविद्या भक्ती करतो,कोणी नियम पाळतो. कोणी ओअमची भक्ती करतो.तर कोणी सोहमची भक्ती करतो.हे सर्व भक्त्यांचे बीज मायेचे पद जागृत करणारे आहे.हे कोणते ही बीज केवलचे पद जागृत करणारे नाही. ।।३।।

**पीठ फाड़ ऊँचो चड़ जावे ।। सो नेः अंछर होई ।।**
**पूरब घाट चड़े सो ओऊँ ।। सोऊँ कार कहुँ तोई ।।४।।**

पाठीला फाडून बंकनाळेच्या रस्त्याने जो उंच्च दहाव्याद्वाराच्या गडावर चढून जातो. तोच नेः अक्षर आहे.जो पूर्वेच्या घाटाने म्हणजे संखनाळेच्या रस्त्याने भृगुटी गगणात चढतो तो ओअम आहे म्हणजे श्वासा श्वासातील बाहेरील श्वास आहे.।।४।।

**मन सूं कदे पदी नही बंछे ।। गत्त मुक्त की काई ।।**
**तो सुण मोख कबू नही पावे ।। फरक बीज के माई ।।५।।**

हे मायापदाची भक्ती करणारे मोक्षाची इच्छा करतात.गती किंवा मुक्तीपदाची इच्छा करीत नाही तरी ही त्यांना मोक्ष कधी मिळत नाही.कारण धारण केलेल्या बीजामध्ये फरक असतो.ते बीज कैवल्याचे नसते,मायेचे असते. ।।५।।

**केवळ बीज एक माया को ।। दोय बीज जग माई ।।**
**जिण जिण हात आवियो जेसो ।। लोक तिके हंस जाई ।।६।।**

संसारात दोन प्रकारचे बीज आहे.एक मायेचे तसेच दुसरे केवलचे बीज आहे.ज्या संताच्या हातात जे बीज येते ते पद ते प्राप्त करतात.मायेचे बीज आले तर मायेचे पद प्राप्त करतात आणि केवळचे बीज आले तर केवळचे पद प्राप्त करतात. ।।६।।

**मन जाण्या को कारण नाही ।। ना अंछया सूं खावे ।।**
**सिंव्रण भोग रीत गत जाणे ।। नार पुर्ष बण आवे ।।७।।**

याच्यात मनात जाणण्याचे काही कारण नसते.मनात मोक्षाला जाण्याची इच्छा असली आणि बीज मायेचे असले तरी ही मोक्षाला जाऊ शकत नाही आणि इच्छा असली की मोक्ष मिळायला पाहिजे तरी ही बीज मायेचे असल्या कारणाने मोक्ष मिळत नाही.स्मरण करण्याची आणि भोग करण्याची रीत एकसारखी असते.जो स्मरण करण्याची रीत जाणेल त्याला नाद म्हणजे कोरा जीवब्रम्ह आणि बिंदू म्हणजे मायेच्या सोबतचा जीवब्रम्ह प्रगट करण्याची गती समजेल जसे जगात भोग रीति जाणणारे जाणकार पुत्रला आपल्या इच्छेने जन्म देतात.।।७।।

**मथन एक युं भजन एक ही ।। यूं कुद्रत कळा सारी ।।**
**ज्यूं लड़की सुण लड़का होवे ।। युं नाद बिंद बिध न्यारी ।।८।।**

जसे मैथुनची रीत आहे तशीच भजनाची रीत आहे.मैथुनने मुलगा किंवा मुलगी होते.

तसेच भजनाने पाच आत्मा या माया मुक्त कोरा जीवब्रम्ह म्हणजे नाद आणि पाच आत्मा या मायेच्या सोबतचा जीवब्रम्ह हा बिंदू प्रगट होतो.पाच आत्मापासून जीवब्रम्हला वेगळे करणे हीच कुद्रतकला आहे. ।।८।।

**छुटे धात मथन मे पाछे ।। सो नग सुण बण आवे ।।**
**यूं सिंव्रण मे हे बिध न्यारी ।। सतगुरू भेद बतावे ।।९।।**

जसे मैथुनमध्ये ज्याची धातू नंतर सुटेल तो नग बनतो.म्हणजे स्त्रीची धातू नंतर सुटल्यावर पुत्री पैदा होते व पुरुषाचे विर्य नंतर सुटल्याने पुत्र पैदा होतो.असेच स्मरणाची विधि वेग–वेगळी आहे.याचा भेद सतगुरु सांगतात. ।।९।।

**पड़वा आद तिथ सूं गिणीयां ।। एक पुर्ष एक नारी ।।**
**जिण संग भोग करत ग्रभ थाँमे ।। सो नग बणे बिचारी ।।१०।।**

आदि तिथी(स्त्री रजस्वचा पहिला दिवस)पाड्वापासून मोजा.पाड्वाला पुत्र तर द्वितीयेला पुत्री जन्मते.रजस्व समाप्ती नंतर जसे ज्या तिथीला भोग करेल तोच नग बनून जाईल. ।।१०।।

**सास उसांस तिथ अे जाणो ।। एक बीज एक चड़वा ।।**
**याँ बिच नाद निराळो होवे ।। ज्यूं लड़को व्हे पड़वा ।।११।।**

अशाचप्रकारे स्मरण हे श्वास उश्वासात होते.श्वास हा द्वितीया आणि उश्वास हा पाड्वा तिथी सारखे समजा.जसे पाड्वाचा मुलगा जन्मतो तसे उश्वास म्हणजे देहाच्या आत घेणाऱ्या श्वासात नाद म्हणजे जीवब्रम्ह हा आदिपासून ज्या बिंदू म्हणजे ५ आत्मा या मायेच्या सोबत होता.त्याच्यापासून वेगळा होतो आणि गगणात म्हणजे दहाव्याद्वारात पोहचतो म्हणजे(श्वास)उश्वासाच्या धवनमध्ये जीवब्रम्ह जीवाच्या मायेपासून वेगळा होतो. ।।११।।

**सास सास सिव्रण नर कर हे ।। ता मे आ बिध जागे ।।**
**नाद बिंद भेळा चड़ जावे ।। ध्यान गिगन मे लागे ।।१२।।**

श्वासात जो मनुष्य स्मरण करतो म्हणजे श्वासा–श्वासात स्मरण करतो.त्याच्यात नाद म्हणजे जीवब्रम्ह आणि बिंदू म्हणजे जीवब्रम्हच्या सोबतची ५ आत्मा ही माया जसे आदि पासून एकासोबत होत्या तसेच्या तसे भृगुटीत म्हणजे गगणात चढून जातात आणि गगणात पोहचून मनुष्य ध्यान लावतो. ।।१२।।

**सुणो उसास संग लिव लागे ।। रटणा अंत उकाऊ ।।**
**तो सूण नाद निराळो जागे ।। चड़े पीठ दिस भाऊ ।।१३।।**

उश्वासाच्या सोबत लीव लागते म्हणजे स्मरण होते.तेंव्हा श्वास अमाऊ होतो.या अमाऊ विधिने पाच आत्मा ही बिंदू म्हणजे माया हंसापासून वेगळी होते आणि कोराब्रम्ह म्हणजे

जीव पाठीच्या दिशेने दहावेद्वार गगनात चढतो. ।।१३।।

**के सुखराम सुणो सब ग्यानी ।। आ बिध सुण लो आई ।।**

**इण कळ बिना नाद सुण न्यारो ।। चडे कबु नही भाई ।।१४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व ज्ञानींनो ऐका,ही विधि येऊन ऐकून घ्या.या कले शिवाय नाद बिंदूपासून वेगळा होवून,कधीही चढणार नाही. ।।१४।।

५१

।। पदराग आसा ।।

**बांदा ओ अरथ याँ होई**

**नाव न्यारो भेद न्यारो ।। सतगुरू न्यारा जोई ।।टेर।।**

परापरी पासून दोन पद आहेत.

१.सतस्वरुप पद २. ब्रम्हपद(कर्तार)

या कर्तार ब्रम्हपदात जीवब्रम्ह पद आणि इच्छा पद आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदाला समोर ठेवून जगाच्या ज्ञानी,ध्यानी,वेदांती,तपस्वी,६ दर्शन यांना आणि जगातील लोकांना सांगतात की,होणकाळात जे जे नाम आहेत ते नाम,त्यांचा भेद व त्यांचे सतगुरु हे वेगवेगळे कसे आहेत आणि या सर्वांपेक्षा सतस्वरुपाचे नाम त्याचा भेद व सतस्वरुपाचे गुरु सतगुरु निराळे कसे आहे हे समजवितात. ।।टेर।।

**पूरब घाट चड़े सो अंछर ।। बिंद माँय सूं आवे ।।**

**सोऊं ओऊं जाप अजपो ।। सुण नाद लग ओ जावे ।।१।।**

इच्छा या बिंद म्हणजे मायेपासून ओअम शब्द उपजतो.तो शब्द मुलद्वाराने म्हणजे पूर्व घाटाने भृगुटी गडावर चढतो.तो ओअम शब्द खुप जोर केला तर भृगुटीच्या पलिकडे १००० पाकळ्यांच्या कमळापर्यंत पोहचतो.अशाचप्रकारे सोहम जाप,अजप्पा पारब्रम्ह होणकाळापासून उपजतो.तो सोहम जाप,अजप्पा नाद म्हणजे होणकाळ पारब्रम्हपर्यंत पोहचतो.हे दोन्ही शब्द पारब्रम्ह पार करुन सतस्वरुप पदात कधी पोहचत नाही. ।।१।।

**पिछम घाट होय नाँव चड़े रे ।। नाद माँय सूं आवे ।।**

**नाद अनाद लाँग सत आगे ।। अणंद लोक मे जावे ।।२।।**

पश्चिमच्या घाटाने म्हणजे बंकनाळेने जो शब्द गडावर म्हणजे दहाव्याद्वारात चढतो.तो शब्द सतस्वरुप नादपासून प्रगटतो व तो शब्द नाद म्हणजे जीवब्रम्ह,अनाद म्हणजे पारब्रम्हला म्हणजे पारब्रम्हच्या सतलोकात पार करुन आनंदलोकात जातो. ।।२।।

**पूरब दिसा चडे सो भाई ।। देही हले न कोई ।।**

**पवन संग भ्रुगुटी जावे ।। अंस बिंद को जोई ।।३।।**

पूर्व दिशेने जो शब्द चढतो त्या पूर्व दिशेने चढणाऱ्या शब्दाने देह हलत नाही.देह का

हलत नाही?
कारण की पवन(श्वास)च्या संगाने हंस भृगुटीत जातो.भृगुटीत हंसाच्या सोबत ५ आत्मा मन ही माया .. .. ..मन म्हणजे बिंदचा अंश जसाच्या तसा राहतो.मुळ माया निघत नाही म्हणून देह हलत नाही.हा देह केंव्हा हलेल?जेंव्हा हंसाच्या सोबतची मूळ ५ आत्मा निघतात तेंव्हा हंसाचा देह हलतो. ।।३।।

**पिछम घाट नाव सो चाले ।। सो देह झाड़ पिछाडे. ।।**
**बिंद नाद को करे बिछेडो. ।। माया अंस सब ताडे. ।।४।।**

पश्चिम घाटाने बंकनाळकडून जाणारे नाम देहाला झाडून आपटतो(झाडून पटकून झटकतो) व .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. बिंदू म्हणजे ५ आत्म्याला आणि नाद म्हणजे जीवाला एक दुसऱ्या पासून वेगळे करुन .. .. .. .. सर्व अंश काढून टाकतो.
या देहाला पश्चिम घाटाने जाणारे नाम(ने:अक्षर)झाडून पटकून झटकतो कसे?जसेच ने: अक्षर या शरीरात कंठस्थानावर प्रगट होते व हंस नाभीमध्ये पोहचतो तेंव्हा नाभीमध्ये ५ आत्म्यांचा वियोग होतो.त्रिगुटीत मन निघते.निराकाराच्या देशात नऊ तत्त लिंग देह गळून जातो.
शिवब्रम्हच्या पुढे महाशुन्यात सुरत काया गळून जाते आणि हंसाला दिव्य काया मिळते अशाप्रकारे हा ब्रम्ह(हंस)ने:अक्षर युक्त होतो.
असा ने:अक्षर या देहाला झाडून पटकून झटकतो. ।।४।।

**पड़त बिछेवो कंलपे धुजे ।। माया का गुण भाई ।।**
**अनंत जुंग हंस मो संग रमीयो ।। आज छाड़ अब जाई ।।५।।**

जेंव्हा बिंदचा(५ आत्म्याचा)आणि नाद(जीव)चा वियोग होतो.तेंव्हा माया तळमळते (विलाप करते)म्हणून शरीर कापते हे कापणे म्हणजे धुजणे हे मायेचे गुण आहेत.५ आत्मा माया का तळमळते?कारण की ५ आत्मा मायेपासून जीव नाद वेगळा होतो म्हणून ५ आत्मा तळमळतात.ती माया समजते की,हा जीव अनंत युगांपासून माझ्या सोबत रमत होता.तो आज मला सोडून जात आहे.या चेतन हंसापासूनच ५ आत्म्यांना सुख मिळतात.हंस या पाच आत्म्यांच्या सोबत असल्या कारणाने ह्या ५ आत्म्यांना जसे सुख पाहिजे तसे सुख या हंसाच्याद्वारे ते घेवू शकत होते.हंसामुळेच त्यांच्यात(५ आत्मा)चेतनता होती.आता हंसच त्यांच्या पासून वेगळा होवून जाईल तो आम्हाला पुन्हा मिळणार नाही म्हणून त्या रडतात हा मायेचा स्वार्थ तिला तळमळवतो.या मायेमुळेच हंस अनंत युगांपासून जन्मणे आणि मरणे या फेऱ्यात अटकतो. ।।५।।

**पूरब दिसा चडे. जब माया ।। कहो काय कूं रोवे ।।**
**नाद बिंद सो रहे समेळा ।। बिछड़ण कदे न होवे ।।६।।**

पूर्व दिशेने(संखनाळेने)जेंव्हा शब्द चढतो.तेंव्हा माया कश्या करीता रडते?कारण की, पूर्वेच्या बाजुने चढणाऱ्यांच्या सोबत नाद.... .. हंस व बिंद .. .. .. मन(म्हणजे ५ आत्मा) असतात.त्यांचा बिंदू व नादचा कधी ही वियोग होत नाही. ।।६।।

**देह बेराट माँय को माही ।। जाप जपसी भाई ।।**
**जागे नाव नाद सो घट मे ।। ब्रम्ह कहे सो माई ।।७।।**

परापरीपासून दोन पद आहेत १. सतस्वरुप वैराट २. ब्रम्ह वैराट या ब्रम्ह वैराटात दोन पद आहेत.१.खंडी २.ब्रम्हंडी आणि खंडी ब्रम्हंडी=पिंडी(देंह वैराट)पिंड वैराट= ब्रम्ह वैराट/ब्रम्ह वैराट=पिंड वैराट पिंडीत कोणताही जाप जपणे म्हणजे ब्रम्हमधीलच जाप आहे.म्हणून या पिंडातील जाप असल्याने जास्तीत जास्त नादपर्यंत म्हणजे पारब्रम्ह होणकाळ पर्यंत पोहचता येते.जो नाद या पिंडात जागृत होतो तो नाद म्हणजे ब्रम्ह होणकाळ ब्रम्हच्या सत्तेचा आहे.हा नाद या घटातच असतो.असा ब्रम्ह प्रगट केल्याने होणकाळातून बाहेर निघता येत नाही म्हणजे सतस्वरुपात जाता येत नाही म्हणजे त्यांचे आवागमन मिटत नाही. ।।७।।

**ब्रम्हबेराट माँय सूं आवे ।। नाद तत्त घट माही ।।**
**वो सुण आण बिछोडे. बिंद कूं ।। ओर उपाय स नाँही ।।८।।**

ब्रम्ह वैराट म्हणजे सतस्वरुपातून नाद म्हणजे ने:अक्षर म्हणजे सतशब्द म्हणजेच तत्तनाद घटात येतो.घटात येऊन तो हंसाला या बिंदुपासून.. .. ..मन वेगळे करतो.या बिंदुपासून नादला वेगळे करण्याचा दुसरा काहीही उपाय नाही.सतस्वरुपाच्या शिवाय बिंदू मधून नादला वेगळे करण्यात दुसरा कोणताही उपाय नाही. ।।८।।

**मुख रटणा बिन नांव बारलो ।। इण घट आवे नाँही ।।**
**आतम ब्रम्ह नाव सो जागे ।। मुद्रा साझन माही ।।९।।**

मुखाने रटन केल्या शिवाय फक्त श्वासाने किंवा फक्त मनाने वा फक्त सुरतने हे ने:अक्षर जे सत्त वैराट मधुन येते ते या घटात येत नाही.

मुद्रा ही देहातच साधली जाते

होणकाळात तीन पद आहेत.

१.होणकाळ ब्रम्ह(अजप्पा)–ज्याचे नाम सोहम अजप्पा आहे.

२.इच्छा–जिचे नाम ओअम आहे.

३.आत्मब्रम्ह(जीवब्रम्ह)ज्याचे नाम ररंकार आहे.

ज्या ब्रम्ह सोबत ५ आत्मा आहेत त्याला आत्मब्रम्ह म्हणतात.आत्मब्रम्हचे नाम म्हणजे ररंकार होणे कसे?ते नाम घटात(शरीरात)मुद्रा साधल्याने होते.ते सतस्वरुपाचे नाम नाही. सतस्वरुप वैराटमधुन आलेले ते नाम नाही आहे. ।।९।।

के सुखराम सुणो सब ग्यानी ।। ओ ने: अंछर क्हे कोई ।।
सो बाहेर सूं घट मे आवे ।। और घट मे होई ।।१०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व ज्ञानींनो ऐका.हे जे ने:अक्षर आहे. म्हणजे तत्तनाद आहे म्हणजे सतशब्द आहे.निजनाम आहे हे सतस्वरुपातून म्हणजे घट(शरीर)च्या बाहेरुन घटात(शरीरात)येते बाकी सर्व घटातून येते.ते मायेचे असो, आत्मब्रम्हचे असो,नाम असो किंवा होणकाळ ब्रम्हचा अजप्पा असो ते घटातून येते म्हणजे होणकाळा-मधुन येते आणि होणकाळ मध्येच राहते.

अशातऱ्हेने जो मला नामांचा भेद आणि पोहच वेग-वेगळी करुन सांगेल तेच पूर्ण योगी आहेत.असे योगी कोण आहेत तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज आहेत.।।१०।।

५३

।। पदराग शब्द ।।

बांदा ओ जग मोहे ना जाणेला
बांदा ओ जग मोहे ना जाणेला ।। कोई बिर्ळा हंस पिछाणे ला ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदा म्हणजे हरजी भाटीला सांगतात की,हे जगातील सर्व स्त्री,पुरुष मी सतस्वरुप आहे,मी सतगुरु आहे म्हणून मला समजू शकत नाही.या सर्व स्त्री-पुरुषांमधून कोणी एखाद विरळा हंस मला समजू शकतो.।।टेर।।

पुरण ब्रम्ह पिता हे मेरा ।। अंछया हे मेरी बाई ।।
सतस्वरूप आणंद गुरू मेरा ।। याद कियो मुझ भाई रे ।।१।।

पूर्ण ब्रम्ह हा माझा पिता आहे आणि इच्छा ही माझी माता आहे व सतस्वरुप आनंदपद हा माझा आदिपासून सतगुरु आहे.या सतस्वरुप आनंदपदाने माझी आठवण केली म्हणजे माझ्या घटात ने:अक्षर प्रगट करण्याची दया केली.असे गुरु महाराजांनी जीव भावाने बोलले असे वाटते.।।१।।

ने: अंछर कागद गुरू भेज्या ।। बाच सही हम कीया ।।
अब हम चल्या अगम कूं भाई ।। मात पिता तज दीया रे ।।२।।

या सतस्वरुप आनंदपद गुरुने मला ने:अक्षराचा कागद पाठवला म्हणजे माझ्या घटात ने: अक्षर प्रगट केले.हे ने:अक्षर बाच सही हम किया म्हणजे मी माझ्या ने:अक्षराचा अनुभव घेतला.आता मी ने:अक्षराच्या प्रतापाने सतगुरुच्या अगम देशात सहज पोहचून गेलो.या कारणाने मी माझ्या माया माता ब्रम्ह पित्याला सदाकरीता त्यागून दिले.असे गुरु महाराजांनी जीव भावाने बोलले असे वाटते.।।२।।

बाळक बुध्दी सकळ अे ग्यानी ।। मात पिता कुंई जाणे ।।
सुर्गुण निर्गुण मे सब भीना ।। भेद र बेद बखाणे ।।३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदाला सांगतात की,संसारातील सर्व ज्ञानी(वेद,

शास्त्र,पुराण,गीता यांचा अर्थ सांगणारे ब्रम्हज्ञानी)यांची बुध्दी बालका सारखी आहे. जसे-बालक आपल्या आई-वडीलांनाच जाणतो,ओळखतो तसेच जगातील हे ज्ञानी फक्त सगुणरुपी माता आणि निर्गुणरुपी पित्यालाच ओळखतात.हे ज्ञानी सगुण तसेच निर्गुण भक्ती मध्येच भिनलेले आहेत म्हणजे गर्क होऊन राहीले आहेत म्हणजे कोणी भेदाचे म्हणजे योगाचे वर्णन करुन सांगतात तर कोणी वेदांचे बखाण करीत आहेत म्हणजे वर्णन करुन सांगत आहेत.म्हणजे वेदांमधल्या जप,तप,क्रिया-करणी यांच्यात गर्क होत आहेत.असे गुरु महाराजांनी जीव भावाने बोलले असे वाटते.।।३।।

**मात पिता सूं सब कोई राजी ।। लड़का लड़की भाई रे ।।**
**सतगुरू कूं कोई बिर्ळा जाणे ।। समजवान जग माई रे ।।४।।**

जसे जगात मुल-मुली हे आई वडिलांशीच राजी असतात म्हणजे खुश असतात.ते गुरु काय आहे हे जाणत नाही.तसेच ज्ञानी ज्यांची बुध्दी बालका सारखी आहे ते फक्त ब्रम्हरुपी पिता आणि इच्छारुपी माता यांची भक्ती करुन खुश होतात.परंतु हे ज्ञानी सतस्वरुप गुरुला जाणत नाही.जसे कुटुंबात एखाद्याला आई-वडिलांपेक्षा गुरु हे वेगळे आहेत ही समज असते.ज्याला इच्छा माता आणि ब्रम्ह पिता पेक्षा सतगुरु हे वेगळे हे समजते.असे गुरु महाराजांनी जीव भावाने बोलले असे वाटते. ।।४।।

**मे सतगुरू का खासा चाकर ।। सनद दीनी गुरू मोई रे ।।**
**अनंत हंस म्हे ले उधरूला ।। सुण लीजो सब कोइ रे ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी सतगुरुचा खास चाकर म्हणजे लाड्का शिष्य बनलो.खास चाकर म्हणजे प्रिय,लाड्का शिष्य कोणाला म्हणतात? ज्याच्यात कुद्रतीच गुरु महाराजांसारखे सर्व जीवांना मोक्षाला घेऊन जाण्याचा व पतिव्रता स्वभाव असतो.म्हणजे सुख दु:खात गुरु महाराजांची महिमा करतात,गुरु कार्य करतात व सदा गुरु महारांजाचा हृदयात भय ठेवतात ते लाड्का शिष्य बनतात. सतस्वरुप गुरुने माझी आठवण केली आणि मला ने:अक्षराचे पत्र पाठविले आणि मी ते कबुल केले म्हणजे ने:अक्षर धारण करुन घेतले असा मी सतगुरुचा खास चाकर बनला.तेंव्हा गुरुने मला गुरुची पदवी दिली म्हणजे ओहदा दिला.अशा पदवीमुळे मी संसारातून अनंत हंसाचा उध्दार करेल म्हणजे त्या हंसांना काळाच्या महादु:खातून काढून महासुखाच्या सतस्वरुप देशात घेऊन जाईल.हे सर्व लोक ऐकून घ्या.यांचा ओहदा त्यांच्या आयुपर्यंत किंवा मग जास्तीत जास्त महाप्रलया पर्यंतचाच आहे परंतु माझा ओहदा सदाकरीता म्हणजे अमर आहे.जो पर्यंत होणकाळ जगातील सर्व हंसांचा उध्दार करीत नाही.तोपर्यंत माझ्या ओहदा म्हणजे गुरुपदवी राहते.असे गुरु महाराजांनी जीव भावाने बोलले असे वाटते.।।५।।

**केवळ बीज अगम सूं आयो ।। सो मुझ मांई ऊगारे ।।**
**आगे सुण तिथंकर पायो ।। ज्यां संग ब्हो हंस पूगारे ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सुखरामजी महाराज सांगतात की,केवलचे बीज अगमहुन माझ्यात आलेला आहे.आधी जसे तीर्थंकरांना केवलचे बीज मिळाले ज्यांच्या संगाने खुपसे हंस त्या पदात पोहचले.तेच केवलचे बीज माझ्यात उगवलेले आहे म्हणजे प्रगट झाले आहे. तीर्थकरांनी सतयुग,त्रेतायुग,द्वापारयुग या तिन्ही युगांमध्ये अनेक हंसांना त्या पदात पोहचविले.असे गुरु महाराजांनी जीव भावाने बोलले असे वाटते.।।६।।

**च्यार जुग मे केवळ भक्ति ।। म्हे हंस आण जगाया रे ।।**
**सब हंस लेर मिलूंगा गुरू सूं ।। आणंद पद मे भायारे ।।७।।**

मी चार युगात देह धारण करुन आलो आणि माझ्यात केवल बीज म्हणजे ने:अक्षरची सत्ता प्रगट झाल्याने मी या जगात केवलचे ज्ञान देवून-देवून म्हणजे काळापासून निघा आणि आनंदपदात चला असे ज्ञान सांगून जागृत केले.या सर्व हंसांना होणकाळाच्या महादु:खातून काढून गुरुच्या आनंदपदात जाऊन मिळेल.गुरुमहाराजांनी येथे सत्तारुपाने बोलून राहीले असे वाटते. ।।७।।

**केई अेक भेज दिया म्हे आगे ।। जुग जुग हंसा भाई रे ।।**
**ब्होत हंसाँ की अग्या मोने ।। तांते रहुं जग माई रे ।।८।।**

कित्येक हंसाना मी युगा-युगात आधीच आनंदपदात पाठवून दिले.
सतयुग-अनंत हंस.
त्रेतायुग-९९ करोड .
द्वापारयुग-१ करोड .
कलियुग-अनंत घेवून जाणार.
तसेच संसारातून मला खुप साऱ्या हंसांना तारणे आहे म्हणून मी जगात राहतो. गुरुमहाराजांनी येथे सत्तारुपाने बोलून राहीले असे वाटते.।।८।।

**केईक हंस आगला मोसूं ।। सुण मो पासे आवे रे ।।**
**द्रसण करत नाव प्रकासे ।। रग रग तन सुख पावे रे ।।९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कित्येक हंस जे आधी मला भेटले म्हणजे त्यांनी भक्ती धारण केली असे हंस माझे प्रगट होणे ऐकून म्हणजे जेथे माझी सत्ता प्रगट रुपाने आहे.त्याच जागी माझ्या जवळ येतात आणि माझे दर्शन करताच म्हणजे माझ्या आतील विज्ञानाचे दर्शन करताच त्यांच्यात नामाचा प्रकाश म्हणजे सतशब्दाचा प्रकाश होतो आणि त्यांची नाडी नाडी सुख प्राप्त करु लागते.गुरुमहाराजांनी

येथे सत्तारुपाने बोलून राहीले असे वाटते.।।९।।

**नवा हंस प्रमोदू जग मे ।। जिन कूं ब्हो दिन लागे रे ।।**
**उनका भ्रम सकळ सबे भाग्यां ।। नाव घट मे जागे रे ।।१०।।**

जगात मी नव्या हंसांना सतस्वरुप ज्ञानाचा उपदेश देतो.त्या नव्या जीवांमध्ये/ हंसामध्ये ज्ञानाचा प्रकाश होण्यात म्हणजे ने:अक्षर जागृत होण्यास खुप दिवस लागतात.त्या नव्या जीवांचे सर्व भ्रम तोडावे लागतात.त्या नव्या जीवांचे सर्व भ्रम पळाल्यावरच त्यांच्या घटात नामाचा प्रकाश होतो म्हणजे नाम जागृत होते.गुरुमहाराजांनी येथे सत्तारुपाने बोलून राहीले असे वाटते.।।१०।।

**केवळ भक्त कोई नही जाणे ।। भ्रमा भ्रमी गावे रे ।।**
**पारब्रम्ह लग निर्गुण पोहोचे ।। फिर फिर पाछा आवे रे ।। ११ ।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,या केवलच्या भक्तीला तर कोणी जाणत नाही.म्हणजे केवल भक्तीचा भेद माहित नाही.त्याची अनुभुति घेतली नाही. परंतु वेद, शास्त्र,पुराणात केवल सांगितले आहे.त्याला वाचून आम्हाला केवल मिळाले असे समजतात.निर्गुणाचे ज्ञानी निर्गुण पारब्रम्हची भक्ती करुन केवलपद मिळून गेले. म्हणून जाणतात.परंतु ते पारब्रम्हपर्यंतच पोहचतात आणि फिरुन फिरुन परत पलटून येतात.असे हे सर्व भरमा–भरमी गात आहेत.।।११।।

**सुर्गुण निर्गुण कर कर भक्ति ।। सब रिष पच पच मुवारे ।।**
**आवागवण मिटी नही कोई ।। पद सूं रेग्या जुवारे ।।१२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदाला समजावतात की,कित्येक ऋषींनी सगुण म्हणजे वेद,शास्त्र,पुराण यातील विध्या करुन पचून पचून मरुन गेले.तसेच कित्येक ऋषींनी निर्गुण ब्रम्हची साधना करुन पचून–पचून मरुन गेले.परंतु यांचे आवागमन मिटले नाही आणि हे सर्व सतस्वरुप पदापासून वेगळे होऊन गेले. ।।१२।।

**मुर्त मुर्त सब ही गावे ।। कर्णी सबे पिछाणे रे ।।**
**बिन मूरत करणी बिन पावे ।। आगत कोई हन जाणे रे ।।१३।।**

जगातील लोक परमात्म्याच्या प्राप्ती करीता मूर्ति पूजा करतात आणि मूर्तित परमात्म्याला शोधतात तसेच वेदांमधील मायावी करण्या करुन मला साहेब मिळेल असे समजतात.परंतु मी मूर्ति पूजा न करता तसेच कोणती ही मायावी करणी न साधता त्या पदात पोहचवितो त्याची गती कोणी जाणत नाही. ।।१३।।

**मो कूं दया तुमारी आवे ।। सुण लीज्यो नर नारी रे ।।**
**सतस्वरूप की भक्ति बिना ।। फंद पड़े सिर भारी रे ।।१४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील स्त्री–पुरुषांना सांगतात की,मला तुमची

दया येते.कारण की,सतस्वरुपाच्या भक्ती शिवाय तुमच्यावर भारी फंद पडतील म्हणजे होणकाळाच्या जगाची सगुण तसेच निर्गुण भक्ती केल्याने तुमच्या जीवासोबत ५ आत्मा,मन,तसेच कर्म मिटणार नाही.याकारणाने जन्मणे-मरणे ८४,००००० योनी तसेच अगतीचे दु:ख भोगावे लागते.असा भारी फंद पडेल. ।।१४।।

**क्रणी बिना गिगन दूं चाडी ।। अेकं पोर पल माही रे ।।**
**मुद्रा कूंची ना कोई आसण ।। तोई जग जाणे नाही रे ।।१५।।**

मी तुम्हाला मायेची कोणतीही करणी केल्या शिवाय कोणतीही मुद्रा साधल्या शिवाय, योगाभ्यासाची कोणतीही कुंची केल्या शिवाय तसेच कोणतेही आसन साधल्या शिवाय गगणात म्हणजे ब्रम्हांडात एक प्रहरात नाही.तर एका पळात पूर्वेचे ६ आणि पश्चिमचे ६ कमळांचे छेदन करुन दहाव्याद्वारात पोहचून देतो,तरीही जगत मला जाणत नाही. ।।१५।।

**पच पच मरे जोगेसर सारा ।। तोही गड़ चड़यो न जावे रे ।।**
**मो संग अनंत सेज मे चड़ गया ।। तोई इतबार न आवे रे ।।१६।।**

योगश्वर यांना सतस्वरुप विज्ञानरुपी गडावर चढायचे होते.परंतु हे पचून-पचून मरुन गेले.तरी ही त्यांच्याने सतस्वरुप विज्ञानरुपी गडावर चढले गेले नाही आणि माझ्या सोबत अनंत म्हणजे मोजता येत नाही इतके हंस सहजामध्ये सतस्वरुपी विज्ञानरुपी गडावर चढून गेले.तरी ही लोकांना माझा विश्वास येत नाही. ।।१६।।

**पच पच चड़े गिगन मे ऊंचा ।। सेज समाध न पावे ।।**
**मो संग चड़े जिकांरे भाई ।। आठ पोर गरणावे ।।१७।।**

कित्येक पचून-पचून म्हणजे मेहनत करुन वरती ब्रम्हांडात चढून गेले तरी ही त्यांना सहज समाधी मिळाली नाही आणि माझ्या संगाने जे चढले त्यांच्या ब्रम्हामध्ये अष्टोप्रहर शब्द गुंजत आहे म्हणजे गरनाट करुन राहीला आहे. ।।१७।।

**सता समाध रात दिन लागी ।। मो संग चडीया ज्यांरे रे ।।**
**पवन खेंच पच पच चड़ीया ।। उतरत कुछ नई बारा रे ।।१८।।**

माझ्या संगतीने जे चढलेले आहेत त्यांची रात्रं-दिवस समाधी लागलेली असते आणि श्वास खेचून-खेचून पचून-पचून जे चढलेले आहेत त्यांना उतरण्यास काहीही वेळ लागणार नाही. ।।१८।।

**ग्यानी तके मांड मे सारा ।। कोई नही जीतण पावे रे ।।**
**अेक साख मे सब कूं पकडूं ।। तोई इतबार न आवे रे ।।१९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे संसारातील जितके ही ज्ञानी आहेत ते सर्व कोणीही मला जिंकू शकणार नाही.मी एकाच वचनात सर्व ज्ञानींना पकडून घेतो

म्हणजे अमरलोकाची एक साखी म्हटली(सांगितली)तर ते चुप बसून जातात.कारण, त्यांना त्या देशाच्या बाबतीत माहितीच नसते.तरी ही लोकांना माझ्या विश्वास येत नाही. ।।१९।।

**माया चरित नही केवळ मे ।। पाखंड रूपी भाई रे ।।**

**जे प्रचा बाहेर ला हूवे ।। केवळ लजायो आई रे ।। २० ।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,आमच्या केवलमध्ये मायेचे चरित्र म्हणजे पर्चे चमत्कार नाहीत जे बाहेर पर्चे चमत्कार करतात ते सर्व पाखंड्चे रुप आहेत म्हणजे त्यांच्यात केवळ नाही,माया आहे.म्हणजे सर्व खोटे आहे.असे जे बाहेर पर्चे चमत्कार करतात त्यांना केवल म्हणतात.त्यांनी केवलला लाजविले आहे. ।।२०।।

**ग्यानी सबे गृस्तो जेसा ।। संत बुध नही कोई ।।**

**केवळ भक्त को भेद न जाणे ।। क्या पिंडत क्या लोई रे ।।२१।।**

संसारातील सर्व ज्ञानी गृहस्थी सारखे आहेत.या ज्ञानींमध्ये संत बुध्दी कोणत्याही ज्ञानीची नाही.या केवल भक्तीचा भेद कोणी जाणत नाही.काय पंडित आणि काय दुसरे लोक कैवल्याचा भेद कोणाला ही माहित नाही. ।।२१।।

**म्हे तो भक्त करूं उण पद की ।। तां कूं ईस न पायो ।।**

**समज बिना कोई नही माने ।। सुणिया इच्रज आयो रे ।।२२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात मी तर त्या पदाची भक्ती करतो जे पद महादेवाला ही मिळाले नाही.रात्रं-दिवस राम राम घेत असतांनाही महादेवाला जे पद मिळाले नाही.त्या पदाची मी भक्ती करतो.जगातील ज्ञानींना त्या पदाची समज नसल्या कारणाने ते त्या पदाला जाणत नाही.उलट त्यांना सांगितल्यावर गोष्ट ऐकून आश्चर्य होते की जे पद महादेवाला मिळाले नाही ते मला मिळाले म्हणून. ।।२२।।

**मोख मोख केंता सब कोई ।। सो ओं मारग होई रे ।।**

**सो प्रगट कीया हम जगमे ।। निरख परख ल्यो सोई रे ।।२३।।**

तुम्ही सर्व लोक जे मोक्ष-मोक्ष म्हणतात ते तर हेच जे मी सांगतो तो मोक्षाचा रस्ता आहे.तो मोक्षाचा रस्ता मी जगात प्रगट केला आहे.त्याला सर्वजण निरखून-पारखून घ्या. ।।२३।।

**अंध मुंध मे म्हेमा करग्या ।। सतसरूप की सारा रे ।।**

**गेल भेद पाया बिन बकीया ।। कोई नही उतरे पारा रे ।।२४।।**

मी सांगतो,त्या सतस्वरुपाची महिमा आधी ही कित्येक संत करुन गेले.परंतु ते संत अंध मुंध मध्ये पूर्ण ज्ञान नसल्यवर जे काम करतात त्याला अंध-मुंध म्हणतात.अशा अंध-मुंधमध्ये महिमा करुन गेले.ते आधीच्या महिमा करुन गेलेल्या संतांनी रस्ता आणि

भेद मिळाल्या शिवाय कोणी ही पार उतरले नाही. ।।२४।।

**के सुखराम सुणो सब ग्यानी ।। न्याव सत सुण लिज्यो ।।**
**अहूं भाव हूं पद तज दूरो ।। केवळ निर्णो कीज्यो ।।२५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व ज्ञानींनो,वेदांती याचा सत न्याय ऐकून घ्या.अहंभाव(अहंकार),अहंपद(अभिमान)सोडून,दूर करुन या केवलचा निर्णय करा.।।२५।।

५४

।। पदराग जोग धनाश्री ।।

**बांदा ओ कोई भेद बतावे**
**अंछर बिना बिंद बिना उलटर ।। गिगन कोण बिध जावे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीस सांगतात की,अक्षरा शिवाय म्हणजे ओअम अक्षर या मायेच्या शिवाय तसेच बिंद शिवाय म्हणजे मन आणि ५ आत्म्याच्या शिवाय घटात उलटून स्वर्गाच्या रस्त्याने सतस्वरुप गगनात सतस्वरुपाची समाधी कशी लागेल हा भेद मला सांगा.

जगात समाधी दोन प्रकारची आहे.

१ त्रिगुणी मायेच्या सोबतची समाधी आणि २ त्रिगुणी मायेच्या पलिकडील सतस्वरुपाच्या सोबतची समाधी

| त्रिगुणी मायेच्या सोबतची समाधी | सतस्वरुपाची समाधी |
|---|---|
| या समाधीमध्ये हंस अक्षर म्हणजे ओअमच्या आधाराने मन तसेच ५ आत्माने भृगुटी गगनात जातो. हा भेद सर्व ज्ञानी,ध्यानी वेद,शास्त्र जाणतात. | या समाधीत हंस बिना ओअमच्या आधाराने आणि मन त्रिगुटीत त्यागून दहाव्याद्वारात सतस्वरुप गगणात जातो. हा भेद ज्ञानी,ध्यानी,वेद,शास्त्र जाणत नाही.हा भेद कोणी विरळाच जाणतो. |

**अेक नाद बिंद सो भेळा कहीये ।। अेक नाद सो जूवा ।।**
**अेक ने: अंछर न्यारा प्रगटे ।। अेक अंछर संग हूवा ।।१।।**

| त्रिगुणी मायेच्या सोबतची समाधी | सतस्वरुपाची समाधी |
|---|---|
| या समाधी विधीने भृगुटी गगनात चढल्याने नाद म्हणजे हंस ब्रम्ह आणि बिंद म्हणजे मन तसेच ५ आत्मा माया ह्या दोन्ही जशा आदि एकत्र होत्या तशा एकत्र असतात. म्हणजे हंसाच्या सोबत समाधीच्या आधी जसे हया ५ आत्मा आणि मन होते तसेच समाधीच्या नंतरही हंसाच्या सोबत ५ आत्मा आणि मन असते. | या समाधी विधीने दहाव्याद्वाराच्या गगणात चढल्याने नाद म्हणजे हंस ब्रम्ह ५ आत्मा बिंद पासून नाभीत, मन बिंदूपासून त्रिगुटीत वेगळा होतो. |

या समाधीत हंसाच्या सोबत ओअम शब्द आदिमध्ये होता तोच सोबत राहतो. ओअम शब्दापेक्षा निराळा ने: अक्षर प्रगटत नाही.

या समाधी विधीने दहाव्याद्वाराच्या गगणात चढल्याने नाद म्हणजे हंस ब्रम्ह ५ आत्मा बिंद पासून नाभीत, मन बिंदूपासून त्रिगुटीत वेगळा होतो.

||१||

**अेक तत्त ग्यान कहे हम चीन्यो ।। अेक समज सूं न्यारो ।।**
**अेक ध्यान ऊतर चड़ जावे ।। अेक अखंड बिचारो ।।२।।**

मुलद्वाराने जो साधक भृगुटीत चढतो तो आपल्या मताने तत्तज्ञान म्हणजे होणकाळ पारब्रम्हलाच सतस्वरुपतत्त समजून सतस्वरुप तत्तला ओळखले म्हणून माया समजने म्हणजे माया माता व ब्रम्ह पिता या कुळ समजने सांगतो.
* मुलद्वाराने भृगृटीत चढणाऱ्याचे ध्यान भृगुटीतून उतरुन मूलद्वारावर येऊन जाते. अशा मोठया मेहनतीने भृगुटीत चढवलेले ध्यान सहज उतरुन जाते.

संखनाळेने उतरुन बंकनाळेने दहाव्याद्वारात चढणारा साधक सतस्वरुप तत्त हा माया माता व ब्रम्ह पिता या कुळाच्या ज्ञानाने समजत नाही असे म्हणतो.
* दहाव्याद्वारात चढणाऱ्याचे ध्यान दहाव्याद्वारातून उतरुन कंठस्थानावर कधी ही येत नाही. त्याचे ध्यान सतशब्दाच्या सोबत अखंडित असते. होणकाळाच्या कोणत्याही विधीने ध्यान खंडित होत नाही.

||२||

**मुद्रा अेक समज संग लागे ।। अेक कळा बिन भाई ।।**
**अेक अखंड लिव सो लागी ।। अेक खिरे खिर जाई ।।३।।**

भृगुटी

त्रिगुणी मायेची मुद्रा सुध बुधच्या समजने लागते. मायेच्या समजची भूल पडून गेली तर मुद्रा खंडित होऊन जाते.
* भृगुटीच्या माया साधकाची मायेच्या सोबतची लिव तुटून तुटून जाते.

दसवाद्वार

सतस्वरुप

दहाव्याद्वाराशी

मुद्रा मायेच्या सुध-बुध समजच्या पलिकडे असते. या मुद्रेमध्ये मायेच्या सुध-बुधची समजची जरा ही गरज राहत नाही.अशी मुद्रा कुद्रती बिना मायेच्या समजच्या आधारावर राहते.
* दहाव्याद्वाराचे सतस्वरुपाचे साधक सतस्वरुपाच्या सोबतची लिव अखंडित असते.

||३||

**अेक सता समाध सुरत संग लागी ।। अेक सुरत सेंई न्यारी ।।**
**अेक निद्रा माय मिट गई नासत ।। अेक अखंडत प्यारी ।।४।।**

मायेच्या सोबतची
सत्ता समाधी
साधकाला सुरतच्या
आधाराने लागते.

✻ भृगुटीची ओअमची मायेची समाधी साधक निद्रेत जाताच मिटून जाते. अशी ही समाधी नासत म्हणजे नक्कल समाधी आहे.

सतस्वरुपाच्या सोबतची
सत्ता समाधी साधकाला
विना सुरतने लागते.
या सत्ता समाधीला
त्याची सुरत लावण्याची
कोठे गरज राहत नाही.

✻ दहाव्याद्वाराची सतस्वरुप सतशब्दाची समाधी साधक निंद्रेत गेले तरी ही अखंड्ति असते. साधकाला निद्रा आल्याने खंड्ति होत नाही. अशी ही प्रिय म्हणजे अस्सल समाधी आहे.

।।४।।

**अेक समाध पवन संग लागे ।। अेक न: केवळ भाई ।।**
**अेक पोर सवा लग बारे ।। अेक जुगाँ लग जाई ।।५।।**

भृगुटीत मायेपासून
लागलेली समाधी
ओअम या श्वासा
सोबत लागते.

✻ भृगुटीची ओअमची समाधी सव्वा प्रहर म्हणजे सतस्वरुपाच्या समाधीच्या तुलने थोड्या वेळा करीता लागलेली असते.
त्या साधकाची सुरत ओअम मायेपासून वियोग होताच समाधी तुटून जाते.

दहाव्याद्वाराची सतस्वरुपाची
समाधी बिना श्वासाने
अशी निकेवल म्हणजे
बिना कोणत्या मायेच्या
आधाराने लागते.

✻ सतस्वरुपाची दहाव्याद्वाराची समाधी युगानुयुग म्हणजे हंस जो पर्यंत दहाव्याद्वाराच्या पलिकडील अमरलोकात सदाकरीता जात नाही. तो पर्यंत लागलेली असते. तो हंस अमरलोकाला जावा तोपर्यंत किती ही वेळा मनुष्य देहात आला तरी ही त्याची समाधी दहाव्याद्वारातच लागलेली असते. दहाव्याद्वाराच्या खाली कधी येणार नाही.

।।५।।

**के सुखराम सुणो सब ग्यानी ।। याँरा सुख बतावे ।।**
**सुणर कहे सो झूटा जग मे ।। पोहोंच खबर कोई लावे ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानींना विचारतात की,असे दहाव्याद्वाराच्या सतस्वरुप गगनाच्या समाधीचे सुख सांगा.
जो या समाधीत पोहचलेल्या संताच्या(दादुसाहेब,दर्यावसाहेब,कबीर साहेब,नानक साहेब) गोष्टी ऐकून सांगतात,ते खोटे आहेत आणि जो सतस्वरुपाच्या समाधी देशात जाऊन सतस्वरुपाची खबर आणतात तेच खरे आहेत. ।।६।।

६५

।। पदराग आसा ।।

बांदा सत सबद हे न्यारा

वाँसे सबद कोई नही निकस्या ।। ना अब निकसन हारा ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीला सांगतात,कि सत्त शब्दाने आजपर्यंत एक ही हंस होनकाळा सारखा जगात जन्मला नाही आणि पुढे ही कधी जन्मणार नाही. या प्रकारे होनकाळा ने जसे पाच तत्वाची सृष्टी बनली तशी सृष्टी ही बनत नाही आणि पुढे ही बनणार नाही. ।।टेर।।

अनाद सब्द सूं नाद हुवा रे ।। नाद जिंग कूं जायो ।।

जिंग माँय सूं जोत ऊपनी ।। तामे बिंद समायो ।।१।।

अनाद शब्द ने म्हणजे होनकाल पारब्रम्ह ने नादब्रम्ह उपजला या नाद ने जिंग ध्वनीला जन्म दिला.जिंग ध्वनी ने ज्योत निर्माण झाली.त्या ज्योतीत बिंदु माया सामावली. ।।१।।

नाद बिंद दोनु भेळा ।। जोत माँय सूं आया ।।

या दोना मे हंस प्रगटयो ।। त्रगुटी आण समाया ।।२।।

नाद पुरुष आणि बिन्दू स्त्री हे दोन्ही एकत्र आले,त्याचातून हंस प्रगटला.तो हंस त्रिगुटीत सामावला. ।।२।।

हंस माँय सू जीव ऊपजे ।। सोई बिंद संग होई ।।

याँ मे पाँच तत्त सो उपण्या ।। यू आ माँड बणी सब लोई ।।३।।

हा हंस बिंदु म्हणजे त्रिगुणी मायाचा बरोबर जीव बनला.या जीवा ने पाच तत्वाचा देह धारण केला.या प्रकाराने पाच तत्वाची सृष्टी बनली आणि होनकाळ ने पाच तत्वाचे जीव जन्मले. ।।३।।

सत्त सबद की कळा कुवावे ।। ज्युं ब्रछ की सुण छाया ।।

युं कुद्रत कळा सकळ सूं न्यारी ।। नही हुणकाळ मे भाया ।।४।।

सतशब्दाची कळा होनकाल पारब्रम्ह सारखी जन्म देणारी नाही आहे.झाडाचा सावली सारखी आहे.जसे झाडाचा सावलीत,झाड प्रगट करण्याची रीत नाही आहे परंतु सुर्याचा उष्णते पासून जीवाला वाचवून सुख देण्याची रीत आहे.तसेच जीवाला काळापासून वाचवून सुख देण्याची रीत आहे.ही कुद्रतकळा अशी म्हणविले जाते,जशी झाडाची सावली.अशी कुद्रतकळा सर्वाहून वेगळी आहे.ही कुद्रतकळा होणकाळाची उत्पन्न करण्याचा कळे पेक्षा वेगळी आहे.ह्या हंसाला मोक्षाला घेवून जाण्याची कुद्रतकळा होणकाळची कोणतीही कळेने प्रगट होत नाही. ।।४।।

कुद्रत कळा तका सुण आदु ।। मोख जावण के ताँई ।।

जो जन माँय प्रगटे आई ।। से पाप पुन्न बस नाँई ।।५।।

ही कुद्रत कळा आदि पासून मोक्षाला घेवून जाण्या करीता आहे.ज्या संताचा घटात ही कुद्रत कळा प्रगट होते तो संत होणकाळचा कले सारखा काळाचे पाप पुण्य भोगत नाही. ।।५।।

वे हंस जाय मिलेगा केवळ ।। बीचे थुंभे न कोई ।।
कुद्रत कळा बिना सब करणी ।। जामे मोख न होई ।।६।।

कुद्रत कला प्राप्त केलेले हंस केवळचा महासुखात जावून मिळतात.त्या होणकाळाचा माया चे तीन लोक चौदा भवन आणि तीन ब्रम्हचे तेरा लोकातून कोणत्याही देशात कर्म भोगण्या करीता थांबत नाही.अंतिम समयी तो मृत्युलोक सोडताच मोठ्या सुखाचा अमरलोकात जातो.कुद्रत कळा सोडून अन्य मायाची सर्व क्रिया करण्या साधण्याने हंस मोक्षात जात नाही.तो त्याचे केलेले पाप पुण्याचा अनुसार स्वर्गापासून नरकापर्यंत दु:ख भोगतो.।।६।।

के सुखराम म्हेर सतगुरू की ।। वा कुद्रत कळा कुवावे ।।
ओर गुरांकी दया मन सूं ।। मुख कहयाँ सूं पावे ।।७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,कि कुद्रत कळा सतगुरुचा मेहेर ने प्राप्त होते म्हणजे ही सतगुरुत प्रगट झालेली सतस्वरुपचा दयेने प्राप्त होते आणि होणकाळची रिध्दी सिध्दीची कळा गुरुचा मनाने किंवा तोंडाचा वचनांने प्राप्त होते.या रिध्दी सिध्दीचा कळे ने हंसाचा मोक्ष होत नाही. ।।७।।

६८

।। पदराग आसा ।।

बांदा से जन पूरा जोगी
पोहोंचर कहे से साचा जन हे ।। सुणर कहे सो झुटा रोगी ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीस म्हणतात की हे हरजी भाटी जो सतस्वरुप पाहुन म्हणतात ते खरे संत आहेत.ते पुर्ण विज्ञान योगी आहेत जो सतस्वरुप न पाहता सतस्वरुप संताचे ज्ञान ऐकुन ऐकुन जगात सतस्वरुपाचे ज्ञान सांगतात ते म्हणायला योगी आहेत खोटे योगी आहेत सतस्वरुपात पोहचुन देणारे सक्षम योगी नाहीत. ।।टेर।।

अेक घाट पुर्ब को कहीये ।। अेक पिछम को मोई ।।
पुरब चडे सो कुण शब्द रे ।। कहो पिछम को मोई ।।१।।

एक घाट पुर्वेचा म्हणजे संखनाळचा आहे तर एक घाट पश्चिमेचा म्हणजे बकंनाळचा आहे कोणता शब्द पुर्वेच्या दिशेने लागणाऱ्या घाटावर चढवितो तर कोणता शब्द पश्चिम दिशेच्या लागणाऱ्या घाटावर हे मला सांगा. ।।१।।

पुर्ब घाट चडे. सो अंछर ।। क्हो क्हाँ सूं लावे ।।
पिछम घाट चडे जो उंचो ।। क्हो क्हाँ सूं लावे ।।२।।

पुर्व दिशेने चढणारा अक्षर कोठुन येतो व पश्चिमे कडुन उंच गडावर चढणारा शब्द कोठुन प्रगटतो हे मला समजवा. ।।२।।

पुरब दिसा चडेसो ऊँचो ।। किसो नाव क्हो भाई ।।
पिछम दिसा पहाड़ चड़ जावे ।। किसी रीत कर माई ।।३।।

पुर्वेकडुन उंच गडावर चढतो त्याचे काय नाव आहे व पश्चिमेकडुन उंच गडावर चढतो त्याची काय रित आहे त्याचे काय नाम आहे हे मला सांगा. ।।३।।

के सुखराम सुणो सब ग्यानी ।। अे न्यारा कर लावे ।।
केवळ बीज अेक माया को ।। सब न्यारो कर पावे ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,साधु,सिध्दाना म्हणतात की जो संत केवल काय व त्रिगुणी माया काय याला भिन्न भिन्न तऱ्हेने फरक समजेल तोच पुर्ण जोगी आहे. ।।४।।

६९
।। पदराग आसा ।।

बांदा से नर मोख न जावे
सतश्रुप आणंद पद कहिये ।। ओ कोई भेद न पावे ।।टेर।।

बांदा म्हणजे हरजी भाटीला आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात व्रत एकादशी करणारा,यज्ञ करणारा,हटयोग साधणारा,सांख्ययोग साधणारा,जप,तप,सत,करणारा, ओअमची साधना करणारा,पाची मुद्रा साधणारा,ब्रम्हाच्या वेदांच्या क्रिया-करण्या करणारा,महेशचा भेद साधणारा,शक्ती तसेच शेषनागाचा लबेद साधणारा,विष्णूची नवविद्या भक्ती साधणारा,गायत्री मंत्र जपणारा इत्यादी कोणत्या ही प्रकारची सगुण भक्ती करणारा कोणी ही मनुष्य काळापासून सुटणार नाही.तसेच सोहम या जीवब्रम्हची तसेच अजप्पा या होणकाळ पारब्रम्हची निर्गुण भक्ती करणारा ही कोणीही मनुष्य मोक्षाला जाणार नाही.म्हणजे जोपर्यंत सतस्वरुप आनंदपदाचा भेद मिळत नाही. तोपर्यंत सगुण पदाच्या कोणत्या ही भेदाचा किंवा निर्गुण पदाच्या कोणत्याही भेदाचा कोणताही मनुष्य मोक्षाला जाणार नाही.काळापासून सुटणार नाही.अनंत सुखांमध्ये जाणार नाही.।।टेर।।

सर्गुण भक्त सकळ जग जाणे ।। निर्गुण कोई अेक ग्यानी ।।
अे दोनु नूगरा इण जग मे ।। पद की भक्त न जाणी ।।१।।

सगुण म्हणजे रजोगुण ब्रम्हा,सतोगुण विष्णु,तमोगुण शंकरापासून उपजलेल्या भक्त्या सर्व जगातील स्त्री-पुरुष जाणतात.निर्गुण म्हणजे निराकारी होणकाळ पारब्रम्हची भक्ती

जगातील मोजकेच स्त्री–पुरुष जाणतात.या दोघांनी म्हणजे सगुण भक्तांनी मातेची भक्ती धारण केली आणि निर्गुण भक्तांनी पित्याची भक्ती धारण केली.परंतु या दोघांनी सतस्वरुप आनंदपद गुरुची भक्ती स्वीकारली नाही.यामुळे हे जगातील सर्व सगुण भक्त आणि निर्गुणचे सर्व भक्त नुगरे राहीले.(गुरुच्या मोक्ष विधिपासून दूर राहीले)।।१।।

**निर्गुण हंस को पिता कही जे ।। सुर्गुण सो माता होई ।।**
**सतगुरु बिना मोख कीम पोंचे ।। केंता हे सब कोई ।।२।।**

जसे जगात हंस देह धारण करण्याच्या आधी पित्याच्या भृगुटीत राहतो आणि मातेच्या गर्भात पडून शरीर धारण करतो.अशाप्रकारे आधी हंस पारब्रम्ह पित्याच्या भृगुटीत होता.पाची इंद्रियांच्या सुखांच्या चाहणेने पित्याची भृगुटीला त्यागून त्रिगुणी मायेच्या पोटात आला आणि नऊ तत्त लिंग निराकारी शरीर धारण केले.अशाप्रकारे ज्ञान दृष्टीने सर्व स्त्री–पुरुष समजा की त्रिगुणी माया ही हंसाची माता आहे तर होणकाळ पारब्रम्ह हा हंसाचा पिता आहे.जगात माता,पिता तसेच वेदी गुरु असतात.जगातील सर्व ज्ञानी,ध्यानी तसचे स्त्री–पुरुष सांगतात की,वेद,भेदाच्या वैराग्य ज्ञानाच्या विध्या गुरुच्या शरणातच मिळतात.घरात मातेपासून किंवा दुकानात पित्या पासून मिळत नाही.जगातील लोक देहधारी माता–पित्याची समज ठेवून कुटूंबाच्या पलिकडील वेदी–भेदी गुरुच्या प्रती समज ठेवतात आणि सांगतात की,कुळाच्या माता–पित्यापासून मोक्ष मिळणार नाही.मोक्ष मिळविण्याकरीता सतगुरुचा शरणाच पाहिजे.परंतु जीवाला मोक्ष घेवून जाण्याचा विषय येतो,तेंव्हा सर्व जगातील लोक त्रिगुणी माया या मातेलाच गुरु समजून मोक्षाची आशा करतात किंवा मोजकेच स्त्री–पुरुष निराकारी पारब्रम्ह पित्याला मोक्षाचे अधिकारी गुरु समजून शरणा धारण करतात.परंतु जीवाचे माता पिता आणि गुरुची समज जराही ठेवत नाही. ।।२।।

**बेद भेद सब ने जस गायो ।। मात पीता को भाई ।।**
**सत्त गुर गम ना जाणी यां ने ।। सब नुगरा जग माही ।।३।।**

चारी वेदांचा रचयीता ब्रम्हा,भेदाला प्रगट करणाऱ्या शंकराने,लबेदला जगात आणणाऱ्या शक्तीने,जगात नवविद्या भक्ती प्रगटविणाऱ्या विष्णुने सगुणी माया किंवा निर्गुणी पारब्रम्ह पासूनच मोक्ष मिळतो हे समजले आणि तेच आपल्या ज्ञानात सांगितले ब्रम्हा,विष्णू, महेश,शक्ती यांनीही माया ही माता आहे आणि पारब्रम्ह होणकाळ हा पिता आहे हे सतगुरु नाहीत हे जाणलेच नाही,म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ब्रम्हा,विष्णू,महेश,शक्ती,अवतार यांचे सर्व साधू संत,ऋषी–मुनी,ज्ञानी,ध्यानी हे सर्व नुगरे आहेत सतगुरु आनंदपदाचे शिष्य नाहीत. ।।३।।

**बेद भेद का हुवे ऊपासी ।। जब जग केहे कूछ नाही ।।**

**सतगुरू भेद अणंद पद ईचरज ।। ग्यलो करे जग माही ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जोपर्यंत स्त्री–पुरुष वेद भेद म्हणजे त्रिगुणी माया किंवा पारब्रम्ह पर्यंतची भक्ती करतात.तोपर्यंत जगाचे ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुष त्या मनुष्याला चांगले–वाईट काही म्हणत नाही.परंतु आनंदपद सतगुरुचा भेद धारण करताच त्या मनुष्याला वेडे करुन टाकतात.त्याला सतगुरुच्या ज्ञानात सुचू देत नाही असे आश्चर्य आहे. ।।४।।

**जिऊँ संसार छाड़ नर कोई ।। संत सरण कोई जावे ।।**
**जब सब गांव आण कर बर्जे ।। ओ कांई क्रम संबावे ।।५।।**

कोणी मनुष्य कुटुंब परिवार त्यागून बैरागी साधूच्या शरणात जातात.तेंव्हा त्याचे कुटुंब परिवाराचे तसेच सगे संबंधी सहीत सर्व गाववाले कुटुंब परिवार त्यागून संत बनण्या करीता मनाई करतात आणि कुळ संसार त्यागून वैरागी बनण्याचे काय कर्म सांभाळले ही नाराजी व्यक्त करतात. ।।५।।

**पांच नाव सुण चेलो होवे ।। जे कुळ नही छोडे कोई ।।**
**तब लग जहान कोई नही बरजे ।। ईऊँ बेद ऊपासक होई ।।६।।**

कोणी मनुष्य कुटुंब परिवार त्यागून वैरागी न बनता कुटुंबातच राहून वेदाची उपासना करतात तोपर्यंत संसारात कोणी मना करीत नाही तसेच ने:अक्षर वैरागी न बनता त्रिगुणी माया माता आणि पारब्रम्ह पित्याच्या घरात राहून पाच नाम(ज्योत–निरंजन,ओंकार, सोहम,रंरकार,सतनाम)धारण करतो.त्याला ही माता किवां पिता तसेच या दोघांचे साधू संत पाच नाम धारण करण्याकरीता मना करत नाही. ।।६।।

**स्वामी हुयां जक्त सब कापे ।। मात पीता कूळ रोवे ।।**
**इंऊं ग्यान मे इचरज सांसो ।। नांव उदे ज्या होवे ।।७।।**

जसे गुरुजवळ जाऊन स्वामी म्हणजे वैरागी साधू बनतो.तेंव्हा त्याचे जवळचे सर्व लोक दु:खाने कापतात आणि आई,वडील तसेच अन्य कुळाचे लोक रडतात.तसेच मनुष्याच्या हंसात ने:अक्षर नाम प्रगट झाल्यावर जगातील सर्व देवता तसेच माया माता आणि पिता ब्रम्ह दु:खी होतात आणि हंस होणकाळातून निघून जाईल याच्याकरीता चिंतीत होतात असे या ज्ञानात आश्चर्य आहे आणि चिंता ही आहे. ।।७।।

**सर्गुण निर्गुण दोनु भक्ति त्यागे ।। नही ज्हान सूं जूवो ।।**
**नांव कळा ऊपदेश संभायो ।। तब बेरागी हूवो ।।८।।**

जसे कोणी मनुष्य घरात माता ही सेवा करीत नाही आणि पित्याचाही धंदा करीत नाही.आणि या दोन्ही सेवा न करता घरातच राहतो.घरातून निघून वेदी वैरागी गुरु पासून वैराग्य ज्ञान शिकत नाही.तोपर्यंत तो मनुष्य वैरागी बनत नाही.अशाप्रकारे कोणी

मनुष्य ब्रम्हा,विष्णू,महेश सगुणची भक्ती ही आणि निर्गुण पारब्रम्हची भक्ती ही त्यागतो आणि सतस्वरुप गुरु पासून वैराग्य विज्ञानाच्या नामाचा भेद धारण करीत नाही. तोपर्यंत तो हंस विज्ञान वैरागी बनत नाही.होणकाळ कुळाचाच जीव बनला राहतो. ।।८।।

**सुणे उपदेश हमारो संतो ।। माया ब्रम्ह सब रोवे ।।**
**के सुखराम बाप ब्रम्ह को ।। यो नही बेरागी होवे ।।९।।**

जसे कोणी मनुष्य मातेशी संबंध त्यागून फक्त पित्याचाच धंदा पकडतो तरी ही तो वेदी वैरागी बनत नाही.अशाप्रकारे पिता होणकाळ पारब्रम्हला वैरागी पकडून पारब्रम्हची ही भक्ती करतो तरी ही तो वैरागी बनत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,विज्ञान वैरागी तर माझे विज्ञान वैराग्य ऐकल्यावरच बनतो आणि तो हंस माता–पित्यांच्या घरातून निघून सतस्वरुप आनंदपदात पोहचतो.जेंव्हा हंस होणकाळ कुळ त्यागुन आनंदपदात पोहचतो तेंव्हा माया माता तसेच पारब्रम्ह पिता दोन्ही रडतात.।।९।।

७०

।। पदराग आसा ।।

## बांदा ने: अंछर सुण न्यारा

**बांदा ने:अंछर सुण न्यारा । सतगुरू म्हेर नाव घट जागे । तब कोई लखे बिचारा ।टेर।**

बांदा ने:अक्षर हा निराळा आहे.जेंव्हा शिष्यावर सतगुरुची मेहर होते तेंव्हा शिष्याचा घटात निजनाम जागृत होते तोपर्यंत शिष्याला ने:अक्षर,समजण्यात येत नाही.।।टेर।।

**श्रवण सुणे नेण सूं देखे ।। मुख सूं क्हे कुछ कोई ।।**
**अनंत बास तन माही म्हेके ।। सो पण नाव न होई ।।१।।**

कानाने जे बावन अक्षर ऐकतो,डोळ्यांने दृश्य पाहतो,तोंडाने बावन अक्षर बोलतो आणि सुगंधी प्रगट करणारी मायाची विधी साधल्याने अनंत सुगंधी या शरीरात महकते याच्यातला एक पण ने:अक्षर नाही.।।१।।

**ओऊं सोहं सब्द अजपो ।। मन कर सिंवरे कोई ।।**
**राम राम सिंवरे हे कोई ।। अेई नाव न होई ।।२।।**

ओअम,सोहम,अजप्पा,राम राम मन लावून स्मरण करेल,अशा शब्दाने किती ही मन लावून रटले तरी ही याच्यातला एक पण शब्द ने:अक्षर शब्द नाही. ।।२।।

**देहे धारी सो सबही माया ।। आणंद ब्रम्ह नही कोई ।।**
**क्या अवतार देव अरू दाणूं ।। सब ही माया होई ।।३।।**

तीन लोक चौदह भवनात रामचंद्र,कृष्ण वगैरे अवतार,ब्रम्हा,विष्णु,महादेव वगैरे देव आणि बिभीषण,बली,कुबेर वगैरे राक्षस हे सर्व माया आहे.हे कोणी ने:अक्षर संत नाही.।।३।।

नेण नासका श्रवण बुंदे ।। मुख के चुपक लगावे ।।
बाजा सुणे उजाळा देखे ।। यूं निजनाव न पावे ।।४।।

डोळे,कान,नाक बंद करुन,तोंडास बंद करुन वाजे ऐकतात आणि उजेड पाहतात.असा ऐकण्यात येणारा या मायेचा कोणत्याही विधीत ने:अक्षर प्रगट करण्याचा भेद नाही.।।४।।

त्राटक ध्यान खेचरी मुद्रा ।। रेचक पुरक साजे ।।
ने: अंछर यूं भेद न पावे ।। पवन गिगन चड़ गाजे ।।५।।

त्राटक ध्यान करने,पाच मुद्रा साधने,रेचक,पूरक,करने पवन गगनात चढवणे,त्याची गर्जना ऐकणे,या मायेचा कोणत्याही विधीत ने:अक्षर प्रगट करण्याचा भेद नाही. ।।५।।

नेती करे धोतियां कोई ।। आताँ काढ पखाळे ।।
ने: अंछर वो कोई न पावे ।। भावे तप कर जाळे ।। ६ ।।

नेती करने,धोती करने,आतड्याला बाहेर काढून धुणे,शरीराला तपश्चर्या करुन जाळने या विधीत ने:अक्षर प्रगट होत नाही. ।।६।।

बांधे मूळ नऊं द्रवाजा ।। पवन देत चड़ाई ।।
क्रामात देही पण राखे ।। नाव न पावे भाई ।।७।।

नऊ दरवाजे बंद करुन पवन भृगुटीत चढवून घेतात आणि अनेक वर्षा पर्यंत आपला देह करामाती काळापासून वाचवत राहतात असे काळापासून वाचण्याची करामात प्रगट केली तरी पण त्याचात ने:अक्षर प्राप्त होत नाही.।।७।।

अे सब ध्यान सिधायत होई ।। तामे भूल मत भाई ।।
आणंद लोक ने: अंछर पूंते ।। और न पोंचे काई ।।८।।

जे ध्यान आणि सिद्धांत आतापर्यंत पाहीले,त्याचात कोणी भूलु नका.हे कोणतेही ध्यान आणि सिद्धांत आनन्द लोकात पोहोचत नाही.आनन्द लोकात फक्त ने:अक्षर पोहोचते, दुसरे कोणतेही मायाचे ज्ञान आणि ध्यान पोहोचत नाही. ।।८।।

के सुखराम सुणो नर नारी ।। ग्यानी दरसण सारा ।।
सतगुरू सरण प्रेम सूं जागे ।। वो निजनाव बिचारा ।।९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व नर–नारी,ज्ञानी,जोगी,जंगम,सेवड़ा,सन्यासी, फकीर,ब्राम्हण या छ:दर्शन यांना सांगतात कि,हे निजनाम,हे ने:अक्षर सतगुरुचा शरणात जावून त्यांचाशी प्रेम केले म्हणजे घटात प्रगट होते.सतगुरुचा शरणा सोडून कोणत्याही मायेचा विधी ने हे निजनाम प्रगट होत नाही. ।।९।।

७१

।। पदराग आसा ।।

बांदा तत्त राज ओ होई
माया चेन अेक नही माने ।। ना आवे वो कोई ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,तत्त राज ज्या हंसात प्रगट होतो,तो हंस ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति यांचा एक ही पर्चे चमत्काराने प्रसन्न होत नाही आणि तो हंस ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति यांचा सारखे जगात कोणतेही पर्चे चमत्कार करत नाही. ।।टेर।।

**अणंद लोक मे माया नाही ।। तो तत्त मे किम मावे ।।**
**काया माहे सभाव जना को ।। सो बचना मे आवे ।।१।।**

आनंद लोकात ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति हे माया नाही,परंतु ज्या हंसात आनंद लोक प्रगट झाला त्या हंसास ब्रम्हा,विष्णु,महादेव आणि शक्तिचे पर्चे चमत्कार कसे होतील? देहात आनंद तत्त प्रगट झाला आहे त्या संताचा वचनाने आनंद तत्तचे पर्चे चमत्कार प्रगट होतील आणि ज्या देहात माया तत्त प्रगट झाली आहे त्या संताचे वचनाने ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्तिचे पर्चे प्रगट होतील.।।१।।

**अणंद ब्रम्ह को नाव हंस रे ।। तत्त सभाव कहावे ।।**
**वां माया जो जाय न सक्के ।। तो यांई निगट न आवे ।।२।।**

आनंद ब्रम्हचे नाम ज्या हंसात प्रगटले त्या हंसाचा स्वभाव आनंद ब्रम्हचा तत्त सारखा राहील.आनंद ब्रम्हात ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति हे माया जावू नाही शकत.तर येथे आनंद ब्रम्हचा हंसाजवळ ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्तिचे पर्चे चमत्काराची माया कशी जाईल. ।।२।।

**जाकी सभा माय कोई जावे ।। सगो सगे के कोई ।।**
**जात जात की चाल अेक रे ।। युं तत्त रीत कहुँ तोई ।।३।।**

सभेमध्ये अनेक लोक जमा होतात.त्या सभेत जातीचा मनुष्य जातीवाल्या जवळ बसतो, दुसऱ्या जातीवाल्या जवळ बसत नाही.त्याचात ही सगा-सग्या जवळच बसेल,या प्रकारे मायाची रीत आहे. ।।३।।

**तत्त नाव की सत्ता बताऊं ।। अे सुण प्रचा होई ।।**
**भ्रम क्रम जग का सब बंधण ।। या सूं डरे न कोई ।।४।।**

तत्त नामाचे सत्ताचे पर्चे सांगतो.हे तत्त नाम ज्या हंसात प्रगट झाले,त्या हंसाला माया ने उत्पन्न केलेले कोणत्याही भ्रमाचा,कर्माचा आणि बंधनाचा डर लागत नाही. ।।४।।

**उलटर नाव चड़े गड़ ऊपर ।। सेज समाधी लागे ।।**
**सांसो नही मोख दिस कोई ।। नेक भ्रम नही जागे ।।५।।**

तो हंस आपल्या घटात उलटून सतस्वरुप गढ़ावर चढ़ून जातो.त्याला दसवेद्वार सहज समाधी लागते.तो सर्व संसार करत,सत्ता तत्त बरोबर समाधीत रमतो.त्याला माझा मोक्ष होईल किंवा नाही याची फिकीर नाही राहत आणि त्याला मोक्ष होण्यात थोडासा

ही भ्रम होत नाही. ।।५।।

लाखां ग्यान आगला तोलर ।। आगी समझ बतावे ।।
अेकी अरथ इसो ले डारे ।। किसकुंई अर्थ न आवे ।।६।।

तो ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्तिचे वेद,शास्त्र,पुराणचे लाखो ज्ञान तोलतो आणि तो या मायाचे ज्ञानाचे पलीकडचे समज सांगतो.तो एकाद वाक्य असे बोलतो की,त्याचा अर्थ वेदाचे,शास्त्राचे,पुराणाचे प्रविण ज्ञानीला पण येत नाही. ।। ६ ।।

दाणू देव गोडयो बोहोतर ।। प्रचा अेई दे भाई ।।
अणंद ब्रम्ह को ग्यान पूछियां ।। याने खबर न काई ।।७।।

येथे संसारात राक्षस,देव,मदारी भरपूर आहे.ते सर्व मायाचे मोठे–मोठे चमत्कार करतात, परन्तु असे चमत्कार करणाऱ्याला आनन्द ब्रम्हचे ज्ञान विचारले तर,थोडेसे ही सांगता येत नाही. ।।७।।

बेद भेद दोनू जग माही ।। ग्यानी अर्थ बतावे ।।
छुछम बेद नाव नेः अंछर ।। देव ग्यानी नही पावे ।।८।।

वेद म्हणजे ब्रम्हा,भेद म्हणजे शिव,लबेद म्हणजे शक्ति आणि नवविद्या म्हणजे विष्णु यांचे ज्ञानी जगात ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति यांचा देशाचा भेद जानतात,परंतु सुक्ष्म भेद म्हणजे आनन्द पदाचा भेद जानत नाही. ।।८।।

के सुखराम झूट सो प्रचा ।। मत रीजो नर कोई ।।
उलटर नांव चड़े सो साचो ।। तत्त सत्त सुण होई ।।९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगतात,कि ब्रम्हा,विष्णु,महादेव, शक्ति आणि त्यांचा संता ने केलेले सर्व मायाचे पर्चे आनन्द ब्रम्हला पोहोचण्या करीता खोटे आहे.या करीता याच्यात कोणी खुष होवून अटकू नका.सतगुरु घटात उलटून गढ़ावर चढ़वून देतो.तो पर्चा तत्तचा खरा पर्चा आहे. ।।९।।

७२

।। पदराग शब्द ।।

बांदा तीन भक्त कहू तोई ।।
सुर्गण निर्गुण आनंद पद की ।। यारा भेद नियारा होई ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज या पदात जगातील लोकांना सगुण काय,निर्गुण काय तसेच आनंदपद काय या तिघांचा भेद वेगळा आहे आणि मार्ग ही वेग–वेगळा आहे.हे सांगत आहेत. ।।टेर।।

जोगारंभ जप तप सिवरण ।। कर्णी कुछ भी होई ।।
तब लग निर्गुण भक्ति नाही ।। सुर्गण वा कहुं तोई ।।१।।

सगुण भक्तीचे खुप मार्ग आहेत.सगुण भक्ती म्हणजे ज्याच्यात तीन गुण आहेत.ब्रम्हाचा

रजोगुण,विष्णुचा सतोगुण तसेच शंकराचा तमोगुण त्याला सगुण भक्ती म्हणतात.याची पोहच आकाशापर्यंत आहे.सगुण भक्तीमध्ये जोगारंभ,जप,तप,स्मरण तसेच ब्रम्हाचा सांख्ययोग, विष्णूची नवविद्या भक्ती, महादेवाचा हटयोग, पवनयोग, तीर्थ, व्रत,उपवास, मुद्रा,साधना गायत्रीची साधना करणे हे सर्व येतात.ह्या सर्व विध्या केल्याने त्यांची पोहच हद्दीपर्यंतच असते.याच्या व्यतिरिक्त पाताळापासून ओअम पर्यत म्हणजे ५२ अक्षरांच्या आधाराने बाहेरच्या श्वासात मुलद्वारातून जे श्वास भृगुटीत चढवतात.ती सर्व सगुण भक्तीच आहे.या देहाच्या,मनाच्या आणि तीन गुणांच्या आधाराने जी भक्ती केली जाते त्याला सगुण भक्ती म्हणतात.येथपर्यंत निर्गुणची भक्ती नाही. ।।१।।

**निर्गुण भक्त तका सुण कहीये ।। तत्त पीछाणे सोई ।।**
**निर्भे हुवा भ्रम सब भागा ।। सांसो सोग न कोई ।।२।।**

निर्गुण भक्तीचे दोन मार्ग आहेत.

१.तत्त ब्रम्ह ओळखणे–मीच ब्रम्ह आहे मी माया नाही मी ० = आत्मब्रम्ह

आत्मब्रम्ह म्हणजे ५ आत्मा,मन,ब्रम्ह असे आहे परंतु हे तत्त ओळखणारे ५ आत्मा आणि मन मी आहे असे मानत नाही.मी म्हणजे फक्त ब्रम्ह आहे असे मानतात आणि ब्रम्ह मरत नाही.असे ब्रम्हज्ञान यांना होत असते.म्हणून मरण्याचे भय नाही.मी ब्रम्ह आहे. मी माया नाही.म्हणून ब्रम्ह आणि माया असा भ्रम राहत नाही.कोणी मरुन गेले त्याचे दु:ख या साधकाला होत नाही.तो हे समझतो की,माझ्यात जसा ब्रम्ह आहे तसाच ज्याने शरीर सोडले त्याच्यात ही तोच ब्रम्ह आहे.ब्रम्ह मरत नाही.तो काल ही होता, आज ही आहे आणि उद्या ही राहील.अशी कोणती वेळ नव्हती की तो नव्हता आणि अशी कोणती वेळ नाही राहणार की तो नाही आहे.शरीर म्हणजे तो नाही म्हणून मेलेल्याची फिकीर किंवा दु:ख ब्रम्हज्ञानीला होत नाही.अशी एक निर्गुणची भक्ती आहे. ।।२।।

**अेक निर्गुण अंग दूसरो कहीये ।। जे ग्यानी कोई पावे ।।**
**सोहं जाप अजपो जपके ।। दसवे द्वार लग जावे ।।३।।**

दुसरी निर्गुणची भक्ती कोणी ज्ञानीच प्राप्त करतो.हा ब्रम्हज्ञानी सोहं,जाप,अजप्पा जपून बंकनाळेच्या रस्त्याने वज्रपोळपर्यत म्हणजे सिध्दशिळेपर्यंत पोहचतात.त्याच्या सोहम, जाप,अजप्पाने वज्रपोल फुटत नाही.म्हणून दहावेद्वार उघडत नाही.अशा प्रकारे वज्रपोळ पर्यंत पोहचतात.त्याच्या पुढे सतस्वरुपाला पोहचत नाही. ।।३।।

**अे निर्गुण मे मिले न कोई ।। जायर देखे सारा ।।**
**करामात कळा कोई पावे ।। ब्रम्ह न हुवे बिचारा ।।४।।**

या वरील दोन्ही निर्गुणाच्या भक्त्या आहेत.परंतु त्या ब्रम्हला पाहून घेतील परंतु जसे सतस्वरुपात गेलेला ब्रम्ह सतस्वरुपासारखा बनून जातो.तसे निर्गुणात पोहचलेला ब्रम्ह

होणकाळ ब्रम्ह सारखा ब्रम्ह बनत नाही.निर्गुण ब्रम्हच्या भक्तीने निर्गुण भक्तीचा भक्त पुन्हा मायेत येतील म्हणजे गर्भात येतील,करामाती राहतील.पर्चे चमत्काराचे कलाधारी राहतील.जसे रामचंद्रामध्ये करामात प्रगट होती.त्या करामतीने रावणाचा वध केला. कृष्णात करामात प्रगट होती त्याने कंसाचा वध केला.असे हे कलाधारी बनतील. परंतु निर्गुण ब्रम्ह सारखे ब्रम्ह बनणार नाही.(जीवाहून ने:अक्षर झिने आहे म्हणून हे जीव ने:अक्षर स्वरुप बनून जातो आणि होणकाळ हा जीवापेक्षा जड आहे म्हणून जीव होणकाळ स्वरुप बनत नाही.) ।।४।।

**आनंद पद की भक्त बताऊँ ।। प्रथम तो मत आवे ।।**
**ग्यान ध्यान हद का गुरू सारा ।। से सब ही छीटकावे ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्या जीवाला आनंदपदाची भक्ती धारण करायची आहे त्या जीवाची प्रथम मती(बुध्दी)अशी होईल की तो ज्ञान(वेद),ध्यान (योग)आणि हद्दीचे गुरु तसेच जप,तप,तीर्थ,व्रत,सुत,दान,पुण्य,धर्म,विष्णुची भक्ती, शक्तीची भक्ती,मुद्रा हे सर्व सोडून देईल.ह्या सर्व हद्दीतीलच क्रिया आहेत.ही सर्व माया आहे.हे आनंदपदाला पोहचविणारे नाही.अशी समज बनेल. ।।५।।

**सतगुरू ढूंढ सरण ले जाई ।। ज्हाँ नाव कळा घट जागे ।।**
**राज जोग वो कहिये जग मे ।। बिन करणी धुन्न लागे ।।६।।**

संसारात ते सतगुरुचा शोध करुन सतगुरु शरणा घेतील.
शोध कसा करतात.
सतगुरु हे मायेचे ज्ञान बोलत आहेत का?मग यांच्यापेक्षा ही वेगळे त्या मालकाचे ज्ञान (परमात्म्याचे)ज्ञान सांगत आहेत का?माया आणि ब्रम्हचे ज्ञान त्यांना पूर्णपणे आहे का?त्यांना परमात्मा मिळाला आहे का?ते स्वत: अनुभव केलेले,डोळ्यांनी पाहिलेले ज्ञान सांगतात का कोण्या दुसऱ्याचे ज्ञान ऐकून शिष्याला सांगतात?ते आवागमन मिटविण्याची भाषा बोलतात का?मला परममोक्ष जिवंतपणी मिळवून देतील की नाही?अशा सतगुरुचा तो शोध करतो.सतगुरु ही कोणते म्हणाल तर तोंडाने सतगुरु म्हटल्याने किंवा स्वभाव चांगला राहील्याने किंवा पर्चे चमत्कार करणारे सतगुरु होत नाही.सतगुरु तर तेच आहे,ज्यांच्या संगाने शिष्यात कोणताही भ्रम राहत नाही आणि त्या सतगुरु पासून ने:अक्षरी संत निपजतात म्हणजे त्यांच्या संगाने शिष्याच्या घटात नाम जागृत होवून जाते. अशा सतगुरुला शोधून त्यांचा शरणा घेतील आणि अशा सतगुरुला निजमन देतील. तेंव्हाच सतगुरुची दया होईल आणि घटात ती सत्ता प्रगट होईल.
।। सतगुरु कसे असतात ।।
सतगुरुच्या रोमा-रोमात तो परमात्मा विराजमान आहे.अशा सतगुरुशी प्रीती आली

पाहिजे.जसे या जीवाने पारब्रम्ह मध्ये ५ आत्म्यांच्या सुखांकरीता या सुखांशी प्रीती केली तेंव्हा परमात्म्याने ही सृष्टी बनवली.तशीच प्रीति सतगुरुशी कराल म्हणजे हंसाच्या उरातून सतगुरुला सतस्वरुप बघाल तेंव्हा शिष्य/हंसात ने:अक्षर प्रगट होईल.जो या होणकाळाचा राजा आहे.अशा राज्याची सत्ता या घटात कंठस्थानावर प्रगट होईल आणि हे ने:अक्षर राजाला प्रगट होण्याकरीता कोणती क्रिया-करणी करण्याची गरज नाही.हा ने:अक्षर राजा घटात प्रगट होतो.तेंव्हा एका-एका मायेला छाटत जातो आणि जिवंतपणी जीवाचा परममोक्ष होतो.हा राजा सदाकरीता काळाचे भय मिटवून महासुखी बनवून देतो. असा हा राजयोग आहे. ।।६।।

**फाड़ पीठ चडे. आकासा ।। फक्त हंस संग लीयो ।।**
**काया पाँच संग जीव रेतो ।। सो अब न्यारो कीयो ।।७।।**

ने:अक्षर या जीवाला घेवून पाठ फाडून पाठीचे २१ मण्यांचे छेदन करुन ब्रम्हांडात जातो. तेंव्हा फक्त हंसाला जीवाला सोबत चढून जातो.हा जीव आदि-अनादी पासून ५ विषयांच्या सोबत म्हणजे ५ आत्म्यांच्या सोबत राहत होता.त्या ५ विषयांपासून(५ आत्म्या पासून)या राजयोगाने(ने:अक्षराने)जीवाला वेगळे करुन दिले.ज्या मायेच्या कारणाने हा जीव महादु:ख भोगत होता.अशा मायेमधून या जीवाला काढून दहाव्याद्वारात पोहचून दिले. ।।७।।

**आणंद पद की सता कहीजे ।। इण संग जो जन होई ।।**
**ओर जोग अटक्या दर्वाजे ।। ओ नही अटके कोई ।।८।।**

आनंदपदाची सत्ता-ने:अक्षर = सतनाम
ही आनंदपदाची सत्ता ज्यांच्या शरीरात प्रगट होते ते जन(संत)असतात.
जो होणकाळाचा मालक आहे,अशा सतस्वरुपाची सत्ता ज्याच्या घटात येते(प्रगट होते) अशा संताला होणकाळातील कोणतीही माया ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,पारब्रम्ह, इच्छा काहीही करीत नाही.हा संत कोणाकडून अटकत नाही आणि ना ही त्याच्या कोणी आड्वे येत.उलट ही त्रिगुणी माया आणि होणकाळ ब्रम्ह धुंजतात आणि यांच्या दर्शनाची चाहना करतात.दुसरे सर्व योग,ओअम,सोहम,सोहम जाप,अजप्पा हे सर्व दहाव्याद्वारात जाऊन अटकून जातात.कारण की,यांची पोहच तेथपर्यंतच आहे.जेथून ते आले तेथेच थांबतील.जसे ओअम-भृगुटी किंवा जास्तीत-जास्त १००० पाकळ्यांच्या कमळापर्यत सोहम पारब्रम्हपर्यंत परंतु ने:अक्षर हे दहाव्याद्वाराच्या बाहेर येते.म्हणून दहावेद्वार उघडून हंसाला घेवून जातो आणि बाकी सर्व दहाव्याद्वारात अटकून जातात.जसे राजा गडावरुन जगातील एखाद्या प्रजेला राजा करण्याकरीता गडावर घेवून जाण्यास निघाला तर त्याला राजदरबारचे लोक अटकवू शकत नाही.तसेच जेंव्हा ने:अक्षर हंसाला घेवून जातो. तेंव्हा

या सत्तेला कोणी ही अटकवत नाही आणि ना ही तो कोणाकडून अटकविला जातो. ।।८।।

**राजजोग ओ कहीये भाई ।। ओर जोग सब लोई ।।**
**बादस्याहा पास रेत नही पहुंचे ।। भूप मीले कहुं तोई ।।९।।**

याला राजयोग म्हणतात.राजयोग म्हणजे राजासोबत बनलेला योग दूसरे सर्व योग रयत (प्रजे)सारखे आहेत.कैवल्ययोग हा सर्व योगांचा राजा आहे.हा कुदरत कलेचा योग राजा सारखा आहे आणि दुसरे योग प्रजे सारखे आहेत.राजयोग म्हणजे याच्यात नेहमी सुखच सुख आहे.नेहमी राजा सारखे सुख देतो.

| राजयोग | प्रजायोग |
| --- | --- |
| १ ज्ञान विज्ञानाच्या रस्त्याने जाणारा बंकनाळने विज्ञान मार्गाने जाणारा | १ होणकाळाच्या ज्ञान रस्त्याने जाणारा.भृगुटीवाला संखनाळ आणि सोहम जाप अजप्पा बंकनाळच्या चेतन मार्गाने जाणारा. |
| २ याच्या भक्तीचे बीज सतस्वरुपातून येते | २ याच्या भक्तीचे बीज पिंडामधून म्हणजे होणकाळातीलच आहे. |
| ३ या राजयोगात हा राजा जीवाच्या सोबतची माया सोड्वून त्याला शुध्द ब्रम्ह बनवून होणकाळाच्या पलिकडे जो सतस्वरुप आहे.त्याच्यात पोहचवितो. | ३ प्रजायोगात जीवाच्या सोबत ही माया जशीच्या तशी राहते. याकारणाने सिध्दशिळा फुटत नाही.आणि हे जीव होणकाळातच अटकतात. |
| ४ सतस्वरुप हाच राजयोग आहे. | ४ प्रजायोग–ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती यांची भक्ती योग,मुद्रा,वेदांतील क्रिया–करणी हे सर्व प्रजायोग आहेत. |
| ५ या राजयोगात ने:अक्षर घटात प्रगट होताच या जीवाला ब्रम्हांडात घेवून जातात आणि परत खाली येत नाही. | ५ प्रजायोग फक्त सांगण्याचा आहे.हा उतरविल्याने उतरतात.आणि चढवल्याने चढतात. |
| ६ राजयोगात सत्तासमाधी लागते. | ६ प्रजायोगात सत्ता समाधी लागत नाही.समाधी खंडीत होते. |

जसे बादशहाजवळ राजाच जाऊन भेटतो,प्रजा बादशहाच्या जवळ पोहचू शकत नाही. तसेच हे ने:अक्षर राजा हंसाला बादशहाशी म्हणजे सतस्वरुपाशी मिळविण्याचा आमचा योग बनवितो आणि त्याच्या दरबारात पोहचवितो.हे ने:अक्षर हंसाला घेण्यास येते म्हणून याला राजा म्हटले आहे.हेच ने:अक्षर सतस्वरुपात बादशहाचे सुख देतो.जसे राजा प्रजेला बादशहाशी मिळवते.तसेच ने:अक्षर हंसाला सतस्वरुपात मिळवतो. ।।९।।

**दर्वाजा ऊला सब खुल्ले ।। बज्र पोळ लग सोई ।।**
**राजजोग बिन दसवो कहीये ।। सो नही खुल्ले कोई ।।१०।।**

दुसऱ्या सर्व योगांपासून मायेचे दरवाजे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती २१ स्वर्ग,चिदानंद ब्रम्ह, शिवब्रम्ह,पारब्रम्ह पर्यंत म्हणजे सिध्दशिलेपर्यंत सर्व दरवाजे उघडून जातील परंतु वज्रपोळ उघडत नाही.(वज्रपोल–दगडाचा दरवाजा,दगडा सारखा दरवाजा,कोणाकडून

न फुटणारा)वज्रपोल उघडत नाही म्हणून अमरलोकास जाता येत नाही आणि ते तेथेच अटकून जातात. परंतु दहावेद्वार राजयोगाशिवाय उघडत नाही. ।।१०।।

**के सुखराम भेव बीन जोगी ।। जे आस करे सब जावे ।।**

**दर्वाजे सूं सब जोग फिरीया ।। आगे जाण न पावे ।।११।।**

राजयोग एकदा घटात प्रगट होवून गेला तर या जीवाला ब्रम्हंडातच घेऊन जातो आणि उलटून परत येत नाही.दुसरे सर्व योगी राजयोगाच्या भेदाशिवाय जो योग साधतात.९ योगेश्वर,मुद्रा साधणारे,ओअम–सोहमचे योगी यांच्या शिवाय जे भक्ती करीत आहे ते का करीत आहेत?तर या जीवाचा मोक्ष करण्याकरीता.सर्व या आनंदपदाची चाहणा करतात,आशा करतात.यांची समज कशी आहे तर आम्ही जी भक्ती धारण केली आहे त्याच्यानेच मोक्ष होईल.काही ज्ञानी म्हणजे ब्रम्हभक्ती करणारे या होणकाळ ब्रम्हलाच आनंदपद समजतात.परंतु त्याच्या ही पुढे आनंदपद आहे याचा भेद यांना नाही.दुसरे सर्व योग दहाव्याद्वारापासून पलटून येतात.पुढे जावू शकत नाही.कारण की दुसऱ्या योगांनी वज्रपोळ उघडत नाही.तो फक्त राजयोगाने उघडतो.वज्रपोल उघडत नाही म्हणून पुढे जाऊ शकत नाही,सर्व परत येतात. ।।११।।

१३७

।। पदराग जोग धनाश्री ।।

**ग्यानी ग्यान बिचार रूं देखो**

**ग्यानी ग्यान बिचार रूं देखो ।। क्रता ज्हाँ दूख होई लो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी,ध्यानींना सांगतात की,पारब्रम्ह होणकाळ जो पर्चे चमत्कार करतो तो माया आहे,तो साहेब नाही हे ज्ञानींनो ज्ञानाने विचार करुन पहा.म्हणून कर्तापद प्राप्त केले तरी ही काळाचे दु:खच आहे.आनंदपदाचे सुख नाही. ।।टेर।।

**उठत माया बेसत माया ।। माया अंछया होई लो ।।**

**माया मुख सूं हरफ रटे सो ।। सत्त सब्द नही कोई लो ।।१।।**

उठते म्हणजे ज्याची उत्पत्ती होते म्हणजे जी बनते तसेच बसते म्हणजे जिचा नाश होतो म्हणजे मिटते ती इच्छा माया आहे.तो साहेब नाही जो काल ही होता,आज ही आहे आणि उद्या ही राहील.जो स्थिर आहे तो माया नाही,तो साहेब आहे.मुखाने जे शब्द रटतात ती ही माया आहे,तो सतशब्द नाही. ।।१।।

**कही ये लखे लखावे माया ।। माया तन मन काया लो ।।**

**कळा प्रगटे चेहेन माया ।। स्थिर अस्थिर हे सो माया लो ।।२।।**

जे समजमध्ये येते ते ज्ञान ही मायाच आहे.तसेच दुसऱ्याला समजविले जाते ते ज्ञानी ही मायाच आहे.सर्व जीवांना शरीर आहे.ते ही माया आहे.सर्व जीवांचे मन हे ही माया

आहे.पर्चे चमत्कारांची कला प्रगट करते अशी रिध्दी-सिध्दी ही देखिल माया आहे. आकाश,वायू,अग्नी,जल,पृथ्वी हे जसे उपजतात आणि नाश होतात असे जे-जे ही अस्थिर आहे.म्हणजे जन्मतात आणि मरतात.ते सर्व मायाच आहे.तसेच जन्मत नाही आणि मरत नाही परंतु उपजविते अशी स्थिर दिसणारी होणकाळ पारब्रम्ह ही मायाच आहे,तो साहेब नाही ज्ञानींनो ज्ञान करुन पहा. ।।२।।

**माया हेरे आतो माया ।। सुण ग्यानी क्हूं तोई लो ।।**
**कळा आण कर कारज सारे ।। सो थिर क्हो किम होई लो ।।३।।**

पर्चे चमत्काराद्वारे जगातील स्त्री-पुरुषांचे मायेचे कारज करतो.तो आहे होणकाळ पारब्रम्ह हा ही माया आहे.होणकाळ पारब्रम्ह स्थिर दिसतो.परंतु मायेचे पर्चे चमत्कार करतो म्हणजे तो अस्थिर आहे.सतस्वरुप साहेबासारखा मायेचे पर्चे चमत्कार न करणारा असा स्थिर नाही. ।।३।।

**के सुखराम सदा थिर साहेब ।। करे करावे नाही लो ।।**
**समझ बिना कहे माया कूँ ।। साहिब जग के माई लो ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,साहेब सदैव स्थिर आहे.तो होणकाळ पारब्रम्ह सारखा पर्चे चमत्कार ही करीत नाही आणि करवित ही नाही.ज्ञानी,ध्यानी, तसेच जगाच्या स्त्री-पुरुषांना ज्ञान नसल्या कारणाने परचे चमत्कार देणाऱ्या होणकाळ पारब्रम्हला माया न म्हणता साहेब म्हणतात.त्याच्यांने मोक्ष मिळेल हे समजतात. ।।४।।

१६४

।। पदराग धमाल ।।

**जन चाय हुवे सो खोज ज्यो हो**
**जन चाय हुवे सो खोज ज्यो हो ।। यां इतना सूं न्यारो पद जाण ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले,जो शब्द सुरत,निरत,मन,चित्त,श्वास,ररंकार, अनहद,नाद,जींग अनादपेक्षा वेगळा आहे.अशा शब्दाला मायेहून वेगळ्या पदाला घेऊन जाणारा शब्द जाणा.या पदाची चाहणा असेल तर त्याला शोधा. ।।टेर।।

**सुरत निर्त मन सूं सो न्यारो ।। चित्त समज सूं जाण ।।**
**बुध सो अकल श्वास दम आगे ।। संता करो ही पिछाण ।।१।।**

जे पद सुरत, निरत, मन, चित्त, बुध्दी, अक्कल, श्वास या सर्वांहून निराळा आहे ते पद संतानो ओळखा. ।।१।।

**ररंकार धुन तन मे ऊठे ।। घुरे अनहद जोय ।।**
**यां सुंही सबद न: केवळ न्यारो ।। खोज प्रख ल्यो सोय ।।२।।**

ररंकार ध्वनि घटात उठते तसेच अनहद ध्वनि घटात घोरते यांच्यापेक्षा ही केवल शब्द वेगळा आहे त्याला शोधून प्राप्त करा. ।।२।।

अनहद परे नाद सो गाजे ।। जिंग सब्द फिर होई ।।
यां सुंही सत्त सबद हे न्यारो ।। कहयां लखे नही कोई ।।३।।

अनहदच्या पलिकडे नादची गर्जना होते व नादच्या गर्जनेच्या पलिकडे जींग शब्दाची गर्जना होते.यापेक्षा ही सतशब्द निराळा आहे.हा शब्द ज्ञानाने समजाविल्याने कोणाच्या समज मध्ये येत नाही. ।।३।।

अनाद सब्द सब सीस सिरे ।। गाजत हे दिन रात ।।
खोजी हुवे तके नर सुणज्यो ।। ईण सेंई आगी बात ।।४।।

अनाद म्हणजे ज्याच्यात ध्वनि नाही तो शब्द ररंकार,अनहद,नाद,जींग या सर्व शब्दांच्या वरती गरजतो आहे.या अनाद,अजप्पा शब्दाच्या वर जो शब्द आहे.त्याचा शोध करा. ।।४।।

राम नाम कूं रट उलटीये ।। चड़े हे त्रुगूटी जाय ।।
के सुखराम इसी बिध प्रखो ।। करद सबद कूं माय ।।५।।

रामनामाचे रटन करुन घटात बंकनाळेने हंस उलटून त्रिगुटीत चढतो त्या शब्दाची पारख करा आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हा बंकनाळेने उलटणारा शब्द काळ कर्माला कापतो. ।।५।।

१८१

।। पदराग बिलावल ।।

जोगीयाने ढूंढत जुग भया
जोगीयाने ढूंढत जुग भया ।। जोगी किणी हन पाया ।।
ज्यां देखूं ज्या राज वी ।। सब के संग माया ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील सर्व ज्ञानी,ध्यानी,तसेच स्त्री-पुरुषांना सांगतात की,योगीला शोधता-शोधता युगांचे-युग व्यतीत होवून गेले परंतु योगी कोणीही प्राप्त केला नाही.ज्यांनी ज्यांनी प्राप्त केला त्याने राजा सारखे पाची इंद्रियाचे सुख भोगणारा आणि राज्य चालवणारा गृहस्थीच प्राप्त केला. ।।टेर।।

करता कूं जोगी क्हेत हे ।। करता जोगी नाही ।।
म्हे देख्या गुरूग्यान मे ।। सब माया माही ।।१।।

जगातील कित्येक ज्ञानी,ध्यानी कर्ता म्हणजे होणकाळ ब्रम्हला योगी म्हणतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी सतस्वरुप गुरु ज्ञानात पाहिले तर तो योगी नाही म्हणजे ज्ञानस्वरुप नाही.त्या कर्त्यामध्ये इच्छेशी संसार करुन सृष्टि रचना करण्याची वासना आहे.म्हणजे तो गृहस्थी आहे.म्हणजे मायेतच आहे.असे दिसले. ।।१।।

पारब्रम्ह कुं जोगी केत हे ।। अब नासी न्यारा ।।
मे देख्या गुरूग्यान मे ।। माया मूळ बिचारा ।।२।।

जगात काही ज्ञानी,ध्यानी,होणकाळ पारब्रम्हला योगी म्हणतात.मायेच्या पलिकडे अविनाशी ब्रम्ह म्हणतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की मी सतस्वरुप गुरुज्ञानात पाहिले तर तो योगी नाही तो मायेची उपज करणारा मूळ माया आहे असे दिसले. ।।२।।

**ज्यूं जळ सू सब ऊपजे ।। बिष इम्रत दोई ।।**
**यूं माया प्रब्रम्हसूं ।। परगट कहूँ तोई ।।३।।**

जसे जलातून विष आणि अमृत उत्पन्न होते तसे पारब्रम्ह पासून काळाच्या मुखात पोहचविणारी विषय वासनिक माया आणि काळाच्या मुखातून तारणारी स्थुल माया उत्पन्न होते.अशाप्रकारे हा पारब्रम्ह ज्याला ज्ञानी,ध्यानी,मायेच्या पलिकडील अविनाशी म्हणतात.ते मायेच्या उपजचे मूळ आहे.तो मायेच्या पलिकडील ज्ञान-विज्ञान स्वरुपाचा योगी नाही. ।।३।।

**जग मे जोगी कोई नही ।। सारा घर बारी ।।**
**तीबर मद बेराग हे ।। माया ईध कारी ।।४।।**


आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जगात योगी कोणी नाही.सर्व घरबारी म्हणजे गृहस्थी आहेत.जगात कोणी ज्ञानी,ध्यानी तिब्बर वैरागीला योगी म्हणतात.परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तिब्बर योगी तसेच मद योगी हे दोन्ही ही योगी नाहीत.हे मायेचे भोगी आहेत.तिब्बर तसेच मद वैरागी म्हणजे काय आहे हे पाहू? तिब्बर वैरागी हे होणकाळ पारब्रम्हला साहेब समजून प्रेम करतात आणि त्याच्या अनुसार सृष्टी निर्मिती आणि सृष्टी चालवण्यास लागणारे शुभ शुभ कर्म करतो.मद वैरागी हा होणकाळ पारब्रम्हला मायेच्या पलिकडील ब्रम्ह समजून त्याची साधना करतो आणि त्याला सर्वांमध्ये ज्ञान-विज्ञान रुपात बघतात.तिब्बर तसेच मद वैरागी हे योगी कसे नाही हे पाहू?तिब्बर आणि मद वैरागी हे दोन्ही ही होणकाळ पारब्रम्हचीच भक्ती करतात.तिब्बर तसेच मद वैरागी होणकाळ पारब्रम्हला ज्ञान विज्ञान स्वरुपी पकडतात. ज्ञान-विज्ञानपासून निपजते,सृष्टी निपजत नाही.म्हणून हा योगी आहे असे समजतात. परंतु सतस्वरुप गुरुज्ञानाने बघितल्यावर समजते की,होणकाळ पारब्रम्ह हा वैरागी नाही तो पक्का गृहस्थी आहे.याच्या उरात इच्छा पत्नी सोबत भोग करुन ३ लोक १४ भवनाची रचना करण्याची वासना होती आणि आहे.हा ज्ञान-विज्ञान स्वरुपी नाही. याच्यात सृष्टी निर्मितीचे बीज आहे.म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,पारब्रम्ह हा योगी नाही तो पारब्रम्हची भक्ती करणारा तिब्बर तसेच मद वैरागी योगी कसे बनतील?जसे पारब्रम्ह हा गृहस्थी आहे.तसे हे दोन्ही ही तिब्बर तसेच मद वैरागी हे गृहस्थीच आहे. ।।४।।

**केवळ ग्यान बेराग हे ।। माया सें बारे ।।**


।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

सो जोगी सुखराम के ।। ऐसी मत धारे ।।५।।

कैवल्य ज्ञान वैराग्य हेच त्रिगुणी माया आणि होणकाळ पारब्रम्ह या मायेच्या बाहेर आहे.ते ज्ञान–विज्ञान रुपात आहे.त्याच्यात गृहस्थी बनून सृष्टी निर्मितीची वासना नाही.अश्या योगीची विधि जो धारण करेल तोच योगी आहे.तोच मायेच्या पलिकडे आहे.




जगात दोन पुरुष आहेत.
एक गृहस्थी आहे आणि दुसरा वेदी वैरागी आहे.







पुरुषाच्या देहात पत्नीच्या सोबत भोग करुन पुत्र, पुत्री जन्मण्याचे बीज आहे. म्हणजे गृहस्थीपासून पुत्र, पुत्री निपजतात ज्ञान निपजत नाही. म्हणून याला गृहस्थी म्हणतात. योगी म्हणत नाही.

असाच होणकाळ पारब्रम्ह आहे. याला इच्छा या स्त्री सोबत भोग भोगून सृष्टी निर्मितीची कुद्रतीच प्रकृती आहे. याच्यापासून सर्व जीव तसेच ३ लोक १४ भवन ही सृष्टी बनते.

म्हणून होणकाळ पारब्रम्ह हा गृहस्थी आहे. योगी नाही. यामुळे पारब्रम्हचे तिब्बर तसेच पद वैरागी हे योगी नाही. हे गृहस्थी आहेत.

वैरागी पुरुषाच्या देहात देहाच्या ज्ञानाचे बीज आहे. याच्यापासून ज्ञान निपजते. पुत्र पुत्री निपजत नाही. म्हणून हा योगी आहे. गृहस्थी नाही.

असेच केवल ज्ञान– विज्ञान हे ज्ञान–विज्ञान आहे. याच्यापासून ज्ञान–विज्ञान निपजते. याच्यात इच्छा या स्त्री सोबत भोग भोगण्याची कुद्रतीच प्रकृती नाही म्हणून याच्यापासून जीव उत्पन्न होत नाही. तसेच ३ लोक १४ भवन ही सृष्टी बनत नाही.

म्हणून हे बैरागी आहे. गृहस्थी नाही. म्हणून कैवल्य ज्ञान विज्ञानचे भक्त योगी आहेत, गृहस्थी नाहीत.


१८५

!! पदराग बिलावल !!

## जुग मे जोगी कौ नही

**जुग मे जोगी कौ नही !! सब दोजग धारी !!**
**कै तो जप तप कर रहया !! कोई इंद्र्या मारी !!टेर!!**

परात्परी पासून दोन पद आहेत.





१.हे ज्ञान–विज्ञान सुखाचे पद आहे.
२.येथे जीवाला जे तृप्त सुख पाहिजे ते सर्व उपलब्ध आहे.
३.योगीचे पदा वैराग्य म्हणजे मोहरहीत स्थितीचे पद आहे. याच्यात मायेची उपज नाही

१.हे दोजख म्हणजे काळाच्या जुलुमाने भरलेले पद आहे.
२.येथे मायेचे कृत्रिम सुख आहे. तसेच जीवाला एक ही नको असलेले असे दु:ख महादु:ख आहे.
३.गृहस्थीचे म्हणजे संसारीपद आहे. याच्या पासून मायेची उपज आहे.

अशा योगीला धारण केलेला योगी कोणीही नाही.
जगाचे सर्व साधक गृहस्थी म्हणजे होणकाळाला योगी समजून धारण करतात म्हणून सर्व दोजख धारी आहे.

दोजख म्हणजे काय?




हे काळाच्या जुलूमाने भरलेले पद आहे.जगामध्ये फक्त नरकातच काळाच्या यातना पडतात असे सर्व समजतात.नरकाचा मालक यमराज आहे.ज्यामध्ये ८४ नरक आहेत.हा लहान दोजख आहे.मोठा दोजख म्हणजे ३ लोक १४ भवन,३ब्रम्हचे १३ लोक (महामाया,प्रकृती, ज्योती,अजर,आनंद,वजर,इखर,निरंजन,अनहद,निराकार,शिवब्रम्ह, महासुन्न,पारब्रम्ह इतका आहे मोठ्या दोजखचा मालक महाकाळ आहे.त्याचे नाव होणकाळ पारब्रम्ह आहे. मोठ्या दोजखचा मालक यमराजालाही खातो म्हणजे काळ कठडी आहे.अशा दोजखच्या मालकाच्या भक्ताला दोजख धारी म्हणतात.जगामध्ये कोणी जप करतात,तप करतात म्हणजे ५ आत्मा,मन यांना तपवतात. इंद्रियांना जे सुख पाहिजे ते देत नाही.अशा तऱ्हेने ५ आत्मा, मन तपवतात,या कारणाने जीवाला त्याचा ताप सहन करावा लागतो याला तप करणे असे म्हणतात.कोणी इंद्रिये मारतात,


कोणी वेदांमध्ये सांगितलेल्या करण्या किंवा उपासना करतात,जप,तप,इंद्रिये मारणे यांची उपज वेदांमध्ये आहे.वेद ब्रम्हाने बनविले.ब्रम्हा शक्तीपासून बनला.शक्ती महतत्व पासून बनली.महतत्व इच्छा आणि होणकाळ पासून बनला.म्हणून जप करणारे,तप करणारे,इंद्रिये मारणारे हे होणकाळाच्या पलीकडे जात नाही.हे तर होणकाळातच बसून राहतात म्हणजे काल कठडीमध्ये बसलेले राहतात. ।।टेर।।

**कर्णी करम ऊपासना ।। सबके मन भावे ।।**
**निराकार करतार सूं ।। मिलणो सब चावे ।।१।।**

जगाच्या लोकांना वेदांमध्ये दिलेले कर्म करणे म्हणजे जप,तप,तिर्थ,यज्ञ पुजा करणे, उपासना करणे आवडते,जीवाला जे मायेचे सुख पाहिजे म्हणजे मनाचे,५ आत्माचे सुख पाहिजे त्या सुखाचे मार्ग वेदांमध्ये दिलेले आहेत म्हणून जगाच्या लोकांना वेदांची भक्ती करणे आवडते वेदांची भक्ती म्हणजे मायेची भक्ती आहे.अशी भक्ती करुन हे लोक निराकार कर्ताराला म्हणजे सतस्वरुप योगीला ज्याला आकार नाही,रंग,रुप,वर्ण नाही व जो विज्ञानी आहे,सर्व सुखांचा मालक आहे त्याला भेटू इच्छितात हा विज्ञानी कर्ता मायेची साधना केल्याने मिळेल हे कसे शक्य आहे?।।१।।


**सास उसासां रट रहयां ।। अजपे मन लागो ।।**
**निस दिन पचतां निसरे ।। सांसो नहि भागो ।।२।।**

कित्येक साधक श्वासा श्वासात रटतात म्हणजे ओअम योगाची साधना करतात.




ओअम हा बाहेरचा श्वास आहे.इच्छेपासून ओअमची उत्पत्ती झाली आहे. ओअमची साधना करणारे मुळद्वारापासून पूर्वेच्या संखनाळेने श्वास भृगुटीत चढवतात.भृगटीत टिकून राहण्या करीता त्यांना श्वासावर सुरत,मन लावावे लागते.सुरत श्वासा वरुन इकडे तिकडे झाली की श्वास खाली येतो व साधना तुटते.त्यांना रात्र दिवस भृगुटीत समाधी टिकवून राहण्याकरीता पचून हैराण व्हावे लागते.इतके रात्रदिवस पचल्यानंतर ही ओअमच्या साधकाची आवागमनाच्या चक्रात न येण्याची फिकीर,चिंता जात नाही. यमाचे भय निघत नाही.या संताला निराकार कर्तार मिळत नाही. काळा कठडीतून निघून होणकाळच्या पलीकडे पोहचू का?ही शंका बनलेली राहते. ।।२।।

**संख नाळ होय ऊतरे ।। बंक नाळ चडावे ।।**
**ध्यान धरे जाय सून्न में ।। कर्ता कूं गावे ।।३।।**





काही साधक सोहम अजपा जपतात आणि ते संखनाळेने उतरतात आणि बकंनाळेने चढून सुन्नमध्ये जाऊन होणकाळ कर्त्याचे ध्यान करतात.होणकाळ हा काळ आहे.त्याचे घर ३ लोक १४ भवन आणि

३ ब्रम्हचे १३ लोक इतके आहे.कर्त्याला भजले म्हणजे काळाला भजले मग तो साधक कर्ता म्हणजे काळाच्या बाहेर कसा निघेल?असे त्यांनी दोजखच्या मालकालाच धारण केलेले आहे म्हणजे दोजख मध्येच बसलेले आहेत. ।।३।।

**तीन लोक करतार कूं ।। सब ही जस देवे ।।**

**जोगी की कळ ना लखे ।। करमी कूं सेवे ।।४।।**




३ लोक १४ भवन म्हणजे सर्व लोक कर्तारला यश देतात म्हणजे कर्तारला योगी समजतात.कर्तारला मायेच्या पलीकडचा पूर्ण ब्रम्ह समजून त्याची भक्ती करतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,हा तर कर्मी आहे.जीवाला योगीची कळा माहित नसल्या कारणाने जीव कर्मीचीच सेवा करतात.

कर्तार कर्मी कसा?

होणकाळ पारब्रम्हची पत्नी इच्छा आहे.होणकाळ पारब्रम्हच्या भोगी कर्मानेच इच्छा पासून निराकारी तसेच साकारी सृष्टी बनली असा होणकाळ पारब्रम्ह हा कर्मी आहे. अशा कर्मीची जगत सेवा करतात जो स्वत: दोजखचा मालक आहे.।।४।।

**ने: करमी ब्रम्ह ग्यान हे ।। करमी मत्त सारा ।।**

**जोगी तो सुखराम के ।। दोण्या से न्यारा ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जगात ने:कर्मी ब्रम्हज्ञानी आहेत. ब्रम्हज्ञानी होणकाळ पारब्रम्हची साधना करतात.होणकाळ हा ब्रम्ह आहे.अशा प्रकारे ब्रम्हज्ञानी ने:कर्मी आहे.होणकाळ पारब्रम्ह हा इच्छाशी संसार करतो याकारणाने मुळातच तो योगी नाही म्हणजे ने:कर्मी ब्रम्हज्ञानी हा ही योगी नाही.होणकाळ ब्रम्हची पत्नी इच्छा आहे.इच्छा ही माया आहे.हिच्यापासून सर्व कर्म उपजतात.या इच्छेपासून उत्पन्न झालेले ब्रम्हा,विष्णु, महादेव,शक्ती यांच्या भक्तीने क्रियेमान कर्म बनतात.असे हे सर्व ब्रम्हज्ञान सोडून बाकी सर्व होणकाळातील कर्मी मत आहे.हे कर्मी ही योगी नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की ने:कर्मी म्हणजे ब्रम्हज्ञानी ही योगी नाही.जप,तप,उपासना करणारे कर्मी ही योगी नाही.जो मायेपासून वेगळा, मायेच्या पलीकडे आहे म्हणजे होणकाळ ब्रम्ह आणि माया या दोघांच्या पलीकडे सतस्वरुप विज्ञानी आहे तोच योगी आहे बाकी सर्व संसारी आहे,गृहस्थी आहे.।।५।।

२०९

।। पदराग निसाणी ।।

**कुण हे रे बाबा कुण हे रे बाबा**

**कुण हे रे बाबा कुण हे रे बाबा ।। कुण हे कुण हे ओ ।।**

**तीन लोक मे राच रहयो हे ।। एसी वां की धुन हे ओ ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,साधू,सिध्द,अवतार तसेच देवतांना विचारत आहेत की,३ लोक १४ भवन तसेच चार पुर्‍यांमध्ये सर्वीकडे व्याप्त आहे. तसेच ३ लोक १४ भवनाच्या प्रत्येक कोण्यात त्याच्या व्याप्तीची गरजना(गाजाबाजा) होवून राहीला आहे,तो बाबा कोण आहे.?।।टेर।।

**कोई कहे अे ओ जीव बिचारो ।। कोई कहे ओ सांई हो ।।**
**कोई कहे ओ ब्रम्ह आप हे ।। पूर रहयो सब मांई हो ।।१।।**

परात्परी पासून दोन पद आहेत.

कोणी ज्ञानी,ध्यानी म्हणतात की,हा जीव म्हणजे त्रिगुणी मायेच्या गुणाचा म्हणजे स्वरुपाचा आहे आणि सर्व जगात व्याप्त आहे,तर कोणी ज्ञानी,ध्यानी म्हणतात की,तो सतस्वरुप साईच्या गुणाचा म्हणजे स्वरुपाचा आहे आणि सर्व जगात व्याप्त आहे.तसेच कोणी ज्ञानी,ध्यानी म्हणतात की,तो होणकाळ पारब्रम्हच्या गुणाचा म्हणजे स्वरुपाचा आहे आणि सर्व जगात व्याप्त आहे. ।।१।।

**साहेब व्हे तो क्यूं दुख पावे ।। ब्रम्ह ग्रभ क्यूं आयो हे ।।**
**जीव हूवे तो फिर क्यूँ उपजे ।। जां कूं जंवरे खायो हे ।।२।।**

यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज

१.ज्याने त्याला साहेब गुणाचा संबोधला आहे.अशा ज्ञानी,ध्यानींना विचारत आहे की,तो जर साहेबाच्या गुणाचा आहे तर तो काळाचे दु:ख का प्राप्त करतात/भोगतात कारण की, साहेब तर काळाच्या पलिकडे आहे,तर साहेबाच्या गुणाची कोणतीही वस्तु काळाच्या पलिकडे राहिल.२.ज्याने त्याला पारब्रम्ह संबोधले आहे.अशा ज्ञानी,ध्यानींना आदि सतगुरु सुखरामजी महाराज विचारतात की,जर तो पारब्रम्ह गुणाचा आहे.तर त्याने आईच्या गर्भात येऊन मायेचे शरीर कसे धारण केले?कारण की शरीर धारण करण्याकरीता जी माया लागते ती माया म्हणजे कर्म पारब्रम्हच्या सोबत कधी राहत नाही.ती माया म्हणजे कर्म ५ आत्मा सोबत राहतात.मग कोर्‍या पारब्रम्हच्या गुणाची वस्तु गर्भात कशी आली?

३.ज्याने त्याला त्रिगुणी मायेच्या गुणाचा संबोधला त्या ज्ञानींना आदि सतगुरु सुखरामजी महाराज विचारतात की,जर तो त्रिगुणी मायेच्या गुणाचा म्हणजे स्वरुपाचा आहे.तर ती माया जबरा म्हणजे यम खातो खाल्या नंतर उपजण्या लायक गुणाची राहत नाही.अशी यमाने खाल्या नंतर उपजणार्‍या गुणाची वस्तु परत कशी उपजली?।।२।।

**नही ओ जीव ब्रम्ह नही साहेब ।। केतां कछू न आवे हे ।।**
**पांचूँ बास सदा उर यांके ।। भंवता यूं जुग जावे हे ।।३।।**

यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानींना सांगत आहेत की,तो ना तर जीव म्हणजे कोरा माया स्वरुप आहे,ना तर ब्रम्ह म्हणजे कोरा पारब्रम्ह स्वरुप आणि आणि तर साहेब स्वरुप आहे.याकारणाने या तिन्ही गुणांच्या आधारावर याला काय म्हणावे हे काही ही सांगता येत नाही.परंतु ज्ञानाने हे समजते की याच्या हृदयात म्हणजे निजमनात शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध ह्या पाची वासना सदा वास करतात.या पाची विषयांच्या सुखांच्या तृप्ती करीता तो ३ लोक १४ भवन तसेच ४ पुऱ्यांमध्ये अखंडीत भ्रमण करीत आहे.तो विषय तृप्तीच्या आशेमध्ये काळाचे महादु:ख भोगतांना युगाच्या मागे युग घालवत आहे. ।।३।।

**ग्यानी ध्यानी साध सिधाने ।। ब्रम्हा बोहो बिध गायो हे ।।**
**अर्जुन किसन व्यास कण बीण्यो ।। अर्था मे नही आयो हे ।।४।।**

ज्ञानी (नारद, सुत, पराशर) ध्यानी(महादेव, पातांजली) साध (सुकदेव) सिध्द (कपिल, गोरक्षनाथ)तसेच ब्रम्हाने याच्या गुणांच्या आधाराने वेगवेगळ्या नामाने संबोधण्याची प्रयत्न केला आहे.तसेच कृष्ण आणि अर्जुनाने गीतेमध्ये तसेच वेदव्यासाने १८ पुराणां मध्ये वेगवेगळ्या नामात संबोधण्याचा प्रयत्न केला आहे.परंतु त्याच्या गुणानुसार त्याचे नाम होणकाळी साधू,सिध्द, देवता,अवतार इत्यादी कोणाच्या पकड मध्ये आला नाही. ।।४।।

**अदभुत खेल अचंभा भारी ।। आद अंत ओ होइ हो ।।**
**समे भाव माया देहे धारे ।। सुख दुख लारे दोई हो ।।५।।**

हा अद्‌भुत खेळ आहे.याचे भारी आश्चर्य आहे.आदि पासून अंत पर्यंत हा आहे.तरीही याला काय म्हटले जावे हे कोणाच्या समजमध्ये बसत नाही.त्याच्यात हा गुण आहे.की याला आदि पासून महासुखांची चाहणा आहे आणि दु:ख त्याला स्वप्नात ही नको पाहिजे.असा आदि अंत पर्यंतचा म्हणजे अमर असूनही परत परत मायेचे शरीर धारण करतो आणि जन्म मरणाच्या दु:खाने भयभीत असतो. ।।५।।

**म्हारस ग्यान आनंद पद उपजे ।। जब ओ निर्भे होई हो ।।**
**क्हे सुखराम ज्हा लग सब ने ।। करता लग दुख ओइ हो ।।६।।**

यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,याला काय नाव द्यावे या शोधात ज्ञानी,ध्यानी,साधू,सिध्द,देवता तसेच अवतार अटकून राहतात.त्याचे नाव शोधण्यापेक्षा त्याला काळापासून मुक्त सुख पाहिजे आणि ते सुख त्याला कोठे प्राप्त होईल हे सतज्ञानाने सर्वांनी लक्ष्यात आणले पाहिजे म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,देवता तसेच अवतारांना सांगतात की,तो अमर आहे त्याला आदिपासून महासुखांची चाहना आहे त्याच्या सोबत मन आणि ५ आत्मा ही माया

आहे.याकारणाने त्याच्या हृदयात मायावी ५ सुखांची चाहणा बनलेली राहते.परंतु त्याला दु:खवाले सुख कधीही नको पाहिजे असतात.त्याला कोऱ्या सुखांचे महारस हवे असतात.हे ५ वासनांच्या सुखांच्या पलिकडील महारस घटात आनंदपद उपजल्यानंतर विज्ञान–ज्ञानाने मिळते.हे आनंदपद मिळाल्यावर जन्मणे,मरणे सदाकरीता मिटते.ज्याने तो निर्भय म्हणजे काळाच्या दु:खापासून भयरहीत बनतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील सर्व ज्ञानी,ध्यानी,साधू,सिध्दांना सांगतात की,हंसाने होणकाळातील सर्वात मोठे कर्तार पद ही प्राप्त करुन घेतले तरी ही त्याचे गर्भात येणे म्हणजे आवागमनापासून सुटका होत नाही.गर्भात येणे हंसाचे तेंव्हाच सुटते जेंव्हा त्याला आनंदपद प्राप्त होते. ।।६।।

२३२

।। पदराग जोग धनाश्री ।।

**माया हेरे आतो माया नीर बख**

**माया हेरे आतो नीर बख ।। ता मे फेर न फारा रे लो ।।टेर।।**

पर्चे चमत्कार ही माया आहे,हे तत्त नाही.हे तत्तच्या रस्त्यात डावपेच टाकून अंधा–धुंद लुटणारी जब्बर माया आहे.पर्चे चमत्कार ही मायाच आहे हे तत्त नाही याच्यात कोणता फेर–फार नाही. ।।टेर।।

**थिर अस्थिर सो सब ही माया ।। सुण ग्यानी कहुँ तोई लो ।।**

**कळा आण कर कारज सारे ।। सो थिर कोहो किम होई लो ।।१।।**

स्थिर म्हणजे होणकाळ पारब्रम्ह आणि अस्थिर म्हणजे त्रिगुणी माया ह्या दोन्ही ही माया आहेत. हे ज्ञानी तुम्ही समजा. स्थिर म्हणजे होणकाळ पारब्रम्ह आणि अस्थिर म्हणजे त्रिगुणी माया हे अष्ट सिध्दी आणि नऊ रिध्दीचे परचे चमत्कार करुन जगातील मायेचे कार्य सारते.जे जगाचे तत्तचे कारज कधी सारत नाही.म्हणून पर्चे चमत्कार ही माया आहे.हे परचे चमत्कार स्थिर होणकाळ पारब्रम्ह पासून ही प्रगटलेले असले तरीही ते माया आहे.ती काळापासून मुक्त करणारी ब्रम्हकला नाही. ।।१।।

**बड़ो गेल सुं इचरज होवो ।। भारी सुं बोहो भारी लो ।।**

**मायॉ हे रे ऊं साहेब नाही ।। प्रगट्यो आण बिचारी लो ।।२।।**

अचंबित करणारे भारी हून भारी पर्चे चमत्कार ही प्रगटले तरी ही ती मायाच आहे.तो साहेब नाही हे ज्ञानींनो समजा. ।।२।।

**उलट चडे सो चेतन माया ।। ब्रम्ह के जोडे माया लो ।।**

**सत्त लोग ही माया पुंचे ।। बिन माया कुण आया लो ।।३।।**

उलटून म्हणजे मुलद्वाराने ही भृगुटीत चढते ती चेतन माया आहे.ती माया होणकाळ पारब्रम्हची जोडायत म्हणजे पत्नी आहे.होणकाळ पारब्रम्ह आणि चेतन माया या

दोघांनी मिळून मायेची सृष्टि बनविली.उलट चढणारी माया नाही आहे तर तिच्या पासून सृष्टि कशी निपजली?तिच्यापासून सृष्टिचा पसारा झाला याचा अर्थ ती वैरागीण नाही माया आहे.ही उलट चढणारी चेतन माया होणकाळ पारब्रम्हच्या सतलोका पर्यंत पोहचते.होणकाळ पारब्रम्हच्या सतलोकाच्या पलिकडे सतस्वरुप तत्त मध्ये पोहचत नाही.अशाप्रकारे चेतन माया आणि होणकाळ पारब्रम्ह दोन्ही माया आहे.या दोन्हींनी सृष्टीचा पसारा केला आणि सृष्टीत पर्चे चमत्कार या मायेच्या रुपात जगात स्वत:ची सत्ता केली.।।३।।

**कह सुखराम ब्रम्ह हुवे माया ।। माया ब्रम्ह हुवे सोई लो ।।**
**सत्त शब्द मे जाय मिले हे ।। जब नही पलटे कोई लो ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,अशाप्रकारे जीव हा आदि ब्रम्ह होता आणि या माया ब्रम्हच्या सोबत येवून कधी ब्रम्हचा माया बनून गेला तर कधी मायेचा ब्रम्ह बनून गेला.अशाप्रकारे पर्चे चमत्कारात अटकून कधी ब्रम्हचा माया बनला आणि कधी मायेचा ब्रम्ह बनला आणि याच चक्रात अटकून राहला आणि यांच्या सत्तेने हा ब्रम्हचा ब्रम्ह कधी बनला नाही.हा ब्रम्हचा ब्रम्ह सदा जेंव्हाच बनतो.जेंव्हा हा ब्रम्ह होणकाळ पारब्रम्ह आणि त्रिगुणी मायेचे पर्चे चमत्कार त्यागून सतशब्द धारण करतो आणि सतशब्दात जावून मिळतो.एकवेळा सतशब्दात मिळाल्यानंतर परत हा ब्रम्ह कधी माया बनत नाही.तो ब्रम्हचा ब्रम्हच राहतो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानींना सांगत आहे. ।।४।।

२९३

।। पदराग मिश्रित ।।

**राजा हे असा जन कोई ।।**
**होणकाळ ईसर सुं आगे ।। ग्यान बतावे मोई ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,हे राजा असा कोणी जन आहे का,की जो होणकाळ ईश्वरच्या पुढचे ज्ञान मला सांगेल(असा कोणी आहे का?)।।टेर।।

**जे कोई ग्यान त्याग ले धावे ।। तिके काळ मुख माई ।।**
**वां की संगत प्रममोख नाही ।। हंसो किस बिध जाई ।।१।।**

जे कोणी संत त्रिगुणी मायेला त्यागण्याचे ज्ञान धारण करतात ते सर्व संत काळाच्या मुखात आहेत.त्रिगुणी मायेला त्यागले परंतु काळाच्या पलिकडील ज्ञान धारण नाही केले, काळाच्या आतीलच ज्ञान धारण केले ते सर्व साधू काळाच्या मुखातच आहेत. त्यांच्या संगतीमध्ये परममोक्ष नाही.मग हे जीव कोणत्या विधीने मोक्षाला जातील? ।।१।।

**जे कोई ग्यान बतावे कर्ता ।। पेदा करंदा भाई ।।**

अे सब ग्यान काळ का मुख मे ।। न्याव करो ओ आई ।।२।।

कित्येक ही ज्ञानी कर्त्याचे(सृष्टी कर्त्याचे)पैदा करणाऱ्याचे ज्ञान सांगतात.तर हे ही सर्व ज्ञानी काळाच्या मुखात आहेत.कारण याचा निर्णय करा की हा कर्ता पुरुषच काळ आहे.।।२।।

क्रिया कळा जप तप साझन ।। कुंची मूद्रा गावे ।।
पेलो छेह काळ का मुख मे ।। प्रममोख नही जावे ।।३।।

क्रिया करणे,जप करणे,तप करणे,साधना करणे,योगाभ्यासाची किल्ली साधने आणि मुद्रा साधणे हे आधीपासून शेवटपर्यंत म्हणजे आधीही काळाच्या मुखात होते,आजही काळाच्या मुखात आहे आणि शेवटपर्यंतही काळाच्याच मुखात राहील.त्रिगुणी मायेच्या विध्या सांगणाऱ्या मायावी ज्ञानींचा संग केल्याने परममोक्षात कोणीही जाऊ शकत नाही. ।।३।।

घणी बात थोडी मे केऊं ।। सुण लीज्यो नर नारी ।।
ब्रम्ह काळ माया सब चारो ।। देखो ग्यान बिचारी ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,गोष्ट तर खुप आहे परंतु मी थोडक्यात सांगतो आहे ही गोष्ट सर्व स्त्री-पुरुषांनी ऐकून घ्या.ब्रम्हच काळ आहे.तुम्ही विचार करुन पाहून घ्या की हा ब्रम्हच मायेच्या सर्व रचना करतो आणि पुन्हा स्वत:च सर्व खाऊन आपल्या आत भरुन घेतो जसे-शेती करणारा शेती करतो,बी पेरतो आणि निंदणी टुपणी करुन रखवाली करुन त्याची सुरक्षा करतो.मग नंतर आलेले पिक कापून, रगडून शेतीवाला खातो तसेच ही माया ब्रम्हची शेती आहे.तर हे ब्रम्ह मायेची रचना करुन हा ब्रम्ह पुन्हा खाऊन जातो म्हणजे हा ब्रम्हच मायेचा काळ आहे. ।।४।।

के सुखराम काळ सूं बारे ।। जे जन सत पद पावे ।।
हद कूं छाड़ तजे बेहद कूं ।। ब्रम्ह उलंग हंस जावे ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्या कोणाला सतपदाची चाह असेल तर तो त्या काळाशी म्हणजे ब्रम्हच्या पलिकडील साधना करा.म्हणजे सतपद मिळेल. या विधिने हद्दीला सोडून बेदद्दीचा त्याग करुन काळ ब्रम्हचा उलंघन करुन सतपदात ते संत जातील. ।।५।।

३१०

।। पदराग मिश्रित ।।

साधो भाई आणंद पद गुरू होई ।।
राजजोग सतगुरू की सेवा ।। ओर जोग कूळ लोई ।।टेर।।

साधो बंधू आणंद पदच गुरु आहे.जगात राजयोग आणि राजयोग सोडून अन्य मायेचे अनेक योग आहेत.राजयोग साधना ही आनंदपद सतगुरुची भक्ती आहे.तर अन्य मायेची

योग साधना हे कुळाचे माया माता ब्रम्ह पिता या लोकांची भक्ती करणे आहे. ।।टेर।।

**पूरणब्रम्ह पिता हे मेरा ।। अंछया हमारी बाई ।।**

**इनसो भोग करे बस हूवा ।। जब आ कहाणी माई ।।१।।**

आदि पासून पूर्ण ब्रम्ह म्हणजे होणकाळ पारब्रम्ह हा माझ्या म्हणजे प्रत्येक जीवाचा पिता आहे आणि इच्छा माया ही प्रत्येक जीवाची बहिण आहे.होणकाळ पारब्रम्ह इच्छेच्या वश होवून इच्छेसोबत भोग करु लागला.ज्यामुळे ती इच्छा सर्व जीवांची माता बनून गेली.।।१।।

**भेद बिना ग्यानी सो जग मे ।। सब अेकी कर जाणे ।।**

**मात पिता गुरू का गुण न्यारा ।। बुध बिन नाहे पिछाणे ।।२।।**

आनंदपद हे सतगुरु आहे,पूर्ण ब्रम्ह हा पिता आहे व इच्छा ही माता आहे हे जगाच्या ज्ञानींना भेद नसल्या कारणाने इच्छा माता आणि पारब्रम्ह पिता या दोघांना आनंदपद सतगुरु सारखे सतगुरु करुन समजले.जसे जगात मातेचा गुण घरा पुरता राहतो,पित्याचा गुण हुन्नर धंद्या पुरता राहतो.तर गुरुचा गुण संसारातील उदम आपदेतून वैरागी बनण्याचा असतो.अशा प्रकारे त्रिगुणी मायेचा गुण काळाच्या दु:खात फसून मायावी पाची वासनांचे सुख घेण्या पुरता असतो.तर पारब्रम्ह पित्याचा गुण मायेच्या सुख दु:खाच्या पलिकडे ब्रम्ह बनण्याचे सुख घेण्यापुरता असतो.तर सतस्वरुप सतगुरुचा गुण सदा काळाच्या प्रत्येक दु:खातून निघून अनंत महासुख घेण्याचा असतो.परंतु ही भेदाची बुध्दी जगातील ज्ञानींला नसल्याकारणाने त्रिगुणी माया माता आणि पारब्रम्ह पिता हे सतस्वरुप सतगुरु नाही हे अंतर समजण्याची राहत नाही. ।।२।।

**मात पिता को मे अगवाणी ।। ज्यूं जग सपूत कहायो ।।**

**नाना बिध पदवी सो देखी ।। आणंद पद नही पायो ।।३।।**

जसे कोणी जगात माता–पित्याच्या प्रत्येक आज्ञेत राहतात.त्याला संसाराचे लोक सुपुत्र म्हणतात.हा सुपुत्र असल्या कारणाने त्याला माता पिता परिवाराच्या अनेक पदव्या देऊन सुख पोहचवितात.परंतु या पुत्राला गुरुचे ज्ञान सुख मिळत नाही.अशाचप्रकारे त्रिगुणी माया माता व होणकाळ पारब्रम्हच्या पूर्ण शरणात राहून त्यांच्या भक्त्या केल्याने जीवांना मायेच्या अनेक पदव्या भोगण्याचे सुख मिळते,परंतु त्या जीवाला आनंदपदाचे वैराग्य विज्ञानाचे सुख मिळत नाही. ।।३।।

**नुगरो रहयो जुगे जुग हंसो ।। मोख कोण बिध पावे ।।**

**सुर्गुण निर्गुण अे दोय भक्ती ।। कुळ का धर्म कहावे ।।४।।**

सुगुण ही माता आहे तर निर्गुण हा पिता आहे.याकारणाने सगुण तसेच निर्गुण ह्या दोन्ही भक्त्या कुळाचाच धर्म आहे.कुळाच्या पलिकडील गुरुची भक्ती नाही.सर्व भक्त्या

युगानु युगापासून करत आला व करत राहील.तोपर्यंत जीव नुगरा आहे आणि नुगरा राहील.गुरु भक्ती धारण केल्या शिवाय गुरु भेद मिळणार नाही व गुरुच्या भेदा शिवाय जीव काळ रहीत महासुखाच्या मोक्षपदात जाणाार नाही. ।।४।।

**सुरगुण निर्गुण दोनू छूटी ।। नाव कळा जब जागी ।।**
**अब बेराग ऊपज्यो माने ।। तब आ सूझण लागी ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुषांना सांगत आहेत की,माझी सगुण म्हणजे मातेची भक्ती तसेच निर्गुण म्हणत पित्यांची भक्ती दोन्ही सुटून गेल्या आणि गुरु शरण घेतल्याने माझ्यात ने:अक्षर नामाची कुद्रतकला जागृत झाली.माझ्यात वैराग्य विज्ञान उपजले ज्याच्यांने मला गुरु भक्ती माता पिता पेक्षा कशी वेगळी आहे व मोक्ष पदाची दाता आहे हे दिसू लागले. ।।५।।

**सतगुरू सरण हंस अब आयो ।। अब सुग्रो नर होई ।।**
**मात पिता दोना कूं तारूं ।। जे गम पूछे मोई ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात मी ही आधी माता–पित्यांच्याच भक्त होतो.परंतु सतगुरु सतस्वरुपाचा शरणा मिळाल्याने सद्शिष्य(सुग्रा)होवून गेलो आणि माझ्यात काळापासून मुक्त करविणारी गुरु सत्ता प्रगट होवून गेली.मी गुरु सत्तेच्या बळाने ठोकून सांगत आहे की,ज्यांची मी आजपर्यत भक्ती करीत होतो व काळाच्या मुखात अटकत होतो तो फंद माझा सुटून गेला आणि ज्या माता–पित्याची भक्ती करीत होतो ते जर मोक्षाचे पद चाहत आहे तर मी त्यांनाही मोक्षाचा भेद देऊन महासुखाच्या मोक्षपदात घेऊन जाऊ शकतो. ।।६।।

**पूरणब्रम्ह पिता हमारा ।। अंछया मात कहावे ।।**
**अब दोना कूं मोख पहूंचाऊं ।। जे मुज सरणे आवे ।।७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,माझ्यात सतगुरु सत्ता प्रगट झाली आहे.अशा सत्तेच्या शरणात मी माझे पिता पुरण ब्रम्ह तसेच माता इच्छा दोन्ही मोक्षाला जाऊ शकतात.परंतु ते सत्तेच्या शरणात येतील तरच सतगुरु पदात म्हणजे मोक्षपदात जाऊ शकतील. ।।७।।

**तीन लोक मे जे नर नारी ।। सब कुळ मेरो होई ।।**
**माँ अर बाप स्हेत सब नारी ।। जे गुरू ध्रम पकडे कोई ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,पुरण ब्रम्ह माझे पिता आहेत व इच्छा ही माझी माता आहे व माझे पिता पुरणब्रम्ह तसेच इच्छेपासून आम्ही सर्व जीव उत्पन्न झाले आहे.म्हणून तीन लोकातील सर्व स्त्री–पुरुष हे माझ्या कुळाचे जीव आहेत. माझ्यात गुरु सत्ता प्रगट झाली आहे.याकारणाने मी कुळापासून बाहेर होवून गुरु

सत्ताधारी झालो आहे माझ्यात जी गुरु सत्ता प्रगट झाली आहे त्या सत्तेच्या आधाराने जे जे स्त्री–पुरुष तसेच माझे माता–पिता म्हणजे माया ब्रम्ह माझ्यात प्रगट झालेल्या गुरुचा धर्म स्वीकार करतील तर गुरुधर्म स्वीकार करणाऱ्या सर्वांना गुरुचे मोक्षपद प्राप्त होईल. ।।८।।

**के सुखराम ग्यान ओ मेरो ।। सुण कर सब मुर्झावे ।।**
**जिंऊँ जग माय हुवे बेरागी ।। जब घर सब दूख पावे ।।९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात माझे हे विज्ञान वैरागी ज्ञान ऐकून सर्व कुळाचे माता–पित्या पासून स्त्री–पुरुषा पर्यंत उदास होतात.म्हणजे गुरुधर्म स्विकारण्या करीता हर्षित न होता दु:खी होतात.जसे जगातील कोणी मनुष्य परिवार सोडून संसार त्यागतो व गुरुच्या शरणात जाऊन वैरागी बनतो.अशाचप्रकारे माझ्या कुळाचे होणकाळ पारब्रम्ह पिता,इच्छा माता तसेच ३ लोकाचे सर्व जीव मी वैरागी विज्ञानी झालो यामुळे आनंदी न होता उदास होतात आणि माझ्यात प्रगट झालेल्या गुरुसत्तेच्या शरणात न येता काळाच्या दु:खात पडले राहतात. ।।९।।

३३०

।। पदराग बसन्त ।।

**संत सुणज्यो हो सब सब्द बिचार**
**संत सुणज्यो हो सब सब्द बिचार ।। अखंड सब्द सोई तत्त सार ।।टेर।।**

सर्व लोकांनो या सतशब्दाचा विचार ऐका.जो शब्द काल ही होता,आज ही आहे व उद्या ही राहील तसेच अशी कोणती वेळ नव्हती की तो नव्हता व अशी कोणती वेळ राहणार नाही की तो राहणार नाही.असे अखंडीत नाम सर्व नामांमध्ये तत्तसार आहे. ।।टेर।।

**बोले बेण जीभ मुख माँय ।। से सब क्षिण खुटे जम खाय ।।**
**मंत्र बिध अनेकूँ होय ।। माया सरूपी हे शब्द दोय ।।१।।**

जो शब्द,नाम,मुख,जीभेने बोलले जातो ते क्षीण म्हणजे नष्ट होतात,ते खुंटतात म्हणजे मरतात त्या शब्दांचा होणकाळ यम महाप्रलयात खातो.म्हणून वेद पुराणांचे सर्व मंत्र, ओअम शब्द तसेच सोहम शब्द ही माया स्वरुपी असल्या कारणाने काळ ग्रासणारे मंत्र आहेत, साहेब स्वरुपी मंत्र नाही.।।१।।

**कही सुणो कयाँ सुंई होय ।। तंहाँ लग च्यार काळ की जोय ।।**
**सुरत समज मन के बस थाय ।। जब लग काळ धरे मुख खाय ।।२।।**

मायेच्या देहाने जो शब्द सांगता येतो,ऐकता येतो,लिहीता येतो ते सर्व शब्द काळाचा चारा आहेत.जो शब्द सुरतने समज मध्ये येतो,मनाने समजला जातो तोपर्यंतचे सर्व शब्द काळाचा चारा आहे.त्या शब्दांना काळ खाण्याकरीता मुखात पकडून बसला आहे.

।।२।।

मन सुं गहयाँ नेक थूंभे जाय ।। सो भी सब्द नही असल थाय ।।
याँ इतना को कहीये मूळ ।। ताहाँ लग काळ क्रम की चूळ ।।३।।

जो शब्द मनाने पकडला जातो परंतु पकडून ठेवण्यात थोडाच थांबतो तो ही शब्द,नाम अस्सल अखंडीत शब्द,नाम नाही.या सर्व शब्दांचे मूळ सोहम अजप्पा ही काळाच्या आतच आहे.म्हणजे सोहम अजप्पा पर्यंत ही काळाचीच सत्ता आहे. ।।३।।

क्हे सुखदेव राम सो गाय ।। अरध शब्द देख्या ज माँय ।।
सुरत निरत मन बस नाहे ।। सो सुण शब्द अखंड हम माहे ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,राम नाम गायल्याने घटात,ररंकार आर्धा शब्द प्रगट होतो.तोच शब्द अन्य शब्दांसारखा सुरत,निरत,मनाने वशमध्ये करावा लागत नाही.हा शब्द अखंडीत आहे.तत्तसार आहे.घटात,निरत,मनाच्या पलिकडे आहे. हा विना खंडीत घटात ऐकू येतो. ।।४।।

३३३

।। पदराग मिश्रित ।।

संताँ ग्यान अरथ गम भारी

संताँ ग्यान अरथ गम भारी ।। रे संता ग्यान अरथ गम भारी ।।टेर।।

हे सगुण तसेच निर्गुण ज्ञान जसे सहज समजते तसे सहज समजणाऱ्या सारखे केवल ज्ञान विज्ञान नाही.केवल ज्ञान विज्ञानाला समजण्याकरीता खोल समज पाहिजे.वर वरच्या समज वाल्याला केवल ज्ञान विज्ञान ना आजपर्यंत समजले ना पुढे समजेल.।।टेर।।

सुर्गुण निर्गुण भक्त सेल हे ।। नार पूरष गम जाणे ।।
केवळ ग्यान बिग्यान कहीजे ।। बिर्ळा संत पिछाणे ।।१।।

सगुण म्हणजे रजोगुण,सतोगुण,तमोगुण म्हणजेच ब्रम्हा,विष्णू,महादेव आणि अवतारांची भक्ती तसेच निर्गुण म्हणजे होणकाळ पारब्रम्हची भक्ती बिना खोल समजवाल्यांना म्हणजे वर वरच्या समजवाल्यांना सहजात समज मध्ये येते म्हणून जगातील सर्व स्त्री –पुरुष सगुण आणि निर्गुणची भक्ती जाणतात.परंतु केवल ज्ञान विज्ञान हे ज्यांना खोल समज असते म्हणजे सगुण आणि निर्गुणच्या पलिकडील ज्ञान–विज्ञानाची समज असते असे विरळेच संत ओळखू शकतात हे संत सोडून अन्य वर–वर समजवाले केवल ज्ञान–विज्ञान जराही समजत नाही. ।।१।।

सुर्गण मात पिता पण निर्गुण ।। हंसा रो कुळ होई ।।
जब लग तात परोजन उण से ।। निर्भे मत्त नही कोई ।।२।।

जसे कुळात माता–पिता आहेत.तसेच हंसाच्या कुळात सगुण ही माता आहे तर निर्गुण हा पिता आहे.जोपर्यंत संसारात माता–पित्यांशी म्हणजे कुळाच्या सुखात अडकलेले

असतात.तोपर्यंत कुळाची गांगरत,उधम,आपदा पुन्हा उपजलेल्या चिंता,फिकीर,भया–पासून सुटकारा होत नाही.तसेच कुळाचे त्रिगुणी माया मातेपासून उपजलेले ब्रम्हा,विष्णू, महादेव आणि निर्गुण होणकाळ पारब्रम्हच्या सुखात अडकलेले असतात तो पर्यंत काळाच्या दु:खाचे भारी भय सतावते.याकारणाने हंसाची निर्भय स्थिती बनत नाही. ।।२।।

**माया ब्रम्ह करे सब निर्णो ।। रूम रूम कर ठाणे ।।**

**केवळ ग्यान बिग्यान कहीजे ।। बिर्ळा संत पिछाणे ।।३।।**

त्रिगुणी माया,होणकाळ पारब्रम्ह तसेच केवल ज्ञान विज्ञानाचा हा केसा–केसात म्हणजे बारीक–बारीक अभ्यास म्हणजे भेद जाणणाराच केवल ज्ञान विज्ञान ओळखेल असे बारीक–बारीक निर्णय जाणणारा एखादाच(विरळाच)संत अंसतो. ।।३।।

**माया रही हद के माही ।। बेहद ब्रम्ह कहावे ।।**

**परा भक्त सतगुरूजी को सरणो ।। आ बिध बिर्ळा पावे ।।४।।**

माता पित्याची पोहच हद्दी पर्यंत म्हणजे आकाशापर्यंत सुख देण्याची आहे आणि पिता होणकाळ पारब्रम्हची पोहच सिध्दशिळे पर्यंत ब्रम्ह बनून सुख प्राप्त करण्याची आहे. परंतु दोन्ही ही भक्त काळाच्या भयाने ग्रासलेले राहतात.माता माया तसेच पिता होणकाळ पारब्रम्हच्या पलिकडे सतगुरुचा शरणा म्हणजे निर्भय बनण्याची पराभक्ती आहे.या सतस्वरुप पदात काळाचे जराही भय राहत नाही.परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,याची विधि विरळेच प्राप्त करतात वर–वर समजणारे कधी प्राप्त करीत नाही. ।।४।।

**सतगुरू म्हेमा संत पीछाणे ।। भिन्न भिन्न कर गुण गावे ।।**

**के सुखराम सूंखारा सागर ।। भेद तो बिर्ळा पावे ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुष तसेच ज्ञानी,ध्यानींना सांगतात त्रिगुणी माता पारब्रम्ह पित्याच्या पलिकडे विज्ञानी सतगुरु पद आहे.ते सतगुरु पद हे महासुखांच्या सागर आहे.सुखांचा सागर आहे म्हणजेच ते भिन्न–भिन्न अनंत सुखांचा सागर आहे.तेथे प्राप्त होणाऱ्या भिन्न–भिन्न सुखांच्या गुणांची ज्याला महिमा समजेल असा विरळाच संत त्या पदाला प्राप्त करु शकेल.।।५।।

३३४

।। पदराग होरी ।।

**संतो अगम गेल गत न्यारी ।।**

**ज्याँ जाणी जाँ ब्रम्ह तज्यो ।। तजी राम पियारी ।।टेर।।**

संत अगम देशाच्या रस्त्याची समज वेगळी आहे.ज्याला अगम देशाच्या रस्त्याची समज आली.त्यांनी जीवब्रम्हचा देश ही सोडला,राम म्हणजे पारब्रम्ह होणकाळाचा देश ही सोडला व रामप्यारी म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेवाचा देश ही सोडला. ।।टेर।।

ने: करमीने नहि पिछाणे ।। जब लग जोगी नाही ।।
ग्यान ध्यान की लगी समाधी ।। हे तो जुग के मांही ।।१।।

नेःकर्मी जोपर्यंत ओळखत नाही तोपर्यंत तो योगी विज्ञान योगी नाही.ज्ञान,ध्यान,म्हणजे ओअम,सोहमची समाधी लागते.तोपर्यंत होणकाळ मायाच आहे.विज्ञान योगी नाही. ।।१।।

कासमेर लग करें कासटा ।। काया कसणी भारी ।।
मन चावे सो कर बतावे ।। हे पको सेंसारी ।। संतो अगम गेल गत न्यारी ।।२।।

काश्मीर पर्वतपर्यंत चढतात,शरीराला कसून भारी कष्ट देतात व ओअम भृगुटीत चढवितात.सृष्टित मनाला आवडतील ते चमत्कार करुन देतात तरी ही हे विज्ञान योगी नाही,हे पक्के होणकाळ भोगी आहेत,संसारी आहेत.या होणकाळाच्या देशापेक्षा अगम देशाचा रस्ता वेगळाच आहे. ।।२।।

सुण अवतार अलख सो बाजे ।। पारब्रम्ह के कोई ।।
अखर ब्रम्ह तजो जोत सरूपी ।। जगत सबद हे दोई ।। संतो सेस नाम मे होई ।।३।।

रामचंद्र,कृष्ण,अवतार पारब्रम्ह पासून जगात येतात म्हणून हे अलख बाजते पारब्रम्ह बाजते तरी ही हे विज्ञान योगी नाही.हे होणकाळ माया आहे.सोहम हे अक्षर ब्रम्ह हे ही माया आहे व मायेच्या सुरतच्या डोळ्यांनी दिसणारी प्रत्येक वस्तु माया आहे व ज्योतस्वरुप ही सुरतच्या डोळ्यांने समजते म्हणून ज्योती स्वरुप हे ही मायाच आहे. दोन्ही होणकाळ जगाचे शब्द आहेत.संतांनो हे सर्व शब्द सहस्त्र नाम आहेत.ते नाम योगी नाही.।।३।।

ओ बेराग जगत नहि बाजे ।। राजा पातश्या नही होई ।।
के सुखराम नाहे निरवां बोलो । लखसी बिरला कोई । संतो अगम गेल गत न्यारी ।४।

हे विज्ञान वैराग्य ब्रम्हा,विष्णू,महादेव तसेच राजा बादशहा नाहीत.हे विज्ञान वैराग्य ब्रम्हा, विष्णू,महादेव तसेच राजा बादशहा पेक्षा निराळे आहे.या वैराग्याला कोणी विरळाच संत जाणतो. ।।४।।

३५७
।। पदराग मिश्रित ।।

संतो गुरू भक्ता नही कोई ।।
सुरगुण निरगुण दोय भक्त अे ।। मात पिता की होई ।।टेर।।

जगातील सर्व ज्ञानी,ध्यानी तर स्त्री-पुरुषांना आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,आपण सर्व ज्या ज्या भक्त्या करत आहात.त्या सर्व भक्त्या माता पित्याच्या पदाच्या आहेत.गुरु पदाच्या नाहीत जसे जगात देहाचे माता पिता तसेच गुरु असतात तसेच जीवकरीता आदिपासून माता पिता व गुरु आहे.
देहाचे माता पिता गुरु सर्व समझतात परंतु जीवाचे माता पिता व गुरु आम्ही समजत

नाही. म्हणून त्याला आम्ही समजू.आम्ही आदिपासून जेथे राहत होतो तेथे आदिपासून तीन पद होते व आज ही ते तीन जसेच्या तसे आहेत.जसे घरात सेवा करणे ही मातेची सेवा आहे. दुकान,धंदा सांभाळणे ही पित्याची सेवा आहे तसेच गुरुधामात वनात जावून ज्ञान शिकणे,ध्यान शिकणे,ध्यान लावणे ही गुरुची सेवा भक्ती आहे. तसेच त्रिगुणी मायेचे रजोगुणी ब्रम्हा,सतोगुणी विष्णू,तमोगुणी शंकर या देवतांची तसेच अवतारांची भक्ती करणे ही जीवाच्या मातेची भक्ती म्हणजे सगुण साकारी भक्ती आहे.तसेच जिच्यात रजोगुण, सतोगुण तसेच तमोगुण हे मातेचे गुण नाहीत.परंतु माते सोबत पिता बनून सृष्टि रचविण्याची क्रिया करतो असे तीन गुण रहीत निराकारी होणकाळ ब्रम्हची भक्ती करणे म्हणजे निर्गुण पित्याची भक्ती करणे आहे.सर्गुण माया माता तसेच निर्गुण ब्रम्ह पित्याच्या पलिकडे सतस्वरुप गुरुपद आहे.या सतस्वरुप गुरु पदाची भक्ती हीच गुरुभक्ती आहे. जगात फक्त याची भक्ती करणारेच गुरु भक्त आहेत.अन्य सर्व भक्ती करणारे गुरु भक्त नाहीत.माता–पित्याचे भक्त आहेत. ।।टेर।।

**राजा रंक नार क्हा पुर्षा ।। हिंदु तुर्क मिल दोई ।।**
**मात पिता का सब अगवाणी ।। ग्यानी ध्यानी लोई ।।१।।**

हिंदु राजा,रंक,स्त्री–पुरुष,ज्ञानी, ध्यानी तसेच मुस्लीम राजा, रंक, स्त्री–पुरुष, ज्ञानी, ध्यानी,हे सर्व त्रिगुणी माया माता किंवा होणकाळ ब्रम्ह पित्याची भक्ती करतात.हे कोणी ही सतस्वरुप गुरुची भक्ती करीत नाहीत. ।।१।।

**हद मे ग्यान ध्यान बीध सारी ।। सो माता की सेवा ।।**
**बेहद माहे समाधी लागे ।। ज्हां पिता निरंजन देवा ।।२।।**

आकाशापर्यंत किंवा देहाच्या भृगुटी पर्यंत ज्या ही भक्तीची विधि जीव धारण करतात सर्व भक्त्या हद्द म्हणजे साकारी रजोगुण,तमोगुण,सतोगुण या त्रिगुणी माया माता पदा मध्ये पोहचण्याची भक्ती आहे.अशाप्रकारे जे जीव बेहद्द म्हणजे दहाव्याद्वारात राहणाऱ्या निरंजन देवाची समाधी लावतात ते जीव होणकाळ पारब्रम्ह पित्याच्या पदात पोहचण्याची भक्ती करतात.ह्या दोन्ही भक्ती सतस्वरुप गुरु पदात पोहचण्याच्या नाहीत. ।।२।।

**इन कूं गावे इन कूं ध्यावे ।। इनका सिंव्रण होई ।।**
**जो नर समज करणे आगे ।। तत्त पिछाणे कोई ।।३।।**

त्रिगुणीमाया किंवा होणकाळ पारब्रम्हचे गाणे म्हणजे भजन करणे ध्यान करणे,स्मरण करणे हे माता पित्याचे भजन करणे ध्यान करणे,स्मरण करणे आहे.हे गुरुचे स्मरण करणे नाही.हे जो मनुष्य समजेल तो मनुष्य त्रिगुणी माया माता तसेच पारब्रम्ह पित्याच्या पलिकडील गुरु तत्तला शोधेल व प्राप्त करेल. ।।३।।

**सर्गुण छाड तजे निर्गुण कूं ।। ने: अंछर कोई पावे ।।**

ओऊँ सोऊँ तजर अजपो ।। पिछम घाट जन आवे ।।४।।

जो रजोगुण,सतोगुण,तमोगुण या साकारी मायेला सोडून निर्गुण ब्रम्हचा त्याग करेल तोच संत ने:अक्षर प्राप्त करेल.तसेच तोच संत ओअम,सोहम तसेच अजप्पाच्या पलिकडील ने:अक्षरची सत्ता प्रगट झाल्याने पश्चिम म्हणजे बंकनाळच्या घाटाने पार उतरेल. ।।४।।

हंसो चडे पटक सब माया ।। ने: अंछर संग होई ।।
मिणिया सेंग ईकीसूं फोड़े ।। चड़े सिखर कहुं तोई ।।५।।

हंस ने:अक्षराचा संग करुन शिखरावर चढण्याच्या रस्त्यात आड्वी येणारी आत्मा मन इत्यादि माया पटवून सोड्तो.हंस ने:अक्षराच्या सत्तेने पाठीचे सर्व २१ मणी फोड्तो व शिखरावर म्हणजे दहाव्याद्वारात पोहचतो. ।।५।।

अळा पींगळा दोनू जागे ।। मेर डंड सूं भाई ।।
सुखमण चले सीस ऊपर होय ।। मिले त्रृगुटी आई ।।६।।

शिखरावर चढते वेळी गंगा,यमुना तसेच सुषमणा मेरु दंडापासून जागृत झाली.गंगा उजव्या बाजूने,यमुना डाव्या बाजून तसेच सुषमना डोक्याच्या वरतून चालून त्रिगुटीत ह्या तिन्ही नद्या मिळाल्यात. ।।६।।

सतसरूप सब्द के माही ।। आठ पोर जन देखे ।।
रूप न रंग बरण कूछ नाही ।। देखत अंत बसेखे ।।७।।

संत अष्टोप्रहर म्हणजे २४ही तास सतस्वरुप शब्दाच्या गुंजारला ऐकतात व निहारत असतात सतस्वरुपाला मायेसारखे रुप,रंग,वर्ण असे काही असत नाही.तरी ही संताला सतशब्दाने माया ब्रम्हच्या पलिकडील सुख प्रगटतात.या कारणाने सतशब्द अतिविशेष सुख देणारा दिसतो. ।।७।।

तत्त कहे सो पिण ऊलो ।। ग्यान द्रष्ट सूं जोवे ।।
आनंदपद ज्यां ग्यान बीन घट मे ।। अखंड रात दिन होवे ।।८।।

संसाराचे ज्ञानी,ध्यानी,तत्त म्हणजे होणकाळ पारब्रम्ह हे मायेच्या पलिकडील सर्वात उच्च पद आहे असे समजतात.म्हणून दहाव्याद्वारात ज्ञान कला लावून त्याची समाधी लावतात.आनंदपद घटात एक वेळा प्रगट झाल्यानंतर विना कोणत्या ज्ञानाच्या आधाराने घटात अखंड्ति रात्रं-दिवस प्रगट असते.परंतु होणकाळ तत्त ज्ञानाचा आधार सुटताच दहावेद्वार सोडून खाली येतो.ते घटात प्रगट झाल्यानंतर सदा प्रगट रुपात राहत नाही. लुप्त होवून जाते.यावरुन ज्ञान सृष्टिने हेच समजते की होणकाळ पारब्रम्ह तत्त हे आनंदपद तत्तच्या उले आहे म्हणजे आनंदपद तत्त हे होणकाळ पारब्रम्ह तत्तच्या पलिकडे आहे. ।।८।।

नवतत्त लिंग सरीर कहिजे ।। सो नही ईण संग चाले ।।
आतम पांच नाभ मे बिछड़ी ।। त्रगुटी मे नव पाले ।।९।।

हंस होणकाळाच्या सर्व कला त्यागून ने:अक्षर कला धारण करतो व ने:अक्षराच्या सोबत शिखरात चढतो तेंव्हा नाभी मध्ये शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध ह्या पाच आत्मा ही माया त्यागतो व त्रिगुटीच्या पलिकडे चढून शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध,चित्त,मन,बुध्दी, अहंकाराची बनलेली नव तत्तची काया निराकाराच्या लोकात सोडतो व कोरा ब्रम्ह बनतो. ।।९।।

आणंद पद कूं हंस पहूँचे ।। ने: अंछर संग होई ।।
पूरब घाट चड़े सो अंछर ।। ईखर शब्द कहुं तोई ।।१०।।

अशा प्रकारे हंस ने:अक्षरा सोबत होऊन आनंदपदात न पोहचू देणाऱ्या मायेला त्यागून पश्चिमच्या रस्त्याने दहाव्याद्वारी पोहचतो.कित्येक ज्ञानी,ध्यानी इखर शब्दाचा संग करुन पूर्वेच्या रस्त्याने दहाव्याद्वारी पोहचतात.तो इखर शब्द हा मायेपासून उत्पन्न झालेला शब्द आहे.हा शब्द मुखाने बोलला जातो,कागदावर लिहला जातो.

टिप–पूर्व रस्त्याने चढणारा ओअम शब्द असतो.पश्चिम रस्त्याने चढणारा ने:अक्षर असतो.

जोगिया पद– सोहम जाप अजप्पा हा शब्द बंकनाळेने चढतो म्हणून इखर शब्द हा ओअम शब्दच होऊ शकतो. ।।१०।।

ईखर सबद संग जे जन चड़ीया ।। दसवे द्वार लग जावे ।।
दसवो दुवार ना फूटे वांसूं ।। जब फिर पाछो आवे ।।११।।

जो संत इखर शब्दाचा संग करुन दहाव्याद्वारापर्यंत पोहचतात.त्यांच्याने दहावेद्वार उघडत नाही.या कारणाने ते आनंदपदात न जाता परत मायेत येऊन पडतात. ।।११।।

इखर सबद संग नव तत्त चाले ।। माया सरूपी होई ।।
ने: अंछर ओ सत्त सरूपी ।। इंऊं द्वारो दे खोई ।।१२।।

इखर अक्षर शब्द हा मायेपासून उत्पन्न झालेला शब्द आहे.होणकाळाच्या मुखातच राहणारा शब्द आहे.या कारणाने या माया स्वरुपी शब्दाच्या सत्तेने ५ आत्मा या मायेचा नाभीत वियोग होत नाही.तसेच नवतत्त लिंग शरीर हे माया निराकाराच्या लोकात मिटत नाही.याकारणाने इखर शब्दाने दहावेद्वार उघडत नाही.ने:अक्षर हे होणकाळाच्या पलिकडील सतस्वरुपी शब्द आहे.यामुळे याच्या सत्तेने दहावेद्वार उघडते व हंस होणकाळापासून मुक्त होतो. ।।१२।।

दसवे द्वार परे पद आणंद ।। सो सत्तगुर पद जाणो ।।
दसवें द्वार माहे सब बाता ।। माया ब्रम्ह पिछाणो ।।१३।।

दहाव्याद्वाराच्या पलिकडे जे आणंदपद आहे.ते सतगुरु पद आहे.दहाव्याद्वाराच्या आतील पारब्रम्ह पद हे पिता पद आहे.तसेच त्रिगुणी माये पासून(उत्पन्न)उपजलेले सर्व पद हे माता पद आहे हे पारब्रम्ह तसेच त्रिगुणी मायेपासून निपजलेले कोणते ही पद सतस्वरुप पद नाही.।।१३।।

**मात पिता हंस का हूवे ।। माया ब्रम्ह कहुं तोई ।।**
**आनंद पद सत्तगुर कहिये ।। समरथ ने: अंछर सो होई ।।१४।।**

जसे जगात देहाचे माता पिता असतात.तसेच त्रिगुणी माया ही जीवाची माता तसेच पारब्रम्ह हा जीवाचे पिता आहे व आनंदपद हा जीवाचे सतगुरु आहे ते आनंदपद म्हणजे ने:अक्षर जीवाला काळापासून काढण्याकरीता समर्थ आहे तसेच जीव जे जे सुख चाहतो ते सर्व सुख जीवाला जिवाच्या कोणत्याही चाहनेशिवाय पुरविण्याकरीता समर्थ आहे.।१४।

**केवळ बीज सबद ओ कहीये ।। सो बाहेर से आवे ।।**
**घट मे नाव तके सो माया ।। ता को मूळ कहावे ।।१५।।**

केवल म्हणजे मायेपासून पूर्ण मुक्त अशा पदाचा जो शब्द बीज आहे.तो होणकाळ तसेच मायेच्या बाहेरुन हंसात प्रगट होतो.म्हणजे घटाच्या बाहेर प्रगट होतो.घटात आदि पासून तो शब्द राहत नाही.घटात आदि पासून जो शब्द बीज राहतो तो माया शब्द राहतो.तोच शब्द काळाच्या मुखात ढकलणारा मूळ शब्द आहे.ती माया मूळ कशी आहे हे पाहू. होणकाळ पारब्रम्ह व इच्छा यांच्या पासून ओअम शब्दाची उत्पत्ती होते.याच शब्दाने घट बनतो. म्हणून हा शब्द घटात ओतप्रोत प्रगट असतो. ।।१५।।

**घट मे नाव राम सो कहीये ।। जिण संग जे गत पावे ।।**
**तो मात पिता कूं छाड़ जक्त मे ।। गुर सर्णे किऊं जावे ।।१६।।**

घटात जे मायावी नाम आहेत.त्यालाच पूर्ण मायारहित नाम समजतात म्हणजे राम समजतात व त्याच्यापासून गती म्हणजे काळापासून मुक्ती प्राप्त करतात असे ज्ञानी, ध्यानी सांगतात.तर संसारात जीव माता पित्याला त्यागून गुरु शरणात का जातात? ।।१६।।

**के सुखराम ग्यानी सब भूला ।। ज्यां मे न्याव न कोई ।।**
**निर्गुण ब्रम्ह पिता हंस न को ।। गुर ठेरायो जोई ।।१७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगतात की,सर्व ज्ञानी आदि सृष्टि रचनेच्या वेळी जे मूळ सतज्ञान होते ते विसरुन गेले.म्हणून माया ही माता व पारब्रम्ह पिता हे गती नाही देऊ शकत,गती करीता सतस्वरुप गुरुच पाहिजे हे न्यायाने विचार करु शकत नाही.काही ज्ञानींनी निर्गुण ब्रम्हला गुरु ठरवून त्याची भक्ती

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

करतात व समजतात की या भक्तीने काळापासून मुक्ती होईल परंतु हे ज्ञानी हे नाही समजत की निर्गुण ब्रम्ह हा हंसाचा पिता आहे व पिता जसे संसारात कमाईचा हुन्नर शिकवतो.वेदाचे ज्ञान नाही शिकवत.अशा प्रकारे निर्गुण ब्रम्ह सृष्टि बनविण्याचा हुन्नर शिकवितो,काळापासून मुक्त होणारा सतस्वरुप विज्ञान वैराग्य शिकवत नाही.।।१७।।

४०८

।। पदराग जोग धनाश्री ।।

## उण स्मरथ की मे बलिहारी

उण स्मरथ की मे बलिहारी ।। जिण आ मांड पसारि रे लो ।।टेर।।

मी ज्या समर्थाने माझा देह आणि सृष्टी बनवली त्या समर्थावर मी माझा प्राण त्यागून देतो.।।टेर।।

केवळ बिना सब माया होई ।। ब्रम्हा बिस्न सब क्कावे रे ।।
सब औतार सगत सो सिवजी ।। प्रमपद कूं गावे रे लो ।।१।।

तीन्ही लोकाचे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति हे सर्व देव आणि सर्व अवतार हे सर्व माया आहे.काळाचा चारा आहे.हे केवल नाही आहे.हे सर्व ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति आणि अवतार त्या परमपदाला भजतात.।।१।।

कोटां ब्रम्हा कोटां सिवजी ।। कोटा बिस्न ध्यावे रे ।।
रूम रूम में कोटाँ ब्रम्हंड ।। तां का वारपार नही आवे रे लो ।।२।।

त्या परमपदाला,वैकुंठात विष्णु सारखे देह धारण केलेले करोडो विष्णु,कैलासात राहणारे शंकर सारखे देह धारण केलेले करोडो शंकर,सतलोकात राहणारे ब्रम्हा सारखे देह धारण केलेले करोडो ब्रम्हा,त्याचप्रमाणे स्वर्गाचे सर्व देवता भजतात.त्या समर्थाच्या रोम रोम मध्ये म्हणजे त्यांचा ने:अंछरी देहात त्यांचा रोम सारख्या लहान भागात ब्रम्हंड म्हणजे ब्रम्हरुपी जीव सामावलेले आहेत.याप्रमाणे त्यांचा वार पार नाही.(जसे सतस्वरुपाला ब्रम्हंड म्हणतात,होणकाळालाही ब्रम्हंड म्हणतात तसेच जीवब्रम्हला पण ब्रम्हंड म्हणतात. असे येथे ब्रम्हंड हा शब्द जीव या ब्रम्हरुपी ब्रम्हंडाचा उपयोग केला आहे.।।२।।

छिन मे मांड पलक मे कीनी ।। ब्हो बिध रूप पसारा रे ।।
जां दिन सोखत करसी बाबो ।। रहे नही कुछ लारा रे लो ।।३।।

त्या समर्थाने एका क्षणात सृष्टी करुन,एका पळात,पुष्कळ विधीच्या रुपाचा प्रसार केला आणि ज्या दिवशी तो बाबा,तो समरथ शोषण करेल म्हणजे मिटवेल,त्या दिवशी त्याने बनवलेले मागे काहीच राहणार नाही.।।३।।

के सुखराम सुणो संत सारा ।। ने: चळ अवगत देवा रे ।।
ओर सकळ साहेब की माया ।। केवळ तत्त की सेवा रे लो ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,सर्व संत ऐका.हा अविगत देव आहे,जो त्याला मायेने जाणता येत नाही,तो निश्चळ आहे.ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति आणि अवतार यांचा सारखा महाप्रलयात मिटणारा नाही.बाकी सर्व साहेब सोडून,साहेबाने बनवलेली माया आहे.ही माया काळ न ग्रासलेला कैवल्य तत्त नाही आहे.याकरीता तुम्ही मायेची भक्ति न करता,कैवल्य तत्तची सेवा म्हणजे भक्ति करा. ।।४।।